# निकाल घोषणा

उल्हासनगर महानगरपालिका महापौर पदाच्या निवडणूकीमधील प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांचा तपशिल त्यांच्या नावासमोर नमुद करण्यांत आला असून तो पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्रीमती इदनानी आशा जीवन | ४९ |
| २. | श्री. वधरिया राजेश नानिकराम | २८ |
| **एकुण मतदान संख्या** | **—** | ७७ |
| **तटस्थ सदस्यांची संख्या** | **—** | — |

महापौर व उप—महापौर पदासाठी निवडणूका घेणे नियमांतील नियम ७ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **महापौर** पदाचे उमेदवार ***श्रीमती आशा जीवन इदनानी*** यांना *एकूण ७७ पैकी ४९ इतकी* म्हणजेच सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***महापौर*** म्हणून रीतसर नेमणुक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :—४/४/२०१२

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(एच. के. जावळे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>निकाल घोषणा</u>

उल्हासनगर महानगरपालिका उपमहापौर पदाच्या निवडणूकीमधील प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांचा तपशिल त्यांच्या नावासमोर नमुद करण्यांत आला असून तो पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. चौधरी जाफर अली | २८ |
| २. | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४९ |
| **एकुण मतदान संख्या —** | | ७७ |
| **तटस्थ सदस्यांची संख्या —** | | — |

महापौर व उप—महापौर पदासाठी निवडणूका घेणे नियमांतील नियम ७ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **उपमहापौर** पदाचे उमेदवार ***श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी*** यांना *एकूण ७७ पैकी ४९ इतकी* म्हणजेच सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***महापौर*** म्हणून रीतसर नेमणुक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :—४/४/२०१२

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(एच. के. जावळे)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :— श्री. राजेद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— डॉ. निना नाथानी

**स्थगित प्रस्ताव**

या सभेचे विषय क्र. ३ पासून पुढील कामकाज सोमवार दिनांक ०९.०४.२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:—१** **दिनांक:—०४/०४/२०१२**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ०४/०४/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या या सभचे विषय क्र. ३ च्या पुढील कामकाज दिनांक ०९/०४/२०१२ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## विषय ३ :– ५ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

प्रस्तावना:–

सन–२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. दिनांक १७/२/२०१२ निवडणूक निकालानंतर व दिनांक २०/२/२०१२ रोजी अधिसुचनाद्वारे निवडून आलेल्या सदस्याचे नाव जाहिर केल्यावर आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३१ अ च्या तरतुदी अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्या प्रयोजनार्थ मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन येथे फ्रट किंवा आघाडीची नोंदणी झाल्यावर पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | आघाडी किंवा फ्रंट झाल्यावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | २० | ० | — | २० |
| शिवसेना | १९ | ० | — | १९ |
| भाजपा | ११ | ० | — | ११ |
| कॉग्रेस | ८ | ० | — | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | +३ | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | — | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | –२ | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | ०० |
| अपक्ष | ०१ | –१ | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | ०० |
| मनसे | ०१ | ०० | — | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ | ००<br>००<br>००<br>००<br>०० | —<br>—<br>—<br>—<br>— | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ |
| एकूण | ७८ | | | ७८ |

महापालिकेच्या ५ नामर्देशित सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. संख्याबळ खालील प्रमाणे आहे

| राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ऑफ इंडिया गट | | | | |
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

$$\frac{78}{05} = 15\text{-}60$$

एका पालिका सदस्याचे नामनिर्देशनासाठी मतांचे प्रमाण— १५.६० असणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २० / ७८ X ०५ | = १.२८ | (७) | मनसे | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |
| (२) | शिवसेना | १९ / ७८ X ०५ | = १.२१ | (८) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |
| (३) | भाजपा | ११ / ७८ X ०५ | = ०.७० | (९) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |
| (४) | साई | १० / ७८ X ०५ | = ०.६४ | (१०) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |
| (५) | कॉंग्रेस | ०८ / ७८ X ०५ | = ०.५१ | (११) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |
| (६) | आरपीआय | ४ / ७८ X ०५ | = ०.२५ | (१२) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | = ०.०६ |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | एकूण |
|---|---|---|
| १ | १ | ०२ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(१) साई** | ०.६४ | **(२) शिवसेना** | ०.२१ | **(३) रा.का.पा.** | ०.२८ |
| **(४) भा.ज.पा.** | ०.७० | **(५) कॉंग्रेस** | ०.५१ | **(६) आरपीआय** | ०.२५ |
| **(७) मनसे** | ०.०६ | **(८) अपक्ष** | ०.०६ | **(९) अपक्ष** | ०.०६ |
| **(१०)अपक्ष** | ०.०६ | **(११)अपक्ष** | ०.०६ | **(१२) अपक्ष** | ०.०६ |

वरील परिस्थिती पहाता भाजपा, साई आणि कॉंग्रेस या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे चार रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाच्या सदस्याचे प्रमाणाशिर प्रतिनिधीत्वाद्वारे खालील प्रमाणे नामनिर्देशन करण्यास प्रस्तावित.

| साई | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०५ |

दिनांक २६/३/२०१२ रोजी उक्त बाबींसाठी महासभा सुचना काढण्यात आली आहे. त्यानुसार इच्छूक उमेदवारांकडून महापालिका सचिवांकडे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छाननी अंती महासभेपुढे पात्र उमेदवारांच्या यादी पैकी अनुज्ञेय असलेल्या पक्षनिहाय होणाऱ्या गटनेत्यांच्या शिफारशी प्रमाणे तौलनिक संख्याबळ अनुसार पाच नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेस महासभेपुढे प्रस्तावित.

# दि. २.४.२०१२ रोजी नामनिर्देशित सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या अर्जदारांची यादी

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | अर्हता | संस्थेचे नाव व पत्ता | पद व कालावधी | पुरावा म्हणुन सादर केलेली कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज भागवत वाघमारे सुलोचना कुंज, लाल चक्की, स्टेशन रोड, दुर्गानगर समोर, उल्हासनगर–४. **राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी** | डी. फार्मसी (ॲपीयर) | मुक्ताई शिक्षण प्रसाधक मंडळ, १०२ शिवअर्चना अपार्टमंन्ट, प्लॉट नं.२९९, सर्वोदय हाऊ. सोसायटी, कानसई सेक्शन, अंबरनाथ, पुर्व | **सेक्रेटरी** दिनांक २४.३.२००२ ते आजपर्यंत | अनुसुची बारा मधील कामाविषयी प्रमाणपत्र, संस्थेचा ठराव, प्रस्तावित नामनिर्देशनासाठी संस्थेचा विहित नमुन्यातील ठराव, संस्थेने राबविलेले कार्यक्रम व तपशील, प्रतिज्ञापत्र, गुणपत्रिका, मतदार यादीचे पृष्ठ, एप्रिल २००७ ते मार्च २०११ लेखा परिक्षण अहवाल, धर्मादाय आयुक्त यांच्याकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, ट्रस्ट डिड, संस्थेच्या सभासुचनेची प्रत | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. सदरहु संस्था महापालिका क्षेत्रात कार्यरत नाही, तसेच ट्रस्ट डिड मध्ये उमेदवाराच्या नावाचा सदस्य म्हणुन उल्लेख नाही. |
| २ | ॲड. अनिल चदंरलाल आयलानी बॅ.नं.५९५, रुमं नं. ७ व ८, ओटी सेक्शन, उल्हासनगर–२. **राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी** | बी.ए. एल.एल. बी. | बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र व गोवा, हायकोर्ट मुबंई, | **वकील** म्हणुन नोंदणी झाल्यांची दिनांक १४.३.२००१ | बार काऊन्सीलचे प्रमाणपत्र, एल. एल. बी. चे गुणपत्रक, बार काऊन्सीलचे ओळखपत्र, प्रतिज्ञापत्र, | नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असण्याऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीची पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | करण्या प्रयोजनार्थ नियम ४ ड प्रमाणे पात्र. |
| ३ | श्री. विनोद चंदीराम तलरेजा<br>३०४, वीरभवन, खेमानी, उल्हासनगर—२.<br><br>**अपक्ष** | जुनी एस.एस. सी. पास | श्री. बाबा रामदेव शिक्षण संस्था, बॅ.नं. ७३६/३ समोर, परमार सदन, सेन्ट्रल हॉस्पीटल एरिया, उल्हासनग—३. | **सह सचिव**, दिनांक १५. ४.२००६ ते आजपर्यंत | अनुसुची बारा मधील कामाविषयी चे संस्थेचे प्रमाणपत्र, प्रस्तावित नामनिर्देशनासाठी संस्थेचा विहित नमुन्यातील ठराव, शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीतील पृष्ठ, धर्मादाय आयुक्त यांच्याकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, सन २००५—०६, ०६—०७, ०७—०८, ०९—१० या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत धर्मादाय आयुक्तांना लिहिलेले पत्र, नो डयुज सर्टीफिकेट, प्रस्तावित नामनिर्देशनासाठी संस्थेचे पत्र, इन्कम टॅक्स ॲक्नालेजमेन्ट, ३१.०३.२०१० अखेरचे लेखापरिक्षण अहवाल, ३१. ०३.२०१० | अपक्ष उमेदवार असुन नामनिर्देशित पालिका सदस्यासाठी प्रमाणशिर प्रतिनिधित्व अनुज्ञेय नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रोजीचा उत्पन्न व खर्चाचा अहवाल, ३१. ०२.२०११ चा लेखापरिक्षण अहवाल. | |
| ४ | श्री. देविंन्दरसिंग सी. खेमानी ब्लॉक नं. ए ८४३/ १६८५ गांधीरोड, उल्हासनगर–५. **राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी** | बी.ए. (इकॉनॉमिक्स) | आसरा चारिटेबल ट्रस्ट, ब्लॉक नं. ८४३/ १६८५ समोर गांधीरोड, उल्हासनगर–५. | **मॅनेजिंग ट्रस्टी** दि. २६.०६. १९९८ ते आजपर्यंत **सभापती** दि .१८.१२. २००६ ते आजपर्यंत | मतदार यादीतील पृष्ठ, धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र, बी.ए. चे प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, प्रस्तावित नामनिर्देशनासाठी संस्थेचा ठराव व संस्थेचे पत्र, दिनांक ३१.०३. २०११ अखेरच्या लेखा परिक्षण अहवाल, अनुसुची बारा मधील कामासंदर्भातील प्रमाणपत्र. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी ३०३, महाराजा अपार्टमेन्ट, अमन टॉकीज रोड, उल्हासनगर–२. **राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी** | इयत्ता ११ वाणिज्य | बहुजन विकास शिक्षण प्रसारक मंडळ, नालंदा शाळेच्या पाठीमागे, दहा चाळ, उल्हासनगर–४. | **उपाध्यक्ष** दि. १५.०५. २००६ ते आजपर्यंत | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्षांचे शिफारस पत्र, शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीचा पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्त यांचेकडे अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेले प्रमाणपत्र व | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, आणि राष्ट्रवादी गटनेता कडून अधिकृत उमेदवार असल्याने शिफारस पत्र प्राप्त आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अधिनियम १९५० अन्वये नोदंणी केलेले प्रमाणपत्र, संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, अनुसुची बारा अनुसार कामाचे प्रमाणपत्र, २००४ ते २०१० लेखा परिक्षण अहवाल, | |
| ६ | श्री. हरदास सन्मुखदास माखिजा ५०२, हिरापन्ना अर्पाटमेंन्ट, गोल मैदान उल्हासनगर—१. **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस** | इन्टर आर्टस (बी.ए.) | आदर्श शिक्षण समिती, कैलास कॉलनी, उल्हासनगर—५. | **अध्यक्ष**, जानेवारी १९९५ ते ऑक्टोंबर २०११. | संस्थेचे शिफारस पत्र, बोनाफाईड सर्टीफीकेट, संस्थेचा ठराव, प्रतिज्ञापत्र, २००६.०७, ०७.०८, ०८—०९, ०९—१०, जमाखर्चाचा अहवाल, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ७ | श्री. राजु (जीवन) चद्रंभान इदनानी सिमरन पार्क, फ्लॅट नं. ६०१, सिटी टॉवरच्या मागे, उल्हासनगर—३. **सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया** | इ. १२ वी उत्तीर्ण | ब्राम्हणपाडा एज्युकेशन सोसायटी, ब्राम्हणपाडा, शिवकॉलनी, शांतीनगर, उल्हासनगर—३. | **उपाध्यक्ष**, ऑगस्ट २००६ ते आजपर्यंत | प्रतिज्ञापत्र, शाळा सोडल्याचा दाखला, १२ वी ची गुणप्रत्रिका, संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र, मार्च ०९—मार्च व मार्च ११ चा लेखा परिक्षण अहवाल, | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ८ | श्री. प्रदीप अर्जुनदास रामचंदानी जी/१, पुजा अर्पाटमेंन्ट, उल्हासनगर—३. **भारतीय जनता** | बी.कॉम. | रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर (पू), | **अध्यक्ष, संचालक व सभापती,** दिनांक १. १२.१९९२ ते २०१२ | प्रतिज्ञापत्र, मतदार यादीचे पृष्ठ, शिफारस पत्र, संस्थेचा ठराव, २००८—०९, ०९—१०, १०—११ चा | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **पार्टी** | | | | लेखापरिक्षणाचा अहवाल, बी. कॉम चे प्रमाणपत्र | |
| ९ | श्री. शकंर गोविदंराम लुंड<br>सी ब्लॉक, ६२८/१२५६, नेताजी रोड, उल्हासनगर–४.<br>**शिवसेना** | एस.एस. सी पास | अनिल मार्टियल आर्ट चारिटेबल ट्रस्ट, ४०५, सागर अर्पाटमेन्ट, साधु वासववानी, पुतळयासमोर, उल्हासनगर–१. | **अध्यक्ष**, दि. १५.६. ०६ ते १५. ६.१२ | शाळा सोडल्याचा दाखला, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, धर्मादाय आयुक्तांकडे संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मार्च ०८ मार्च ०९ व मार्च १० चा उत्पन्न खर्चाचा अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| १० | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी<br>श्रीकृष्णा कॉटेज, प्लॉट नं. ७२९, ७३०, गुजराथी शाळेमागे, उल्हासनगर–१.<br>**भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस** | इ. ११ वी | साईबाबा एज्युकेशनल ट्रस्ट, बॅ.नं. १०९७ समोर, साईभवन, ओटी सेक्शन, उल्हासनगर–३. | **सह सचिव**, दि. २००५ ते २०१२ | मतदार यादीचे पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, इ. ११ वी चे प्रमाणपत्र, मार्च ०९ ते मार्च १०, मार्च ११ लेखा परिक्षण अहवाल | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |
| ११ | डॉ. गुंल हुदंराज भाटीया<br>१०२, शालुपॅलेस, रिजन्सी हॉटेल शेजारी, उल्हासनगर–२.<br>**शिवसेना** | बी.ए. एम.एस, मुबंई विद्यापिठ | | **वैद्यक व्यवसायी** म्हणुन प्रमाणपत्र मिळाल्याचा दिं. जुन १९७९ पासुन | बी.ए.एम.एस. चे प्रमाणपत्र, गुणप्रत्रिका, प्रतिज्ञापत्र. | नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असण्याऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीची पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करण्या प्रयोजनार्थ नियम ४ क प्रमाणे पात्र. |
| १२ | श्री. गोविदंराम डोलुमल लुंड<br>ब्लॉक सी ६२८/१२५५, नेताजी रोड, दिपक | — | पुज्य पचांयत, दिपक दरबार, व मंदीर, नेताजी रोड, उल्हासनगर–४. | **उपाध्यक्ष**, दिनांक १५.०६. २००५ ते आजपर्यंत | संस्थेचा ठराव, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्तांकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मार्च | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दरबार जवळ,<br>उल्हासनगर–४.<br>**भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस** | | | | २००८ ते मार्च ०९, मार्च २०१०–११ चा लेखा परिक्षण अहवाल. | |
| **१३** | श्री. भानजी भिकारी मोरे<br>डॉ. आबेंडकरनगर, चोपडा कोर्टाजवळ, उल्हासनगर–३.<br>**शिवसेना** | जुनी ११ वी | अक्षय शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था, इगतपुरी, नाशिक. | **उपाध्यक्ष**, दि २५.८. १९९९ ते २.४.२०१२ | शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीचे पृष्ठ, नगरसेवक म्हणुन निवडून आल्याचे प्रमाणपत्र, इ. ११ वी चे प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचे शिफारस पत्र, संस्थेचा ठराव. मार्च २००८–०९ ते २०१०–११ चे लेखा परिक्षणाचा अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, उमेदवार ज्या संस्थेचा पदाधिकारी आहे ती संस्था कार्यरत असुन नाशिक जिल्हयामध्ये नोदंणीकृत आहे म्हणुन महापालिका क्षेत्रात कार्यरत नाही. सदरहु संस्थेचे सलग ३ वर्षाचे एकूण वार्षिक उप्तन्न व खर्च रु. २५,०००/– च्या पूढे नाही त्यामुळे भारतीय संविधनाच्या अनुसूची १२ मध्ये महानगरपालिकेची जी कामे दर्शविली आहेत त्यांच्याशी संबंधित कार्यक्रम कामी २५,०००/– चा एक प्रकल्प सदस्यांच्या नामनिर्देशनाच |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | या आधीच्या ३ वर्षात पूर्ण केल्याचे प्रमाण दिसून येत नाही. |
| १४ | श्री. सुरेद्र बाळकृष्ण सावंत<br>मेराघर अर्पाटमेन्ट, २०४, दुसरा माळा, मराठा सेक्शन, उल्हासनगर—४.<br><br>**शिवसेना** | एस.एस.सी | ज्ञानदा वाचनालय, उल्हासनगर—४. | **अध्यक्ष**, दि. २५.१२. २००१ ते २४.१२. २००६ तसेच दि.२६.१. २००८ ते आजपर्यंत | संस्थेचा ठराव, पत्र, प्रतिज्ञापत्र, शाळा सोडल्याचा दाखला, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी प्रमाणपत्र, मतदार यादीचे पृष्ठ, मार्च २००७, मार्च २००९, मार्च २०१० चे लेखा परिक्षण अहवाल. | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे, त्यामध्ये श्री. रविंद्र नामनारायण ओझा या नांवाच्या उमेदवारांने हरकत घेतली आहे की वाचनालयाची नोंदणीकृत संस्था नियम ४ (छ) मध्ये पात्र ठरविता येणार नाही. नियम ४ (छ) अनुषंगाने संबंधित संस्थेचे मुबंई सार्वजनिक संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत आहे. |
| १५ | श्री. रविंद्र रामनारायण ओझा<br>महाराष्ट्र मित्र मंडळा शेजारी, उल्हासनगर—१.<br><br>**शिवसेना** | जुनी ११ वी | महाराष्ट्र मित्र मंडळ, उल्हासनगर—१. | **सचिव**, दि. १.०४. १९९२ ते ३१.३.२०१३ | मतदार यादीतील पृष्ठ, प्रतिज्ञापत्र, संस्थेचा ठराव, मार्च २००९ मार्च २०१०, मार्च २०११ चा लेखा परिक्षण अहवाल, धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्था नोंदणी | नियम ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे अर्जदाराने कोणत्या कालावधी साठी पदधारण केले आहे त्याचा उल्लेख विहित नमुन्यातील ठरावात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमाणपत्र | दिसुन येत नाही, परंतु वेगळया प्रमाणपत्राव्दारे ते स्पष्ट केले आहे. |

नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी अर्जदाराने किंवा संस्थेने प्रस्तुत केलेल्या सर्व कागदपत्रांची चौकशी केल्याशिवाय प्रथम दर्शनी बरोबर आहे. त्यात जर कोणत्याही प्रकारची फसवणुक किंवा दोष असल्याचे आढळुन आल्यास त्यासाठी संबंधीत संस्था व उमेदवार जबाबदार राहील असे उमेदवारांकडुन व्यक्तीगत प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्यां) नियम २०१२ मधील नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीचे पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतु प्राप्त झालेल्या अर्जावरील नियम ४ (क) मधील अर्हतेसाठी एकच अर्ज प्राप्त झाला आहे, तसेच नियम ४ (ड) अर्हतेसाठी एकच अर्ज प्राप्त झाला आहे, आणि राहिलेले १३ अर्ज नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी प्राप्त झाले आहेत.

अनुक्रमांक २ मधील उमेदवार ॲड. अनिल आयलानी हे नियम ४ (ड) प्रमाणे पात्र आहेत. परंतु पक्षाच्या समंतीशिवाय त्यांचे नामनिर्देशन करता येणार नाही. आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे गटनेत्याच्या पत्रानुसार त्या पक्षाचे अधिकृत उमेदवार श्री. मनोज सयानी हे असल्याचे दिसते, म्हणुन दुसरा पर्याय उपलब्ध नाही, तसेच नियम ४ (छ) प्रमाणे सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया व भाजपा कडुन एकेक एक उमेदवार असुन दुसरा पर्याय नसल्याने त्यांचे नामनिर्देशन करणे टाळता येणार नाही म्हणुन अनुक्रमांक ७ वरील उमेदवार श्री. राजु (जीवन) इदनानी व अनुक्रमांक ८ वरील उमेदवार श्री. प्रदिप रामचदांनी यांचे नामनिर्देशन टाळता येणार नाही. तसेच अनुक्रमांक ११ वरील उमेदवार डॉ. गुल भाटीया हे नियम ४ (क) प्रमाणे पात्र असुन जर शिवसेना पक्षाने त्यांना अधिकृत उमेदवार ठरविला तर त्याप्रमाणे शिफारस करता येईल. अनुक्रमांक ६ वरील उमेदवार श्री. हरदास माखिजा याना अडीच वर्षाचा महापौर पदाचा अनुभव असुन त्यांना नियम ४ (छ) च्या अर्हते व्यतीरिक्त प्राधान्य देण्यासारखे आहे, जर उमेदवार पक्षातर्फे अधिकृत ठरल्यास त्यांची शिफारस करणे योग्य वाटते.

म्हणुन प्रत्येक अर्हतेसाठी एक पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करता येणार नाही, तरीदेखील अनुक्रमांक ५,६,७,८ व ११ वरील उमेदवारांचे नावाच्या शिफारसीचा विचार करुन पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी प्रस्तावित.

परंतु शिफारस केलेल्या व्यक्तींची शिफारस महापालिकेने अमान्य करण्याचे ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

**विशेष महासभा ठराव क्रः—** २ **दिनांक : ०९/०४/२०१२**

सुचकाचे नावः— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नावः— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत प्रत्येक उमेदवारासमोर आयुक्तांनी दर्शविलेला शेरा व नामनिर्देशित सदस्य पदासाठी ५ व्यक्तींची शिफारस विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ४ (छ) च्या अर्हतेसाठी व्याख्यीकरण व स्पष्टीकरणाच्या कमतरतांमुळे व पक्षीय बलाबलानुसार अनाधिकृत अर्जदारांचा विचार न करता विविध पक्षातील खालील ५ उमेदवारांचे नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन करण्यास मान्यता देत आहे.

१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी

२. श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी

३. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

४. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी

५. श्री. बी. बी. मोरे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र ४:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे .

**प्रस्तावना:—**

सन—२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. दिनांक १७/२/२०१२ निवडणूक निकालानंतर व दिनांक २०/२/२०१२ रोजी अधिसुचनाव्झारे निवडून आलेल्या सदस्याचे नाव जाहिर केल्यावर आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३१ अ च्या तरतुदी अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्या प्रयोजनार्थ मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन येथे फ्रट किंवा आघाडीची नोंदणी झाल्यावर पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | आघाडी किंवा फ्रंट झाल्यावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २० | ० | — | २० |
| शिवसेना | १९ | ० | — | १९ |
| भाजपा | ११ | ० | — | ११ |
| कॉंग्रेस | ८ | ० | — | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | +३ | — | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | — | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | —२ | — | ०० |
| अपक्ष | ०१ | ०१ | — | ०० |
| मनसे | ०१ | ०० | — | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१ | ००<br>००<br>००<br>०० | —<br>—<br>—<br>— | ०१<br>०१<br>०१<br>०१ |
| एकूण | ७८ | | | ७८ |

महापालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स आफ इंडिया गट | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

| 78 | = 4-87 |
|---|---|
| 16 | |

स्थायी समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ४.८७ असणे आवश्यक आहे.

त्याअनु ंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २० / ७८ X १६ | = ४.१० | (७) | मनसे | १ / ७८ X १६ | त्र ०.२० |
| (२) | शिवसेना | १९ / ७८ X १६ | = ३.८९ | (८) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | त्र ०.०६ |
| (३) | भाजपा | ११ / ७८ X १६ | = २.२५ | (९) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | त्र ०.०६ |
| (४) | साई | १० / ७८ X १६ | = २.०५ | (१०) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | त्र ०.०६ |
| (५) | कॉंग्रेस | ८ / ७८ X १६ | = १.६४ | (११) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | त्र ०.०६ |
| (६) | आरपीआय | ४ / ७८ X १६ | = ०.८२ | (१२) | अपक्ष | १ / ७८ X ०५ | त्र ०.०६ |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | साई | कॉंग्रेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ३ | २ | २ | १ | १२ |

यानंतर रिक्त राहणाऱ्या **चार** जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

(१) **शिवसेना** ०.८९ (२) **आर.पी.आय** ०.८२ (३) **कॉंग्रेस** ०.६४

(४) **रा.का.पा.** ०.१० (५) **भा.ज.पा.** ०.२५ (६) **अपक्ष** ०.२०

(७) **साई** ०.०५ (८) **जनविकास आघाडी** ०.०२

वरील परिस्थिती पहाता शिवसेना, आरपीआय, कॉंग्रेस व भा.ज.पा. या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे **चार रिक्त** जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे स्थायी समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| रा.का.पा. | शिवसेना | भाजपा | साई | कॉंग्रेस | आरपीआय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ | २ | १ | १६ |

**विशेष महासभा ठराव क्र.:– ३** **दिनांक :– ०९/०४/२०१२**

सुचकाचे नावः– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नावः– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील सोळा सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करीत आहे.

१. श्री. रमेश चव्हाण

२. श्री. सुरेश जाधव

३. सौ. ज्योती गायकवाड

४. सौ. नेहा भोईर

५. श्री. राम (चार्ली) पारवानी

६. सौ. मिना कुमार आयलानी

७. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी

८. श्री. अकुंश म्हस्के

९. डॉ. महेश गावडे

१०.सौ. पचंशीला नाना पवार

११.सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

१२.सौ. आशा प्रभुनाथ गुप्ता

१३.श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर

१४.श्री. राजू रामसिंग कंडारे

१५.सौ. जया मोहन साधवनी

१६.श्री. गोदुमल किशनानी

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते मंजुर**

**महापौर/पीठासीन अधिकारी**
**विशेष महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**उल्हासनगर महानगरपालिका**

**विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

**महासभा ठराव क्र. ४ ब** **दिनांक :—१९/५/२०१२**

ही महासभा आज दिनांक १९/५/२०१२ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषय :—** आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**महासभा ठराव क्र. :— ४ क** **दिनांक : १९/५/२०१२**

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील दोन विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १ :—** कै. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, उ.मपा. यांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे.

**विषय क्र. २:—** १ एप्रिल २०१२ ते १९ एप्रिल २०१२ या कालावधीत महापालिकेला झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) व ४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) तसेच विशेष महासभा दिनांक १९/४/२०१२
रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. राजु जग्यासी

महासभा ठराव क्र. ४ ड  दिनांक:—१९/५/२०१२

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/३/२०१२ (त्यात २८/३/२०१२) रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते २९ पर्यंतचे व दिनांक ४/४/२०१२ (त्यात ९/४/२०१२) रोजीच्या सभेचे पृष्ठ क्र. १ ते ३७ पर्यंतचे तसेच दिनांक १९/४/२०१२ रोजीच्या विषेश महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :–** श्रीमती द्रोपदी सुदाम झारेकर सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. द्रौपती सुदाम झारेकर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३०/०९/२०११ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ५ **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती द्रोपदी सुदाम झारेकर सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र.** ४:–४ सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रीम. कांता साधु उमाप | ३१/०५/२०१२ |
| २ | श्रीम. रतन लक्ष्मण चोहाण | ३१/०५/२०१२ |
| ३ | श्रीम. हरकेश बांकेलाल | ३१/०५/२०१२ |
| ४ | श्रीम. उत्तम लहानु साळवे | ३१/०५/२०१२ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ६ दिनांक:–१९/५/२०१२

सुचकाचे नाव :– श्री. दिलीपकुमार जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ४ सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासुन महापालिका सेवेतून स्वेच्छा निवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** वारसा पध्दतीने ०७ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत्यू दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. टिल्लु रामभाऊ सोनवणे | ३०/६/२०११ | श्री. नितीन टिल्लु सोनवाणे | मुलगा |
| २ | श्री. कंच्छी सुमेरा खैरालिया | ३१/५/२००५ | श्री. सचिन महिपाल खैरालिया | नातू |
| ३ | श्रीम. लक्ष्मी कालु ढकोलिया | ३१/३/२०११ | श्री. राकेश कालु ढकोलिया | मुलगा |
| ४ | श्रीम. चतुराबाई सोना पालांदे | ३१/१०/२०१० | कु. जया सोना पालांदे | मुलगी |
| ५ | श्रीम. केलाबाई मामचंद ढकोलिया | १२/१२/२००८ | श्री. मनिष मामचंद ढकोलिया | मुलगा |
| ६ | श्री. भगवान गोपाल साठे | २७/६/२०११ | श्री. विकास भगवान साठे | मुलगा |
| ७ | श्री. शिवाजी बली भालेराव | ३१/८/२०११ | श्री. पंडीत शिवाजी भालेराव | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्काने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ७ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पुष्पा बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने ०७ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे नावासमोर उल्लेखिलेल्या त्यांच्या ०७ नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६:–** वारसा पध्दतीने ४ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांच्या वारसास नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | स्वेच्छा सेवानिवृत्त / मृत्यू दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. लक्ष्मी ओमप्रकाश डिके | ३१/१२/२०१० | श्री. नंदु ओमप्रकाश डिके | मुलगा |
| २ | श्रीम. गीता धनराज वाल्मीकी | ३०/६/२०११ | श्री. दिनंश धनराज वाल्मीकी | मुलगा |
| ३ | दिवंगत. हरेश श्यामजी मांडविया | ०८/६/२०११ | श्रीम. पार्वती हरेश मांडविया | पत्नी |
| ४ | श्री. राजेंद्र प्यारेलाल बेहनवाल | ३१/७/२०११ | श्री. रविंद्र राजेंद्र बेहनवाल | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ८**          **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वारसा पध्दतीने ४ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे नावासमोर उल्लेखिलेल्या त्यांच्या ०४ नातेवाईकांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ७:–** दिवंगत सफाई कामगार श्री. गणपत हरीशंकर गोयर यांच्या जागी श्रीमती सीमा

नटवर गोयर यांना वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा(वशिला)पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत, नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार, महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सेवा निवृत्त/दिवगंत सफाई कामगार/मुकादम यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे त्यांचे वारसाचे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | मृत्यूचा दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणपत हरीशंकर गोयर | ३/३/२०१० | श्रीम सीमा नटवर गोयर | सुन |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त/दिवंगत, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ९** **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. रामचंद्र पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिवंगत सफाई कामगार श्री. गणपत हरीशंकर गोयर यांच्या जागी श्रीमती सीमा नटवर गोयर यांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ८:–** मयत कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती देणेकामी दिनांक २०/६/२०११ रोजी पारीत केलेल्या महासभा ठराव क्र. १८ मध्ये अंशत: बदल करुन श्री. सुभाष पंढरीनाथ बोरुडे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरुडे

यांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १/११/२०११ रोजीच्या विनंती केली आहे की, त्यांचे पती उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मजूर या पदावर कर्यरत होते. त्यांचा दिनांक २१/१२/२०११ रोजी निधन झाले आहे. मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये माझे पतीच्या जागी श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांची नेमण करण्यात आली आहे. सदर नेमणुक रद्द करून श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करण्यात यावी ही विनंती केली आहे.

श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक २४/२/२०११ रोजीच्या अर्जान्वये त्यांचा नातु श्री. गणेश आण्णासाहेब बारूडे यांची नेमणुक करणेसाठी अर्ज केला होता. श्री. गणेश आण्णासाहेब बोरूडे हे वारस नसल्याने त्यांची ठोक वेतनावर नेमणुक करण्यात आली नाही.

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ठोक वेतनावर नेमणुक करण्यात आलेली आहे त्यानुसार श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांचे नांव पुर्वीच्या यादीवर असल्याने कार्यलयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११, २५ ऑक्टोंबर, २०११ रोजीच्या आदेशान्वये नेमणुक करण्यात आली आहे.

श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १७ ऑगस्ट २०११ रोजी वडिलांच्या जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे

श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांनी नेमणुकीचे आदेश स्विकारलेले नाही. कै. पंढरीनाथ सखाराम बोरूडे यांच्या पत्नी श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांचे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करणेबाबत संमतीपत्र दिले आहे.

श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांनी श्री. सुनील पंढरीनाथ बोरूडे यांना नेमणुक करणेबाबत हरकत नसल्याचे ना हरकत तथा संमतीपत्र दिले आहे.

तरी श्रीम. विठाबाई पंढरीनाथ बोरूडे यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री. सुभाष पंढरीनाथ बोरूडे यांची नेमण रद्द करून श्री. सुनिल पंढरीनाथ बोरूडे यांची नेमणुक करणेसाठी मा. महासभेच्च्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १०** — **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती पंचशिला पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मयत कर्मचा-यांच्या वारसांना ठोक वेतनावर नियुक्ती देणेकामी दिनांक २०/६/२०११ रोजी पारीत केलेल्या महासभा ठराव क्र. १८ मध्ये अंशत: बदल करुन श्री. सुभाष पंढरीनाथ बोरुडे ऐवजी श्री. सुनिल पंढरीनाथ बोरुडे यांच्या नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ९:–** मयत झालेल्या कर्मचा–यांच्या वारसांना करारपध्दतीने नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर आदेशाचे दिनांकापासुन करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मा. महासभेमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार वर्ग–क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/– व वर्ग–ड च्या उमेदवारांना रू ५४६५/– या ठोक वेतनावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५१ /११, दिनांक २० ऑगस्ट, २०११ आदेशान्वये उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यात आली होती. सदर नेमणुकीचा कालावधी दिनांक १९ फेब्रुवारी २०१२ रोजी संपुष्टात येत असुन दिनांक १९ व २०फेब्रुवारी २०१२ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने त्यामुळे त्यांना दिनांक २१/२/२०१२ रोजी एक दिवस सेवा खंड देवुन त्यांना दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(लिपीक वर्ग – क)**

| अ.क्र. | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज के ठाकुर | लिपीक | मालमत्ता विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही. |
| २ | श्री. विशाल ईश्वर निंगो | लिपीक | पाणी पुरवठा विभाग | |
| ३ | श्री. प्रतिक रमेश गायकवाड | लिपीक | जकात विभाग | |
| ४ | श्री. गिरिश गिरधारीलाल ठाकूर | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही. |
| ५ | श्री. जितेंद्र महातिम सिंग | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | |
| ६ | श्री. संतोष आसाराम शिरसाट | लिपीक | जन्म मृत्यू नोदणी विभाग | |
| ७ | श्री. किरण अशोक मखरे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| ८ | श्री. मुकेश मु. पवार | लिपीक | नगरीक सुविधा केंद्र | |
| ९ | श्री. नितिन वसंत निकम | लिपीक | जकात विभाग | |
| १० | श्री. संदेश प्रभाकर भांडारकर | लिपीक | विद्युत विभाग | |
| ११ | श्री. शंकर प्रकाश रामरख्यानी | लिपीक | विद्युत विभाग | सदर उमेदवार हजर झालेले नाही |
| १२ | गौतम भिमा ससाणे | लिपीक | सामान्य प्रशासन विभाग | |
| १३ | श्री. रविंद्र सखाराम दंडगव्हाळ | लिपीक | लेखा परिक्षण विभाग | |
| १४ | श्री. राहुल सुभाष मोकळे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| १५ | श्री. शंकर भिकन अहिरे | लिपीक | उप आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय | |
| १६ | श्री. विकास शिवाजी तांबे | लिपीक | वाहन विभाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | श्री. रूपेश दिलीप पवार | लिपीक | क्रिडा विभाग | |
| १८ | गौरव रा. कलवानी | लिपीक | नागरीक सुविधा केंद्र | |
| १९ | पुजा ओमप्रकाश गुरनानी | लिपीक | लेखा विभाग | |
| २० | श्रीम. सुलताना अब्दुल पिंजारी | लिपीक | महापालिका दवाखाना | |

**(शिपाई, वर्ग — ड)**

| **अ.क्र.** | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दिपक चंद्रकांत जाधव | शिपाई | नागरीक सुविधा केद्र | |
| २ | श्रीम. सोनाली शामराव पाटणकर | शिपाई | क्रिडा विभाग | |
| ३ | श्री. मनोज सिताराम कांबळे | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |
| ४ | मंज्या मल्लप्पा गौडा | शिपाई | महापालिका दवाखाना | |
| ५ | श्रीम.लाजवंती उदासी | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |

**(मजूर, वर्ग — ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कु. उषा रूंजाजी त्रिभुवन | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| २ | श्री. सागर बबन दाभाडे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ३ | श्री. केशव धर्मा नवले | मजूर | पाणी पुरवठा विभाग | |
| ४ | कु. संतोष भानुदास काळे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग | |
| ५ | श्री. प्रतिक पोळेकर | मजूर | पाणी पुरवठा विभाग | |

**(विद्युत मदतनीस, वर्ग — ड)**

| अ.क्र. | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रवि शिवाजी देवरे | विद्युत मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| २ | श्री. भारत गोप शर्मा | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ३ | श्री. पुंडलीक बारकू भोईर | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ४ | श्रीम. कपिल पंडीत केणे | विद्युत मदतनीस | मा.उप महापौर कार्यालय | |
| ५ | वाल्मिक बाबुलाल पवार | विद्युत मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| ६ | श्री. सुधीर गुलाब दानी | विद्युत मदतनीस | विद्युत विभाग | |

**(वाहन मदतनीस, वर्ग — ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. संगिता दगडू शेजवळ | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| २ | श्री. सुनिल भागा मोकाशी | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. रामपाल मोतीलाल टाक | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| ४ | श्री. लक्ष्मण नाना शेरे | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| ५ | श्री. धनंजय पांडुरंग गायकवाड | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| ६ | श्रीम. गुलाब अनिल खंबाळकर | वाहन मदतनीस | सामान्य प्रशासन विभाग | |
| ७ | श्री. दिपक मारूती गायकवाड | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| ८ | श्री. गणेश बारकु म्हात्रे | वाहन मदतनीस | मा. स्थायी समिती कार्यालय | |
| ९ | श्री. शंकर बाबूराव भवाळ | वाहन मदतनीस | अग्निशमन विभाग | |
| १० | श्री. मनोज रामलाल पवार | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| ११ | श्रीम. किरण सुरेश राजपूत | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १२ | श्री संजय रोहिदास खंडागळे | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १३ | श्रीमती सुवर्णा लक्ष्मणा मनवे | वाहन मदतनीस | सुरक्षा विभाग | |
| १४ | श्री. अमर अनंता शेलार | वाहन मदतनीस | वाहन विभाग | |
| १५ | श्री. भगवान नामदेव खांबाळकर | वाहन मदतनीस | अग्निशमन विभाग | |

**(सफाई कामगार, वर्ग — ड)**

| अ.क्र. | **मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव** | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक गंगाराम निकम | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |
| २ | श्री. दिपक प्रभु गोतारणे | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |
| ३ | श्री. नितिन बंडू जाधव | सफाई कामगार | आरोग्य विभाग | |

उपरोक्त विविध पदांवर मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांची तात्पुरत्या स्वरूपात ठोक वेतनावर सहा महिन्यासाठी दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुर्ननेमणुक करणेसाठी उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५१/११, दिनांक २० ऑगस्ट, २०११ च्या आदेशामध्ये नमुद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ११** दिनांकः—१९/५/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वर उल्लेखलेल्या वारसांना वर्ग—३ व वर्ग—४ मध्ये अनुकंपा तत्वाने ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर करारपध्दतीने दिनांक २२ फेब्रुवारी २०१२ पासुन पुढील ६ महिन्यासाठी ठोक वेतनावर नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १०:–** श्री. गोपीनाथ फुलोरे यांना दिनांक १७/४/२०१२ पासून मजूर/वॉलमन या पदावर
सहा महिन्याकरीता रु. ४४४०-७४४०-ग्रेड पे रु. १३०० या वेतन श्रेणीत तात्पुरत्या
स्वरुपात नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

श्री. गोपीनाथ फुलोरे, **'मजुर/वॉलमन',** पाणी पुरवठा यांची दिनांक मा. महासभा ठराव क्र. ६४, दिनांक २१/१२/२०११ अन्वये दिनांक १५/१०/२०११ पासून पुढील सहा महिन्यासाठी नेमणुक करण्यात आली होती.

तरी श्री. गोपीनाथ फुलोरे यांची सेवा दिनांक १४/०४/२०१२ रोजी संपुष्टात आल्याने दिनांक १५/४/२०१२ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दिनांक १६/०४/२०१२ रोजी ०१ दिवसाचा खंड देवुन दिनांक १७/०४/२०१२ पासुन पुढील ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी **'मजुर/वॉलमन'** या पदावर रु. ४४४.–७४४०, ग्रेडपे १३०० या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:** १२ **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गोपीनाथ फुलोरे यांना दिनांक १७/४/२०१२ पासून मजूर/वॉलमन या पदावर सहा महिन्याकरीता रु. ४४४०-७४४०-ग्रेड पे रु. १३०० या वेतन श्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीस पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ११ :–**१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २८/२/२०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने

पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, यांचेकडील दिनांक १६/१/१२ रोजीच्या पत्रान्वये पाले ते गायकवाड पाडा, उल्हसनगर – ५ दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याचे दृष्टीने बाधीत झालेले १) श्री. अशोक सखाराम वायले, २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्रम्हण तरे यांना स्थायी (कायम) स्वरूपी पदाचे आदेश देणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.

मा. महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २४/८/२०११ रोजीच्या ठरावान्वये १) श्री. अशोक सखाराम वायले, २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले, ४) श्री. राजेश ब्रम्हण तरे यांना दिनांक २५/८/२०११ पासुन पुढील ०६ महिन्याची मुदत वाढ देवुन रू.४४४०–७४४० या वेतनश्रेणीमध्ये मजूर/वॉलमन या पदावर नेमणुक करण्यात आली होती. ०६ महिन्याची मुदत दिनांक २५/२/२०१२ रोजी संपत आहे. परंतु दि. २५/२/२०१२ चौथा शनिवार व २६/२/२०१२ रोजी रविवार सुट्टी असल्याने दिनांक २४/२/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २७/२/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २८/०२/२०१२ पासुन पासुन पुढील ०६ महिन्यांकरीता **''मजूर/वॉलमन''** या पदावर तात्पुरत्या स्वरूपात रू. ४४४०–७४४० ग्रेड पे १३०० या वेतनश्रेणीत ०६ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात मुंबई प्रांतिम महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करणेबाबत सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे..

**महासभा ठराव क्र: १३** **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले, २) श्री. अशोक सखाराम वायले, ३) चंद्रकांत गुरुनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक २८/२/२०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने पुढील ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १२:—** मयत कर्मचा—यांच्या वारसांना दिनांक २६ एप्रिल, २०१२ पासुन सहा महिन्याची मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर आदेशाचे दिनांकापासुन करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मा. महासभेमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार वर्ग—क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/— व वर्ग—ड च्या उमेदवारांना रू ५४६५/— या ठोक वेतनावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११,दि. २५ ऑक्टोंबर, २०११ आदेशान्वये उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यात आली होती. सदर नेमणुकीचा कालावधी दिनांक २४ एप्रिल २०१२ रोजी संपुष्टात येत असुन दिनांक २५/४/२०१२ रोजी एक दिवस सेवा खंड देवुन त्यांना दिनांक २६ एप्रिल २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(लिपीक वर्ग — क)**

| अ.क्र. | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सिमरन नरेश सितलानी | लिपीक | जनगणना कक्ष | |
| २ | श्री. प्रकाश मधूकर जावळे | लिपीक | मालमत्ता विभाग | |
| ३ | श्री. विशाल लक्ष्मण ढोले | लिपीक | नगररचना विभाग | |

**(शिपाई, वर्ग — ड)**

| अ.क्र. | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती द्वारकाबाई विष्णू लाटे | शिपाई | सामान्य प्रशासन विभाग | |
| २ | श्री. रोहित किशोर मानकर | शिपाई | पाणी पुरवठा विभाग | |
| ३ | श्री. दिलीप भागोजी निकम | शिपाई | पाणी पुरवठा विभाग | |

**(वाहन मदतनीस, वर्ग — ड)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रविंद्र शालिक निकम | वाहन मदतनीस | पाणी पुरवठा विभाग | शेरा |
| २ | श्री. पवन सुरेश कमाने | वाहन मदतनीस | पाणी पुरवठा विभाग | |

उपरोक्त विविध पदांवर महापालिका सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांची तात्पुरत्या स्वरूपात ठोक वेतनावर सहा महिन्यासाठी दिनांक २६ एप्रिल २०१२ पासुन पुर्ननेमणुक करणेसाठी जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११, दिनांक २५ ऑक्टोंबर, २०११ च्या आदेशामध्ये नमुद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करण्यासाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १४ दिनांकः—१९/५/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मयत कर्मचा—यांच्या वर उल्लेखलेल्या वारसांना दिनांक २६ एप्रिल, २०१२ पासुन पुढील सहा महिन्यासाठी ठोक वेतनावर मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. १३ :–** श्री. बबलु गजानन भोईर यांना दिनांक २८/३/२०१२ पासुन पुढील सहा

महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. बबलु गजानन भोईर यांना मजूर या पदावर जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/४११/११, दिनांक २५ मार्च २०११ व उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५२९/११, दिनांक १५/११/२०११ रोजीच्या रोजीच्या आदेशान्वये सहा महीने कालावधी करीता निवळ तात्पुरत्या स्वरूपात दरमहा ५५१३/– एवढया तत्वावर नेमणुक करण्यात आली होती. सदर कालावधीची मुदत दिनांक २६/०३/२०१२ रोजी संपली असुन दिनांक २७/०३/२०१२ रोजी एक दिवसाचा खंड देवुन दिनांक २८/०३/२०१२ पासुन पुढील सहा महीने कालावधी करीता निवळ तात्पुरत्या स्वरूपात दरमहा ५५१३/– एवढया तत्वावर नेमणुक करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १५ <u>दिनांक:–१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. बबलु गजानन भोईर यांना मजूर या पदावर दिनांक २८/३/२०१२ पासुन पुढील सहा महिन्याची मुदतवाढ देणे मान्य करीत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १४:—** श्री. दिलीप गणपत कडव, मजूर यांची पत्नी श्रीमती कविता दिलीप कडव यांच्या प्रसृतीसाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेची( रुपये २,५८,९४५/- ची) विशेष बाब म्हणुन प्रतिपूर्ती करणे.

**प्रस्तावना**

श्री. दिलिप गणपत कडव, मजूर यांनी त्यांची पत्नी श्रीम. कविता दिलीप कडव यांच्या प्रसूतीसाठी रु २,८७,७१७.४४ एवढा खर्च झाला आहे. त्याची रक्कम मिळणेबाबत दि. २१/११/२०११ रोजी विनंती अर्ज केला आहे.

श्रीम. कविता दिलीप कडव यांना दि. २९/६/२०११ रोजी व्ही एस. जनरल हॉस्पीटल, जिल्हा शल्यचिकित्सक ठाणे येथे प्रसूती करिता दाखल करण्यात आले असता त्यांना दोन मुली व एक मुलगा अशी तीन आपत्ये झाली सदर मुलांची प्रकृती चिंताजनक असल्याने दोन मुलांस उपचारार्थ दि. ३/७/२०११ रोजी लाईफ लाईन हॉस्पीटल ठाणे. येथे उपचार्थ दाखल करण्यात आले होते. त्यापैकीएक आपत्यास दि. १७/७/२०११ रोजी डिस्चार्ज देण्यात आला होता. व दि. १३/८/२०११ रोजी दुस—या मुलाला डिस्चार्ज देण्यात आला सदर कालावधीत त्यांना रु. २,८७,७१७.४४ एवढा खर्च आला आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ मधील ८(४) नुसार शासकिय रुग्णालयात उपलब्ध नसणारे विशेष प्रकारचे उपचार पुरविणा—या अशासकिय रुग्णालयात एखादया रुग्णाला पाठविणे त्याच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्याक आहे असे प्रधिकृत अधिका—यास वाटले तर त्याबाबतीत तो जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या लेखी पूर्व मान्यतेने जवळच्या अशासकिय रुग्णालयात रुग्णाला पाठवू शकतो. त्यामुळे श्री दिलीप कडव यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांची लेखी मान्यता घेवून लाईफ लाईन हॉस्पीटल, ठाणे येथे उपचार घेतले आहे. त्यासाठी त्यांना .रु २,८७,७१७.४४ एवढा खर्च झालाआहे.

शासन निर्णय क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ दि. १९ मार्च २००५ नुसार शासकिय कर्मचा—यानाा व त्यांच्या कुटूंबियांना आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम सरसकट अनुदेय ठरते. त्यामुळे श्री. दिलीप कडव याना झालेल्या वैदयकिय खर्चाच्या रु.२,८७,७१७.४४ च्या ९०टक्के रु. २,५८,९४५ इतकी रक्कम शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरते.

त्यामुळे सदर कर्मचा—यास वैदयकिय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत एक विशेष बाब म्हणून मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: १६** **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे विशेष बाब म्हणुन श्री. दिलीप गणपत कडव, मजूर यांची पत्नी श्रीमती कविता दिलीप कडव यांच्या प्रसृतीसाठी झालेल्या खर्चाच्या ९० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १५:–** श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल, सफाई कामगार आरोग्य विभाग यांना अप्राधिकृत रुग्णालयाचे वैद्यकीय खर्चापोटी रु. ४०,०००/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

**प्रस्तावना**

श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांचा मुलगा कु. केशव राजेंद्र उजैनवाल यांस बॉम्बे हॉस्पीटल येथे दिनांक २८/५/०७ ते ५/६/०७ पर्यंत मुत्रपिंड प्रतिरोपन आजारावर उपचारार्थ दाखल केले होते त्यासाठी खर्च केलेल्या वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती रक्कम रु. १,०३,०८४ एक लाख तिन हजार चौ–याअंशी इतकी असुन सर्व वैद्यकिय बिले जोडली आहे. श्री राजेंद्र खाचेडू उजैनवाल यांनी अर्जान्वये वैद्यकिय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

"मुत्रपिंड प्रतिरोपन" शस्त्रक्रिया प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी बॉम्बे हॉस्पीटल यांना प्राधिकृत केलेले नाही. त्यामुळे मागणी केलेली वरीलप्रमाणे रक्कम शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय कमांक एम.एजी २००५/९/प्रक.१/ आरोग्य ३ मंत्र्यालय मुंबई ३२ दिनांक १९ मार्च २००५ अन्वये रु. ४०,००० वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती अधिकार विभाग प्रमुख (मा. आयुक्त) यांना आहे.

श्री. राजेंद्र खाचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांचे वैद्यकिय प्रतीपुर्ती देयक २७/६/२००७ पासुन प्रलंबित आहे. शासन निर्णयानुसार श्री. राजेंद्र खाचेडू उजैनवाल सफाई कामगार आरोग्य विभाग यांना रु ४०,०००/– मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** १७ **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. राजेंद्र खचेडू उजैनवाल, सफाई कामगार आरोग्य विभाग यांना अप्राधिकृत रुग्णालयाचे विशेष बाब म्हणुन वैद्यकीय खर्चापोटी रु. ४०,०००/- प्रतिपुर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १६:—** औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटी शर्तीस अधिन राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी लागु असलेल्या प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल अंतिम करणे

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ उल्हासनगर शहरासाठीची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२७२/६०१८५ आर. पी. सी. दिनांक २०/०५/१९७४ नुसार मंजुर झालेली असुन दिनांक १ जुर्ले १९७४ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेली उल्हासनगर शहराची सुधारीत प्रारूप विकास योजना ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सन २००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी शासनाचे नगर विकास विभागाने आधिसूचना क्र. टिपीएस—१२०२/८०६/सीआर—२००२/युडी—१२ दि. २६/०१/२००४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसूचिम क्षेत्र यामधुन वगळलेले असुन, उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करून सुधारीत विकास योजना तयार करणेबाबत आदेश दिलेले आहेत व त्याप्रमाणे सदरची विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यत मुळ मंजुर विकास योजना व प्रारूप सुधारीत विकास योजना यातीत कठोरत्तम तरतुदी लागू राहतील असेही नमुद केलेले आहे.

शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाने राज्यातील अनेक महानगरपालिकांच्या तसेच अनेक शहरांच्या विकास नियंत्रण नियमावलीत, विकास योजनेतील औद्योगिक विभागातील विद्यमान वापरबंद पडल्यास / स्थलांतरीत झाल्यास तेथे काही अटींच्या अधीन राहुन रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद समाविष्ट करुन निर्णय घेऊन तसे फेरबदल मंजूर केलेले आहेत. या धर्तीवर उक्त तरतुदर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नसल्याने, नागरी क्षेत्र औद्योगिक वापर कमी करण्याच्या शासनाच्या धोरणानुसार उक्त तरतुद उल्हासनगर महानगरपालिकांच्य प्रचलितविकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेसाठी शासनाने क्र. टिपीएस—१२१०/१४२०/प्र. क्र. ३३०/१०/नवि—१२ दि. ०९ संप्टेबर २०११ अन्वये निर्देश दिलेले असून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्याचे निर्देशित केले आहे.

**निर्देश**

१. उक्त नियोजन प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या लागू असलेल्या प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये औद्योगिक विभागातील विद्यमान औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास अशा क्षेत्रावर सोबत जोडलेल्या Appendix मध्ये नमुद अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद समाविष्ट करणेबाबत, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करावी.

२. उक्त नियोजन प्राधिकरणाने या निर्देशाच्या दिनांकापासून ९० दिवसांत जनतेकडून सुचना/हरकती मागविण्यासाठी विहित नोटीस प्रसिध्द करावी.

३. उक्त नियोजन प्राधिकरणाने, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन उक्त फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करावा.

## APPENDIX

### Conversion of Industrial Zone into Residential Zone

a) With the previous approval of Commissioner and on such conditions as deemed appropriate by him, the existing or newly builtup area of unit in the Industrial Zone may be permitted to be utilized for office or commercial purpose.

b) With the previous approval of the Commissioner any open land or Industrial land in the Industrial zone may be permitted to be utilized for any of the permissible users in the Residential Zone (R-1 Zone) or the Residential Zone with shop line (R-2) Zone subject to the following :-

i) The conversion of Industrial Zone to Residential / Commercial Zone in respect of closed industries shall not be permitted unless NOC from Labour Commissioner, Maharashtra State, Mumbai stating that all legal dues have been paid to the workers or satisfactory arrangement between management and workers have been made, is obtained. Provided that thwer conversion has been permitted on the basis of this certificate, occupation certificate will not be given unless a no dues certificate is granted by Labour Commissioner.

ii) The layout or sub division of such land admeasuring upto 2.00 Ha. shall be approved by the Commissioner, who will ensure that 5% land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post office, police out post and such other amenities, as may be considered necessary, will be provided therein.

iii) In such layouts or sub-divisions having area more than 2 ha. but less than 5 ha., 20% land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post office, police out post, garden, playground, school, dispensary and such other amenities shall be provided. Provided that at least 50% of this land shall be reserved for unbuildable reservations such as Garden, Recreational ground etc.

iv) In such layouts or sub-division each more than 5 ha. In area, 25% of land for public utilities and amenities like electric sub-station, bus-station, sub-post office, police out post, garden, playground, school, dispensary and such other amenities shall be provided. Provided that at least 50% of this land shall be reserved for unbuildable reservations such as Garden, Recreational ground etc.

v) The areas mentioned in ii, iii & iv above will be in addition to the recreational space as required to be provided under these regulations.

vi) The required segregating distance as prescribed under these regulations shall be provided within such land intended to be used for residential or commercial purpose.

vii) Such residential or local commercial development shall be allowed within the permissible FSI of the nearby residential or commercial zone.

viii) The amenity space to be provided as per the ii, iii & iv above is deemed to be Development Plan reservations & FSI of the same shall be available for utilization on remaining land if handed over free of cost and free of encumbrance after leveling and with compound wall to the Municipal Corporation or Municipal Corporation may acquire the land subject to payment compensation.

Note :-

1. Conversion from industrial zone to residential / commercial zone shall be applicable to the entire land holding and layout shall be approved for the entire land holding and not in part.

2. The Existing reservation of Development Plan, if any (within the percentage mentioned above, for public amenities and utilities) will be extinguished and they will be convered in new regulation.

3. The Provision of Sec. 49 or 127 as the case may be shall be applicable to such amenity spaces which are deemed as D.P. reservation for the purpose of their acquisition, compensation & deemed deletion due to inaction.

4. Out of the total floor area proposed to be utilized for residential development, 20% of the same shall be built for residential tenements having built up area upto 50 Sq. mt.

शासनाने उक्त निर्देशाचे अनुंषगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने सदर फेरबदलाबाबत ठराव क्र. ५७ दि. २१/११/२०११ रोजी पारीत केलेला असून सदर ठरावानुसार लोकांच्या हरकती व सुचना मागविणेसाठी दि. १५/१२/२०११ रोजी दै. धनुष्यधारी व दै. अमृत कलश या दोन वृत्तपत्रात सदर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच सदर सुचना

शासन राजपत्रामध्ये दि. २२ ते २८ डिसेंबर २०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे नागरीकाच्या हरकती/सूचना प्राप्त झालेल्या होत्या.

**<u>हरकतदारांचे/सुचनाधारकांचे नांव.</u>**

१. श्री. मंगेश दत्तात्रय भोसले.
२. श्री. जी. के. चव्हाण.
३. श्री. अशोक रामदास सोनावणे.

वरीलप्रमाणे प्राप्त हरकतदार/सूचनाधारकांचे हरकती/सूचनाबाबत दिनांक २१/०१/२०१२ रोजी सुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या वेळेस वरीलप्रमाणे प्राप्त एकुण ३ सूचना/हरकतीमधील अ. क्र. २ व ३ मधील हरकतदार गैरहजर होते व उर्वरीत एक सुचना/हरकतीवर सुनावणीर देवून हरकतदारांचे म्हणणे संयुक्तींक नसल्यामुळे फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे सदर फेरबदलाबाबत आतापर्यतची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार सदर फेरबदलाबाबत अंतिम ठराव होणे आवश्यक आहे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल त्यामुळे फेरबदल करण्याची कार्यवाही करणेपुर्वी महासभेच्या मंजुरीकरिता विषयसुचीमध्ये समाविष्ट करणेस पाठवयाचा गोषवारा महासभेच्या विषयपटलावर समाविष्ट करणेबाबत विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** १८ **<u>दिनांकः—१९/५/२०१२</u>**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती अंजली साळवे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे प्राप्त हरकती व सूचना निकाली काढून शासनाच्या मंजुरी अधिन राहून औद्योगिक वापर बंद पडल्यास/स्थलांतरीत झाल्यास लागु पडेल अशा काही अटी शर्तीवर रहिवास/वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्याप्रयोजनार्थ उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी लागु असलेल्या प्रचलित मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल अंतिम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १७:–** महापालिका निश्चित करेल त्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करातून सूट देण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे एकुण १,६०,००० मालमत्ता अस्तित्वात असून दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर मालमत्ता करापोटी अंदाजे २०० कोटी रक्कमेची थकबाकी प्रलंबित आहे. थकबाकी रक्कम जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२–१अ मध्ये मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेली व्यक्ती किंवा व्यक्तीचा वर्ग महापालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील, अशा मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सुट देता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतुद व शासन मंजुरीच्या अधिन राहून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतधारकांना मालमत्ता करापोटी प्रलंबित असलेल्या थकीत रक्कमेवर सुट देणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट लागु असलेला कालावधी | प्रस्तावित सुट |
|---|---|---|
| १ | दिनांक ०१ जुन २०१२ ते दिनांक ३१ ऑगस्ट २०१२<br>किंवा<br>शासन मंजुरीच्या दिनांकापासुन ३ महिने | मालमत्ता करापोटी दिनांक ३१/३/२०१२ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सुट १० टक्के अनुज्ञेय असेल. |
| २ | दिनांक ०१ सप्टेंबर २०१२ ते दिनांक ३० नोव्हेंबर २०१२<br>किंवा<br>शासन मंजुरीच्या दिनांकापासुन प्रथम ३ महिन्याच्या कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासुन ३ महिने | मालमत्ता करापोटी दिनांक ३१/३/२०१२ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सुट ७ टक्के अनुज्ञेय असेल. |

१) मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करण्यातून अनुज्ञेय असलेली सुट व त्याच्या कालावधीसंबंधी नागरीकांना जाहिरातीद्वारे अवगत करण्यात येईल.

२) **मालमत्ता बिलाची प्राप्त:–**मिळकतधारकांनी वर्ष २०१२–१३ करीता मालमत्ता कर बिल प्राप्त होण्याची वाट न पाहता व्यक्तीश: बिल प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. यासाठी महापालिकेमार्फत पुढील यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

१) दुरध्वनी (IVRS) No. २७०८८३०

२) मोबाईल एसएमएस

३) किऑक्स सेंटर ( Self Servcice Multi Utility Kiosk Centre)

४) नागरिक सुविधा केंद्र (Citizen Facillitaton Centre)

**महासभा ठराव क्र: १९** **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या मंजुरी अधिन राहून प्रस्तावित अटी, शर्ती व वेळापत्रक अंतिम करुन उल्हासनगर शहरात मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करणा–या मिळकतदाराला सामान्य कराचे थकबाकी रक्कमेवर लागु पडेल अशी सूट देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १८:–** परिवहन समितीद्वारे शिफारिश केलेले भाडे निश्चित करणे.

**प्रस्तावना**

मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी डिझेलच्या दरात, चालक व वाहक व अन्य परिवहनच्या कर्मचा–यांच्या पगारात वाढ झाली असल्यामुळे तसेच रस्त्यांची अवस्था खराब असल्यामुळे मेंटेनन्स, स्पेअर पार्टस ऑइल इत्यादी गोष्टीमध्ये वाढ झाली असल्यामुळे सध्याच्या टिकीट दरात परिवहन सेवा सुरू ठेवणे कठीण होत आहे.या अनुषंगाने पत्रा सोबत जोडलेल्या टिकीट दरानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील टिकीट दरात वाढ करून मिळण्याची विनंती केलेली आहे.

सदर बाबत सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेची बी.ओ.ओ.टी तत्वावर परिवहन सेवा सुरू करण्याच्या निविदा माहे डिसेंबर २००८ साली मागविण्यात आल्या होत्या.व प्राप्त निविदाकारांपैकी मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांची निविदा अंतिम करण्यात आली होती.सदर निविदेमधील अट क्रं. ४३ व ४४ खालीलप्रमाणे आहे.

**अट क्रं. ४३**

इंधन दरातील फेरबदलामुळे किंवा इतर कारणांमुळे प्रवासी तिकीट दरामध्ये बदल करावयाचा असल्यास व्यक्ती/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनीने दिलेल्या नविन तिकीट दर प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिका/सक्षम प्राधिकारी यांना योग्य वाटल्यास मंजुरी देवून रितसर प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी पाठवतील व ते योग्य त्या मंजुरी नंतर लागू होईल.

**अट क्रं. ४४**

जेव्हा जेव्हा योग्य त्या मंजुरी नंतर तिकिट रद बदलण्यात येतील आणि त्यातुन ज्या टप्प्यासाठी सर्वात जास्त टक्केवारीने तिकिट दरांत बदल होईल त्या टक्केवारी नुसार मंजुर रॉयल्टी दरातही फेरबदल होईल व त्यानुसार व्यक्ती/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांना रॉयल्टीची रक्कम दयावी लागेल, परंतु निविदेत मंजुर झालेल्या रॉयल्टी दरापेक्षा हे दर कमी करता येणार नाहीत म्हणजे तिकिट दरात झालेल्या फेरबदलामुळे रॉयल्टी दर किंवा प्रथम निविदेत मंजुर रॉयल्टी दर यादोहापैकी जे कमाल असेल ते देय राहील.

वरिल अटीनुसार मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी इंधन व इतर दरात वाढ झाल्यामुळे तिकीट दरात वाढ करून मागितली आहे.

निविदा विक्रीच्या कालावधी मधील डिझेलचा भाव रू. ३७.४० एवढा होता.सध्याचा डिझेलचा भाव रू. ४६.८३ एवढा असून डिसेंबर २००८ च्या तुलनेत खुपच जास्त आहे. तसेच डिझेलच्या भावाची दरवाढ, कामगारांच्या पगारातील वाढ व रस्त्यांमुळे होणारा मेटेंनन्सवरिल खर्च इत्यादी बाबींचा विचार करता टिकीट दरात वाढ होणे आवश्यक आहे. तसेच मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी पत्रा सोबत सादर केलेले दर हे अन्य महानगरपालिकेच्या तुलनेत जास्त आहे व उल्हासनगर महानगरपालिकेचे सध्याचे दर हे खुप कमी आहेत.उल्हासनगर महानगरपालिकेचा व अन्य महानगरपालिकेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

## तुलनात्मक तक्ता

| टप्पा क्रं | अंतर कि.मी. | उल्हासनगर महानगरपालिका परिवहन सेवा मंजुर दर | मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर यांनी मंजुरीसाठी नमुद केलेले दर | कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेचे टिकीट दर | ठाणे महानगरपालका परिवहन सेवेचे टिकीट दर | नवि मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेचे टिकीट दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रूपये | रूपये | रूपये | रूपये | रूपये |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० — २ | ३.००<br>२.५ कि.मी पर्यंत | ६.०० | ५.०० | ४.०० | ५.०० |
| २ | २ — ४ | ५.०० | ७.०० | ६.०० | ६.०० | ६.०० |
| ३ | ४ — ६ | ५.०० | ८.०० | ७.०० | ८.०० | ७.०० |
| ४ | ६ — ८ | ७.०० | १०.०० | ९.०० | ९.०० | ९.०० |
| ५ | ८ — १० | ९.०० | १२.०० | १०.०० | १०.०० | १०.०० |
| ६ | १० — १२ | ९.०० | १३.०० | ११.०० | ११.०० | ११.०० |
| ७ | १२ — १४ | ११.०० | १४.०० | १२.०० | १२.०० | १२.०० |
| ८ | १४ — १६ | ११.०० | १५.०० | १३.०० | १३.०० | १३.०० |
| ९ | १६ — १८ | ११.०० | १६.०० | १४.०० | १३.०० | १४.०० |
| १० | १८ — २० | १३.०० | १७.०० | १५.०० | १४.०० | १५.०० |
| ११ | २० — २२ | १३.०० | १८.०० | १६.०० | १४.०० | १६.०० |
| १२ | २२ — २४ | १३.०० | १९.०० | १८.०० | १६.०० | १८.०० |
| १३ | २४ — २६ | १५.०० | २०.०० | १९.०० | १७.०० | १९.०० |
| १४ | २६ — २८ | — | २२.०० | २०.०० | १८.०० | २०.०० |
| १५ | २८ — ३० | — | २३.०० | २१.०० | १९.०० | २१.०० |
| १६ | ३० — ३२ | — | २४.०० | २२.०० | १९.०० | २२.०० |
| १७ | ३२ — ३४ | — | २५.०० | २३.०० | २०.०० | २३.०० |
| १८ | ३४ — ३६ | — | २६.०० | २४.०० | २०.०० | २४.०० |
| १९ | ३६ — ३८ | — | २८.०० | २५.०० | २१.०० | २५.०० |
| २० | ३८ — ४० | — | ३०.०० | २६.०० | २२.०० | २६.०० |

वरिल अन्य महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमांच्या मंजुर दरानुसार देखील अन्य परिवहन सेवा तोटयात आहे.तसेच उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन सेवा बी.ओ.ओ.टी तत्वावर असल्याने तोटयाऐवजी रॉयल्टी स्वरूपात उत्पन्न मिळत आहे. यास्तव सदर परिवहन सेवा सुरळीत सुरू ठेवणे आवश्यक आहे.

वरिल तुलनात्मक तक्त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचे टिकीट दर में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी दिलेले दर प्रस्तावित न करता कल्याण डोंबिवली किंवा ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवा यांचे दर मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>प्रस्तावित उल्हासनगर महानगरपालिकेचे दर</u>**

| टप्पा क्रं | अंतर कि.मी. | कल्याण डोंबिवली | ठाणे | वातानुकुलीत |
|---|---|---|---|---|

| | | महानगरपालिका परिवहन सेवेचे टिकीट दर | महानगरपालिका परिवहन सेवेचे टिकीट दर | भाडे |
|---|---|---|---|---|
| | | रूपये | रूपये | |
| १ | ० — २.५ | ५.०० | ४.०० | १०.०० |
| २ | २.५ — ४ | ६.०० | ६.०० | १०.०० |
| ३ | ४ — ६ | ७.०० | ८.०० | १५.०० |
| ४ | ६ — ८ | ९.०० | ९.०० | १५.०० |
| ५ | ८ — १० | १०.०० | १०.०० | २०.०० |
| ६ | १० — १२ | ११.०० | ११.०० | २०.०० |
| ७ | १२ — १४ | १२.०० | १२.०० | २०.०० |
| ८ | १४ — १६ | १३.०० | १३.०० | २५.०० |
| ९ | १६ — १८ | १४.०० | १३.०० | २५.०० |
| १० | १८ — २० | १५.०० | १४.०० | २५.०० |
| ११ | २० — २२ | १६.०० | १४.०० | ३०.०० |
| १२ | २२ — २४ | १८.०० | १६.०० | ३०.०० |
| १३ | २४ — २६ | १९.०० | १७.०० | ३५.०० |
| १४ | २६ — २८ | २०.०० | १८.०० | ३५.०० |
| १५ | २८ — ३० | २१.०० | १९.०० | ४०.०० |
| १६ | ३० — ३२ | २२.०० | १९.०० | ४०.०० |
| १७ | ३२ — ३४ | २३.०० | २०.०० | ४५.०० |
| १८ | ३४ — ३६ | २४.०० | २०.०० | ४५.०० |
| १९ | ३६ — ३८ | २५.०० | २१.०० | ५०.०० |
| २० | ३८ — ४० | २६.०० | २२.०० | ५०.०० |

सध्याच्या टिकीट दरात उल्हासनगर महानगरपालिकेला ५५ पैसे प्रति कि.मी रॉयल्टी प्राप्त होत आहे.सध्या महापालिकेकडे २५ बसेस आहेत व २५ बसेस चे मासिक उत्पन्न रू. ५५,०००/— एवढे आहे.तसेच शासनास अदा करावयाचे बालपोषण अधिभार व प्रवासी कर देखील ठेकेदारामार्फत नियमित भरण्यात येत आहे.जर वरिल प्रमाणे टिकीट दरात वाढ झाल्यास कराराच्या अट क्रं. ४४ नुसार रॉयल्टी ५५ पैसे एवजी ९२ पैसे एवढी होईल व महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

कराराच्या अट क्रं. ४३ नुसार डिझेलच्या दरातील वाढ, कामगारांच्या पगारातील वाढ मेंटेनन्स वर होणारा खर्च व इतर महानगरपालिकेचे दर व उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरळीत सुरू ठेवण्याच्या दृष्टीने वरिल कल्याण डोंबिवली किंवा ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेचे दर मंजुर होणे आवश्यक वाटते.मा.परिवहन समितीची मंजुरी प्राप्त झाल्यावर गोषवारा मा.महासभेची मंजुरीसाठी ठेवण्यात येईल व तद्नंतर प्रस्ताव मा. M.M.R.T.A समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.

तरी सदर टिकीट दरात वाढ करण्यासाठी गोषवारा मा. परिवहन समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**परिवहन समिती ठराव क्रं. १५** **दिनांक २०/१२/२०११**

सूचकाचे नाव : श्री. उत्तम सगळे

अनुमोदकाचे नाव : श्री. संजय सिंग

ही परिवहन समिती प्रस्तावनेत नमुद केलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेच्या तिकिट दराप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या तिकिट दरात वाढ करण्यास मान्यता देत आहे.

सूचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

———————————————————————————————————————————————
—

**महासभा ठराव क्र: २०** **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या परिवहन समिती ठराव क्र. १५ दिनांक २०/१२/२०११ द्वारे शिफारस केलेले भाडे खालील फेरफारासह निश्चित करीत आहे.

१. अ.क्र. १ वर दर्शविलेल्या ० ते २ कि.मी. अंतरासाठी रुपये ५/–

२. अ.क्र. २ ते २० वर दर्शविलेल्या २ ते ४० कि.मी. अंतरासाठी मेसर्स केस्ट्रल इन्फ्रास्ट्रचर प्रा. लि. उल्हासनगर यांनी प्रस्तावित केलेल्या दराप्रमाणे भाडे निश्चितीस मान्यता देत आहे.

**तसेच**

पुढील एक वर्षापर्यंत फेर भाडे निश्चितीचा प्रस्ताव आणता येणार नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १९:–** परिवहन समितीची पुर्नरचना करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र ४० दिनांक २३.८.२००७ अन्वये परिवहन समितीची नेमणूक केली आहे. हीच समिती पुढे चालु ठेवायची की या ४ थ्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या ७८ सदस्यांच्या पक्षनिहाय तौलनिक संख्या बलानुसार परिवहन समितीची नव्याने नेमणूक करायची किंवा कसे याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. परिवहन समितीचे नव्याने नियुक्ती करायची झाल्यास पुर्वीची परिवहन समिती विसर्जित करुन नविन परिवहन समिती स्थापन करण्यात येईल. वरील बाब लक्षात घेता महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणीज्यिक कामाचा, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबीत ज्यांची क्षमता दिसुन आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यक्तिमधुन परिवहन समितीचे सदस्य म्हणुन १२ व्यक्तिची नेमणूक केली पाहिजे. तसेच स्थायी समितीचा सभापती हा परिवहन समितीच्या पदसिध्द सदस्य असेल.

महापालिकेने नेमणुक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य प्रत्येक कदुस–या वर्षी अधिनियमातील तरतुदी नुसार निर्दिष्ट केल्या प्रमाणे निवृत्त होतील.

सन–२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. परिवहन समितीवर १२ व्यक्तींची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात व्यक्तींचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | पाठींबा दिल्याने संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | पाठींब्यानंतर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | २० | ० | – | २० |
| शिवसेना | १९ | ० | – | १९ |
| भाजपा | ११ | ० | – | ११ |
| कॉग्रेस | ८ | ० | – | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | + ३ | – | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | – | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | –२ | – | ०० |
| अपक्ष | ०१ | –१ | – | ०० |
| मनसे | ०१ | ०० | – | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१ | ००<br>००<br>००<br>००<br>०० | –<br>–<br>–<br>– | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ०१ | | — | |
| एकूण | ७८ | | | ७८ |

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

$$\frac{78}{12} = 6\text{-}50$$

परिवहन समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ६.५० असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २० / ७८ X १२ | = ३.०७ | (७) | मनसे | १ / ७८ X १२ | = ०.१५ |
| (२) | शिवसेना | १९ / ७८ X १२ | = २.९२ | (८) | अपक्ष | १ / ७८ X १२ | = ०.१५ |
| (३) | भाजपा | ११ / ७८ X १२ | = १.६९ | (९) | अपक्ष | १ / ७८ X १२ | = ०.१५ |
| (४) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया | १० / ७८ X १२ | = १.५३ | (१०) | अपक्ष | १ / ७८ X १२ | = ०.१५ |
| (५) | कॉंग्रेस | ०८ / ७८ X १२ | = १.२३ | (११) | अपक्ष | १ / ७८ X १२ | = ०.१५ |
| (६) | आरपीआय | ४ / ७८ X १२ | = ०.६१ | (१२) | अपक्ष | १ / ७८ X १२ | = ०.१५ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| रा.का.पा | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया | कॉंग्रेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २ | १ | १ | १ | ०८ |

यानंतर रिक्त राहणा—या चार जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

**(१) शिवसेना ०.९२ (२) भा.ज.पा ०.६९ (३) आरपीआय. ०.६१**

**(४) सेक्युलर अलायन्स ०.५३ (५) कॉंग्रेस ०.२३ (६) म.न.से ०.१५**

ऑफ इंडीया

**(७) अपक्ष ०.१५ (८) अपक्ष ०.१५ (९) अपक्ष ०.१५**

**(१०) अपक्ष ०.१५ (११) अपक्ष ०.१५**

वरील परिस्थिती पहाता शिवसेना, भाजपा, आरपीआय व साई या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे चार रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक–एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे परिवहन समितीवर प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| रा.का.पा | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | २ | २ | १ | १ | ० | ० | १२ |

<u>महासभा ठराव क्र:</u> २१ <u>दिनांक:–१९/५/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा सध्या कार्यरत परिवहन समिती विसर्जित करुन वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी परिवहन समितीची पुर्नरचना प्रयोजनार्थ खालील प्रमाणे परिवहन समिती सदस्यांची नेमणुक करीत आहे.

१. सभापती, स्थायी समिती

२. श्री शिवाजी शंकर जावळे

३. श्री रविद्र गोविंद महाजन

४. श्री उत्तम सावळेराम मोळके (पाटील)

५ श्री समीर सूर्यकांत भोईर

६. श्री होमनारायण एस. वर्मा

७. श्री परमानंद किशनचंद हिंदुजा

८. श्री गोपीचंद सन्मुखदास दावानी

९. श्री संजय किसन सदावर्ते

१०.श्री कुलदिपसिंग जी. मथारू

११ श्री नरेश सुगनोमल दुर्गानी

१२.श्री कमलेश मधुकर निकम

१३ श्री भरत बळीराम खरे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २०:–** वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

**प्रस्तावना**

सन–२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. त्या सदस्यांमधुन महापालिकेच्या वृक्षप्राधिकरणावर १५ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | पाठींबा दिल्याने संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | पाठींब्यानंतर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २० | ० | – | २० |
| शिवसेना | १९ | ० | – | १९ |
| भाजपा | ११ | ० | – | ११ |
| कॉंग्रेस | ८ | ० | – | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | ३ | – | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | – | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | –२ | – | ०० |
| अपक्ष | ०१ | –१ | – | ०० |
| मनसे | ०१ | ०० | – | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ | ००<br>००<br>००<br>००<br>०० | –<br>–<br>–<br>–<br>– | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ |
| एकूण | ७८ | | | ७८ |

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

| | |
|---|---|
| **78** / **15** | = **5-2** |

वृक्षप्राधिकरणाच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ५.२ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २०<br>—— X १५<br>७८ | = ३.८४ | (७) | मनसे | १<br>—— X १५<br>७८ | = ०.१९ |
| (२) | शिवसेना | १९<br>—— X १५<br>७८ | = ३.६५ | (८) | अपक्ष | १<br>—— X १५<br>७८ | = ०.१९ |
| (३) | भाजपा | ११<br>—— X १५<br>७८ | = २.११ | (९) | अपक्ष | १<br>—— X १५<br>७८ | = ०.१९ |
| (४) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया | १०<br>—— X १५<br>७८ | = १.९२ | (१०) | अपक्ष | १<br>—— X १५<br>७८ | = ०.१९ |
| (५) | कॉग्रेस | ०८<br>—— X १५<br>७८ | = १.५३ | (११) | अपक्ष | १<br>—— X १५<br>७८ | = ०.१९ |
| (६) | आरपीआय | ४<br>—— X १५<br>७८ | = ०.७६ | (१२) | अपक्ष | १<br>—— X १२<br>७८ | = ०.१९ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| **रा.का.पा** | **शिवसेना** | **भाजपा** | **सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया** | **कॉग्रेस** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | २ | १ | १ | १० |

यानंतर रिक्त राहणा—या **दहा** जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

**(१) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया** ०.९२ **(२) रा.का.पा** ०.८४ **(३) आरपीआय** ०.७६

**(४) शिवसेना** ०.६५ **(५) कॉग्रेस** ०.५३ **(६) म.न.से** .०.१९

**(७) अपक्ष** ०.१९ **(८) अपक्ष** ०.१९ **(९) अपक्ष** ०.१९

**(१०) अपक्ष** ०.१९ **(११) अपक्ष** ०.१९ **(१२) भाजपा** ०.११

वरील परिस्थिती पहाता सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया, रा.का.पा., आरपीआय, शिवसेना, कॉग्रेस या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे **पाच** रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे वृक्षप्राधिकरणावर प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| **रा.का.पा.** | **शिवसेना** | **भाजपा** | **सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया** | **कॉग्रेस** | **आरपीआय** | **मनसे** | **अपक्ष** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | २ | २ | २ | १ | ० | ० | १५ |

**महासभा ठराव क्र:** २२ **दिनांक:–१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना प्रयोजनार्थ खालील सदस्यांची नेमणूक करीत आहे.

| | |
|---|---|
| आयुक्त –– उल्हासनगर महानगरपालिका | सभापती |
| १. श्री. सुरेश मधुकर जाधव | सदस्य |
| २. श्री. प्रधान धर्मा पाटील | सदस्य |
| ३. श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | सदस्या |
| ४. श्री विजय खंडु सुपाळे | सदस्य |
| ५. श्री. दिलीप देविदास जग्यासी | सदस्य |
| ६. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | सदस्य |
| ७. श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी | सदस्य |
| ८. श्री. हरेश परमानंद जग्यासी | सदस्य |
| ९. श्रीम.आशा नाना बि–हाडे | सदस्या |
| १० श्रीम. दिप्ती नवीन दुधानी . | सदस्या |
| ११.श्रीम. कंचन अमर लुंड | सदस्या |
| १२.श्री. जाफर अली चौधरी | सदस्य |
| १३.श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | सदस्या |
| १४.श्री.पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | सदस्य |
| १५.श्री गुरूनो भिकोमल वलेचा | सदस्य |

.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २१:—** प्रभाग समित्यांची पुर्नरचना करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये एकूण ३९ प्रभागामध्ये द्विस्तरीय पध्दतीनुसार ७८ नगरसेवक निवडून आलेले आहेत. सदर ३९ प्रभाग ४ प्रभाग समित्यांमध्ये विभागून प्रभाग समिती निहाय भौगोलिक परिस्थिती नुसार खालील प्रमाणे प्रभाग समित्यांची रचना असावी असे प्रशासनाचे मत आहे.

| अ क्र | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग | समाविष्ट भाग |
|---|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १,२,३,४,५,६, १५,१६,१७,१८ | १० | सेंच्युरी रेयॉन, धोबी घाट, कमला नेहरु नगर, फक्कड मंडली, रमाबाई आंबेडकर नगर, शहाड स्टेशन, बालकनजी बारी, शासकीय रुग्णालय, कामगार रुग्णालय, टाऊन हॉल, |
| २ | यात्री निवास | ७,११,१२,१३, १४,१९,२०,२१, २२,२३ | १० | झुलेलाल मंदीर, बेवास चौक, भारत चौक, नेहरु चौक, शिरुचौक, राधास्वामी सत्संग हॉल, चांदीबाई कॉलेज, वडोल गांव, उल्हासनगर रेल्वे स्थानक (पश्चिम) शिवाजी चौक, सपना गार्डन, महानगरपालिका |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | ८,९,१०,२४,२५, २६,२७,२८, ३२ | ०९ | सी ब्लॉक, शांतीनगर उद्योग विहार, विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक, अॅडमिनिस्ट्रेटेड, ऑफीस पवई चौक, उल्हासनगर रेल्वे स्थानक (पूर्व), इंदिरा गांधी भाजी बाजार, लालचक्की चौक, व्हिनस सिनेमा, सेक्शन २५ ते सेक्शन ३०, सतरामदास रुग्णालय, व्हि.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स, मराठा सेक्शन, |
| ४ | पाणी पुरवठा | २९,३०,३१,३३, ३४,३५,३६,३७, ३८,३९ | १० | सुभाष टेकडी, कानसई रोड, कुर्लाकॅम्प, कैलाश कॉलनी, स्वामी शांती प्रकाश आश्रम, दुधनाका, साई वसणशाह, दरबार, निजधाम आश्रम, गांधीरोड, ओमकारानंद आश्रम, नेताजी हायस्कूल, प्रभात चौक, गायकवाड पाडा १ व ३ एकता नगर, दुर्गापाडा |

उपरोक्तपणे ३९ प्रभागांचे ४ प्रभाग क्षेत्रांसाठी (प्रभाग समिती) प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २३ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिहं भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या लागुन असलेल्या अंतर्भुत प्रभागांच्या समावेशाप्रमाणे ४ प्रभाग समित्यांची पुर्नरचना करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. २२:—** कै. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, उ.मपा. यांच्या अकाली निधनामुळे

त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे.

**प्रस्तावना**

दिनांक २४/४/२०१२ रोजी उल्हासनगर महापालिकेत प्रोग्रामर या पदावर कार्यरत असणारे श्री. अभिजित महामुलकर हे कर्तव्य बजावत असतांना त्यांचे अकाली अपघाती निधन झाले आहे. श्री. महामुलकर यांना महाराष्ट्र नागरी सेवा, निवृत्ती वेतन १९८२ अन्वये कुटुंब निवृत्ती वेतनाचे लाभ देय होत नाहीत.

श्री. महामुलकर यांनी महापालिकेच्या संगणीकरणामध्ये सिंहाचा वाटा उचलला होता, त्यांचे कामकाज अतिशय उल्लेखनिय होते. त्यांच्या पश्चात आई व वडील हे वारसधार असून ते निराधार असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्यांना महापालिकेकडुन आर्थिक मदत देणे योग्य वाटते. तरी याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणेकरीता महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २४ **दिनांक:—१९/५/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता कै. श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, उल्हासनगर महानगरपालिका यांचे कुटुंबियांना प्रत्येक पालिका सदस्यांचे माहे मे २०१२ चे मानधन व बैठक भत्त्याची पुर्ण रक्कम व महापालिका निधीतून रुपयें २१ लाख इतकी आर्थिक मदत देण्याचे मान्य करीत आहे. व सदरहु रक्कम त्यांना अदा करण्यास मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी<br>
सर्वसाधारण महासभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. २३**:— उल्हासनगर शहरात स्थानिक कर लागु न करणे व १ एप्रिल २०१२ ते

१९ एप्रिल २०१२ या कालावधीत महापालिकेला झालेल्या आर्थिक नुकसान भरपाईबाबत शासनास विनंती करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत उपभोग , उपयोग किंवा विक्री यासाठी आयात होणा—या मालाच्या प्रवेशावर जकात आकारणी करण्यात येत होती . त्यानुसार वाहतुकदार किंवा कोणत्याही व्यक्तीमार्फत शहरात आयात होणा—या जकात पात्र मालांवर जकात वसुली होत होती. जकात नियमात खाजगीकरणाची मुभा असल्यामूळे वर्ष १९९७ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेस जकात वसुलीसाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जकातीचे खाजगीकरण केल्यामूळे खाजगीकरणाच्या पहिल्या वर्षापासून आजपर्यंत झालेला वसुलीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

(आकडे लाखात)

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | १९९७—१९९८ | १९६७ |
| २ | १९९८—१९९९ | २५२६ |
| ३ | १९९९—२००० | ३३०३ |
| ४ | २०००—२००१ | ४५१५ |
| ५ | २००१—२००२ | ४३७७ |
| ६ | २००२—२००३ | ५१६५ |
| ७ | २००३—२००४ | ५५७४ |
| ८ | २००४—२००५ | ६१६७ |
| ९ | २००५—२००६ | ६५३९ |
| १० | २००६—२००७ | ७२०३ |
| ११ | २००७—२००८ | ८५५३ |
| १२ | २००८—२००९ | ९४५४ |
| १३ | २००९—२०१० | १०३९७ |
| १४ | २०१०—२०११ | ११४६१ |
| १५ | २०११—२०१२ | १२७११ |

खाजगीकरण केल्यामूळे एकीकडे जकात उत्पन्नात प्रचंड वाढ झालेली आहे आणि दुसरीकडे पगार , भत्ते , स्टेशनरी, संगणक, संगणक साहित्य व संगणक प्रणाली इत्यादी या बाबींवर कोटी रुपये खर्चाची बचत झालेली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेस पार पाडाव्या लागणा—या कार्य व कर्तव्यांचे जास्तीत जास्त खाजगीकरण करावे हे केंद्र व राज्य शासनाचे धोरण आहे

**स्थानिक संस्था कर**:

दरम्यान शासन अधिसूचना क्रमांक : स्थासंक—२०११/प्र.क्र१३९//नवि—३४ दिनांक ३१ मार्च २०१२ अन्वये दिनांक १.४.२०१२ पासून शहरात उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी आयात होणा—या वस्तुंवर /मालांवर स्थानिक संस्था कर बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत .

सर्व प्रथम स्थानिक संस्था कर आकारणी  या संदर्भात **''स्थानिक संस्था कर''** व **''व्यापारी''** या शब्दाची व्याख्या तसेच **''उपकराचा भार''** व **''नोंदणी करिता उलाढालीची मर्यादा''** या कलमात/नियमात करण्यात आलेले तरतूदीचे तपशिल नमूद करणे आवश्यक आहे व ते पुढील प्रमाणे आहे .

**१. ''स्थानिक संस्था कर''** याचा अर्थ उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणा—या मालाच्या प्रवेशावर प्रकरण अकरा —ब च्या तरतुदीनुसार बसविण्यात आलेला कर असा आहे.

..२..

**सारांश** :—

**उपरोक्त तरतूदीनुसार उपभोग, उपयोग किंवा विक्रीसाठी आयात होणा—या कोणत्याही मालावर स्थानिक संस्था कर आकारणे आवश्यक आहे** .

२.''व्यापारी'' म्हणजे जी स्वत:च्या धंदयाच्या प्रयोजनासाठी किंवा स्वत:च्या धंदयाच्या संबंधात किंवा त्या अनु**षंगाने** शहरात कोणत्याही मालाची कमिशन, परिश्रमिक यावर किंवा अन्यथा आयात, खरेदी किंवा विक्री करते अशी कोणतीही व्यक्ती, आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

अ) जो शहरामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्यांच्या मग त्यांची माहिती उघड केलेली असो वा नसो मालकीच्या कोणत्याही मालाची खरेदी करतो, विक्री करतो त्याचा पुरवठा करतो , त्याचे वितरण करतो किंवा त्याची आयात करतो असा , कोणत्याही नावाने संबोधला जाणारा आणि यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या अशा त्याच वर्णनाचा असणारा किंवा नसणारा असा अडत्या, दलाल, कमिशन, एजंट, आश्वासक अभिकर्ता किंवा अन्य कोणताही वाणिज्य अभिकर्ता :

ब) जो शहरामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या मग त्याची माहिती उघड केलेली असो वा नसो मालकीच्या मालाची विक्री करतो किंवा लिलाव करतो तो लिलावकार—मग इच्छुक खरेदीदाराचा देकार त्याने किंवा प्रकर्त्यांने किंवा प्रकर्त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने स्वीकारलेला असो किंवा नसो:

क) कमिशनवर , परिश्रमिकावर किंवा अन्यथा प्रत्यक्षपणे वा अन्यथा मालाची खरेदी, विक्री, पुरवठा, वितरण किंवा आयात (मग ते धंदयाच्या ओघात असो वा नसो) करणारे केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन :

ड) आपल्या सदस्यांसाठी किंवा त्यांच्या वतीने रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा कमिशनवर, परिश्रमिकावर किंवा अन्यथा मालाची आयात, खरेदी , विक्री, पुरवठा किवा वितरण — मग ते धंदयाच्या ओघात असो वा नसो — करणारी संस्था, क्लब, किंवा व्यक्तीचा अन्य संघ (मग ते विधीव्दारा संस्थापित ओघात असोत वा नसोत)

**स्पष्टीकरण** : या खंडाच्या प्रयोजनार्थ (अ) अनिवासी व्यापा—याचा शहरामध्ये राहणारा जो व्यवस्थापक किंवा अभिकर्ता शहरामध्ये मालाची आयात , खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण करतो अथवा अशा व्यापा—याच्या वतीने —

अ) माल विक्रय अधिनियम १९३० (१९३० चा ३) मध्ये केलेल व्याख्येप्रमाणे असलेला वाणिज्य अभिकर्ता म्हणून किंवा .

ब) मालाची किंवा मालाच्या संबंधातील हक्कविषयक दस्तऐवजाची हाताळणी करणारा अभिकर्ता म्हणून किंवा

क) मालाच्या विक्रीची किंमत वसुल करण्यासाठी वा देण्यासाठी किंवा अशा वसुलीची वा प्रदानाची हमी देण्यासाठी अभिकर्ता म्हणून :

काम करतो तो व्यापारी किंवा अशा वसुलीसाठी अथवा प्रदानासाठी हमीदार असल्याचे मानण्यात येईल .

ब)	खंड (५–अ) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतूदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी , पुढीलपैकी जी व्यक्ती व संस्था मालाची – यामध्ये बेवारशी असलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या किंवा निकामी झालेल्या किंवा भंगार , जादा , जुने अप्रचलीत असलेले किंवा काढून टाकलेले सामान किंवा टाकाउ उत्पादन म्हणून असलेल्या मालाचा समावेश आहे . लिलावाव्दारे वा अन्यथा , प्रत्यक्षपणे किंवा अभिकर्त्यामार्फत रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा अन्य कोणताही मौल्यवान मोबदला घेवून विल्हेवाट लावते ती प्रत्येक व्यक्ती व संस्था व्यापारी असल्याचे मानण्यात येईल :



अ)	बंदर विश्वस्थमंडळे,

ब)	महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा , आणि इतर स्थानिक प्राधिकरणे :

क)	भारतीय रेल्वे अधिनियम १८९० (१८९० चा ९) अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेले रेल्वे प्रशासन :

ड)	जहाज वाहतूक, परिवहन व बांधकाम कंपन्या :

ई)	विमान परिवहन कंपन्या व विमान वाहतुक कंपन्या :

फ)	मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) अन्वये देण्यात आलेला, भाडयाने वा मोबदल्यादाखल वापरल्या जाणा–या किंवा वापर करण्यासाठी जुळत्या करुन घेतलेल्या परिवहन वाहनांचा परवाना धारण करणा–या , वाहतुक करणा–या व्यक्ती :

ग)	मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम १९५० ( १९५० चा ६४) अन्वये स्थापन केलेले महाराष्ट् राज्य मार्ग परिवहन महामंडळ :

ह)	सीमाशुल्क अधिनियम १९६२ ( १९६२ वर ५२) ची अंमलबजावणी करणारा, भारत सरकारचा सीमाशुल्क विभाग :

आय)	विमा व वित्तीय महामंडळे किंवा कंपन्या , आणि बॅकव्यवसायी कंपन्या :

जे)	जाहिरात कंपन्या :

के)	केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्यांनी स्थापन केलेले अथवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले अन्य कोणतेही महामंडळ, कंपनी, संस्था किंवा प्राधिकरण :

**अपवाद :– (एक)** केवळ स्वत:च्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती **आणि धंदयामध्ये न गुंतलेला राज्य किंवा केंद्र शासनाचा विभाग हे व्यापारी असणार नाहीत .**

(दोन) जो शेतकरी केवळ त्यांने स्वत: कसलेल्या जमिनीत काढलेले कृषी उत्पादन विकतो तो शेतकरी या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानण्यात येणार नाही .

(२)	या नियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील .

**सारांश :–**

**उपरोक्त नमूद व्यापारी या शब्दाच्या व्याख्येत अपवाद मधील तरतूदीनुसार स्वत:च्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती स्थानिक संस्था कराकरिता पात्र ठरणार नाही.**

**३. १५२–ब उपकराचा भार**:–

(१)	महानगरपालिकेने ज्या वर्षामध्ये कलम १२७ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला उपकर बसविण्याचे ठरवले असेल .

(अ) त्या वर्षाच्या लगतपुर्वीच्या वर्षामध्ये किंवा

(ब) त्या वर्षामध्ये झालेली ज्या व्यापा–याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल यासंबधात विहित करण्यात आलेल्या संबधित मर्यादेपेक्षा अधिक झालेली असेल किंवा अधिक होत असेल तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल .

परंतु ज्या व्यापा–याला उपखंड (अ) लागू होत नसेल परंतु उप खंड (ब) लागू होत असेल आणि महानगरपालिकेने उपकर बसविण्याचे ठरवले असेल, त्या वर्षाच्या १ एप्रिल नंतर ज्या व्यापा–याची सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल, विहित करण्यात संबध्द मर्यादेपेक्षा प्रथमत: अधिक होईल तो व्यापारी त्याने शहराच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास, उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या सबंधात विहित करण्यात आलेल्या संबध्द मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंत पात्र ठरणार नाही.



(२) पोट–कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या नंतरचे वर्ष असलेल्या अशा दिनांक १ एप्रिलपासून सुरु होणा–या कोणत्याही वर्षात , ज्या व्यापा–याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल ही या बाबतीत विहित केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा प्रथमच अधिक होईल , तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल :

परंतु तो व्यापारी , त्याने शहराच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोागासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास , उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरु होणा–या आणि उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल यासंबंधात विहित करण्यात आलेल्या संबंध्द मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंतच्या मुदतीत पात्र ठरणार नाही.

(३) उपकर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक व्यापारी त्याची नोंदणी योग्य रितीने रद्द करण्यात येईपर्यंत अशा रितीने उपकर भरण्यास पात्र असण्याचे चालु राहील , आणि ज्या दिवशी त्याच्या विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल किंवा आयातीची उलाढाल ही या बाबतीत विहित केलेल्या संबंधित मर्यादेपेक्षा पुन्हा प्रथमच अधिक होइल, त्या दिवशी तो पुन्हा उपकर भरण्यास पात्र होईल .

**सारांश** :–

**उपरोक्त कलमात व्यापारी व उलाढाल या शब्दांचा प्रयोग करण्यात आला असून सदर तरतूदीनुसार फक्त व्यापा–यांनीच हा कर भरावयाचा आहे असे स्पष्ट दिसते.**

४. **नोंदणीकरिता उलाढालीच्या मर्यादा**: १) नोंदणीकरिता उलाढालीच्या मर्यादा पुढील प्रमाणे असतील :

क) व्यापारी, जो आयात करणारा असून आणि ज्याची अनुसूची क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या खरेदीची किंवा विक्रीची उलाढाल, वर्षभरात, रुपये ५००० पेक्षा कमी नाही आणि त्या वर्षभरात त्याने आयात केलेल्या सर्व मालाचे मुल्य रुपये ५००० पेक्षा कमी नाही आणि त्या वर्षभरात त्याची विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल ही रुपये १,००,००० पेक्षा कमी नाही .

ख) अन्य कोणत्याही बाबतीत खंड (क) अन्वये एखादा व्यापारी, स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र झालेला नसेल अशा प्रकरणासह आणि अनुसूची क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या खरेदीची उलाढाल वर्षभरात रुपये ५००० पेक्षा कमी नाही आणि त्याच्या सर्व विक्रीची उलाढाल वर्षभरात रुपये १,५०,००० पेक्षा कमी नाही.

(२) उपनियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी शहराच्या हद्दीत एखादा विशिष्ट धंदा नियमितपणे न करणारा एखादा व्यापारी किंवा व्यक्ती शहराच्या हद्दीत तात्पुरत्या स्वरुपात एखादा धंदा करीत असेल तर या अधिनियमाखाली व नियमाखाली असा व्यापारी किंवा व्यक्ती उपनियम –१ खाली तात्पुरत्या नोंदणीस पात्र राहील .

सारांश :–

उपरोक्त नियमात उलाढाल या शब्दाचा प्रयोग करण्यात आला असून फक्त व्यापा–यांनी नोंदणी करावयाची आहे व कर भरावयाचा आहे असे स्पष्ट दिसते .

व्यापारी या शब्दाच्या व्याख्येत अपवाद मधील तरतूदीनुसार स्वत:च्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती स्थानिक संस्था कराकरिता पात्र ठरणार नाही. या तरतूदीमूळे स्थानिक संस्था कर या शब्दाच्या व्याख्येत नमूद कर आकारणीचे उपयोग व उपभोग हे दोन्ही उद्दीष्टे साध्य होत नाही असे दिसते . कारण हे दोन्ही उद्दिष्टे व्यक्तीगत स्तरावर पुर्ण होत आहे परंतु नियमातील तरतूदीनुसार व्यक्ती करपात्र ठरत नाहीत. अपवादातील करण्यात आलेली ही तरतूद स्थानिक संस्था कर या शब्दाच्या व्याख्येंशी विसंगत आहे असे दिसते .

कोणत्याही व्यक्ती यांनी स्वत:ला उपयोग व उपभोग यासाठी आयात केलेल्या वस्तुंवर स्थानिक संस्था कर आकारणी न केल्यामूळे शहरात व्यापा–यांच्या व्यापारावर व महापालिका उत्पन्नावर होणारा परिणाम :



उल्हासनगर शहराचा भौगोलिक दृष्टया विचार केल्यास शहराच्या एका बाजुस कल्याण तर दुस–या बाजुस अंबरनाथ ही शहरे आहेत . कल्याण शहरात जकात आकारणी केली जाते परंतु अंबरनाथ शहरात जकात किंवा स्थानिक संस्था कर या दोन्हीपैकी कोणत्याही कराची आकारणी केली जात नाही. अंबरनाथ शहर हे उल्हासनगर शहराला लगत असून या शहराची मुख्य बाजारपेठ उल्हासनगर शहराच्या बाजारपेठेपासून फक्त २ कि.मी. अंतरावर आहे. उल्हासनगर पासून अंबरनाथ शहरात जाण्यासाठी ट्रेन, रिक्षा, बस किवा स्वत:च्या वाहनाने जाता येते व त्यासाठी फक्त ५ ते १० रुपये खर्च होतो.

उल्हासनगर शहरात आयात होणा–या इलेक्ट्रीकल किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तुंवर साधारणत: ४ टक्के स्थानिक संस्था कराची आकारणी करण्यात येते . अशा परिस्थितीत उल्हासनगर शहरातील व्यापा–यास १,००,०००/– रुपये किंमत असलेल्या वस्तुंवर ४ टक्के दराने स्थानिक संस्था कर आकारण्यात येईल त्यामूळे त्या व्यापा–यास ती वस्तु १,०४,०००/– मध्ये प्राप्त होईल . याचा अर्थ असा की, सदर व्यापा–यास ती वस्तु १,०४,०००/– पेक्षा कमी दराने विकता येणार नाही. अंबरनाथ शहरात जकात किंवा स्थानिक संस्था कराची आकारणी होत नसल्यामूळे त्या शहरातील व्यापा–यास तीच इलेक्ट्रॉनिक वस्तु १,००,०००/– किंमतीत मिळेल व सदर व्यापा–यास ती वस्तु १,०४,०००/– पेक्षा दराने कमी दराने विकता येईल .

अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीने स्वत:च्या वापरासाठी दोन चाकी , चार चाकी वाहने किंवा फर्निचर इत्यादी वस्तु खरेदी करावयाचे असल्यास ती व्यक्ती अंबरनाथ शहरामधूनच खरेदी करणे योग्य समजेल.

उल्हासनगर व अंबरनाथ या दोन्ही शहरातील व्यापा–यांच्या वस्तुंच्या खरेदी दराच्या तफावतीमळे कोणतीही सामान्य व्यक्ती उल्हासनगर शहरात वस्तु खरेदी न करता अंबरनाथ शहरातून खरेदी करावयाचे ठरवेल. त्यामूळे उल्हासनगर शहरातील व्यापारांचा धंदयावर परिणाम होवून त्यांची खरेदी कमी होईल . परिणामी व्यापारी वर्ग महापालिकेस स्थानिक संस्था कराचा कमी भरणा करतील व महापालिका आर्थीक बाबतीत कंकुवत होवून शहरात मुलभूत सुविधा पुरविणे कामी असमर्थ ठरेल .

स्थानिक संस्था कर लागू केल्यामूळे महापालिकेस व शहरातील व्यापा–यांना उद्‌भवणा–या समस्या मा. महापौर महोदयांनी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयात मा. मुख्यमंत्री महोदय व मा. प्रधान सचिव , नगर विकास यांच्या निर्देशनास आणून दिल्या आहेत तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याशीही प्रत्यक्ष भेट घेवून चर्चा करण्यात आली होती. मा. मुख्यमंत्री महोदयांनी सर्व बाबींची शहानिशा करुन दिनांक १७ एप्रिल,

२०१२ पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यास स्थगती दिली असून हि स्थगती फक्त ३० जुन २०१२ पर्यंत आहे .

**"विवक्षित प्रकरणांत स्थानिक करापासून सुट या तरतूदीमूळे उत्पन्नावर होणारा परिणाम** :

उल्हासनगर शहरात बरेच व्यापारी कोणतीही प्रक्रिया कामाच्या तत्वावर करणेसाठी शहराबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून कोणताही माल आयात करीत आहेत आणि प्रक्रिया करण्यात आलेला माल पुन्हा शहराबाहेर परत पाठवित आहे . जकात नियमात याबाबत कोणतीही सुट नव्हती त्यामूळे आयात करण्यात आलेल्या सर्व मालावर जकात आकारणी करण्यात येत होती परंतु स्थानिक संस्था कर नियमात नियम २८ (४) अन्वये अशी प्रक्रिया करण्यात येणा-या व्यापा-यांना स्थानिक संस्था करात सुट देण्यात आली आहे . सदर नियम अन्वये ज्या प्रक्रियांसाठी सुट देण्यात आलेली आहे ती पुढील प्रमाणे आहे .

(१) भरडणे , रंगविणे, विरंजन करणे , रंग लेप देणे, छपाई करणे, शेवटचा हात देणे, स्टॅटरिंग (Stentering), भरतकात करणे, डबलिंग (Doubling), व्टिस्टींग (Twisting), धातुरुप देणे (Metalising) आणि विदयुतविलेपन .

(२) सांगाड बाधून ते सर्व प्रकारच्या वाहनाच्या साठयावर (ChassiS) बसविणे आणि त्यामध्ये आयुक्त वेळोवेळी मान्यता देईल अशा इतर प्रक्रियांचा देखील समावेश होईल .

उपरोक्त सर्व प्रकारच्या प्रक्रिया करणा-या व्यापा-यांना स्थानिक संस्था करापासून सुट दिल्यामूळे स्थानिक संस्था करावर मोठा परिणाम होवून तो फारच कमी प्राप्त होईल .



**खाजगीकरणाची तरतूद नसल्यामूळे महापालिका उत्पन्नावर परिणाम** :

स्थानिक संस्था कर नियमात खाजगीकरणासंबंधी कोणतीही मुभा देण्यात आलेली नसल्याचे दिसते . महापालिकेच्या जकात विभागातील एकूण कर्मचा-यांपैकी मागील खाजगीकरणाच्या १५ वर्षाच्या कालावधीत काही कर्मचारी सेवानिवृत्त तसेच मृत्यू झाले आहेत . व त्याजागी कोणतेही नवीन पदे भरती करण्यात आलेले नाहीत तसेच स्थानिक संस्था कर लागू केल्यामूळे नव्याने कर्मचा-यांची भरती करावी लागेल शिवाय स्टेशनरी साहित्य, संगणक , व संगणक साहित्य व इतर बाबींवर कोटी रुपयांचा खर्च करावा लागेल .

जकात खाजगीकरण , शासन निर्णयाप्रमाणे किमान देकार रक्कम निश्चित करणेसाठी मागील वर्षात प्राप्त झालेल्या रक्कमेत दरवर्षी कमीत कमी १५ टक्के वाढ तसेच जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी ई-टेन्डरींग या सर्व सुधारणांमूळे प्रत्येक वर्षी जकात उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ अपेक्षित आहे . मागील १५ वर्षाच्या कालावधीत वाढ स्पष्ट दिसत आहे .

**इतर स्त्रोत** :-

मालमत्ता करापोटी वसुल होणारी रक्कम ही ठराविक असून पाणी पुरवठा सेवा ही खरेदीपेक्षा कमी दराने पुरविण्यात येत असल्यामूळे मालमत्ता करापोटी वसुल होणा-या रक्कमेपैकी मोठया हिश्याची रक्कम पाणी पट्टी सेवेत वर्ग करावी लागते . ही वस्तुस्थिती राज्यातील सर्व महानगरपालिकेत दिसून येईल . अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्था ही जकात वसुलीवर पुर्णपणे अवलंबून असते .

**शहर विकासावर परिणाम** :

उल्हासनगर महानगरपालिकेने जकातीपोटी वसुल होणारी रक्कम लक्षात घेवून मोठया प्रमाणावर गुंतवणूक असलेल्या पाणी पुरवठा योजना , भुयारी गटार योजना, ई -गव्हनर्स, रस्ते विकास इत्यादी कामे हाती घेतली आहेत . स्थानिक संस्था कर अंमलबजावणी व त्यामूळे वित्तीय परिस्थितीवर होणा-या परिणामामूळे

मुलभूत सेवासंबंधी या सर्व योजना अर्धवट बंद पडून केंद्र शासन , राज्य शासन व महानगरपालिकेने गुंतविलेल्या कोटी रुपयांची गुंतवणूक वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**काही महानगरपालिकेत स्थानिक संस्था कराची वसुली करतांना नियमबाहय कार्यवाही** : मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २(१६अ) अन्वये व्यापारी या शब्दाची व्याख्या नमूद करण्यात आली आहे . सदर व्याख्येत अपवाद (एक) अन्वये केवळ स्वत:च्या उपयोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारा कोणताही व्यक्ती ही व्यापारी असणार नाही व त्यामूळे त्यांचेकडून कराची वसुली करता येणार नाही असे स्पष्ट होत आहे. परंतु काही महानगरपालिकेने या अपवादाचे उल्लंघन करुन स्वत:च्या उपयोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणा—या व्यक्तीकडून कराची वसुली केलेली हे नियमबाहय आहे . अशा महापालिकांना वस्तुस्थितीची माहिती झाल्यास किंवा व नियमातील तरतूदीनुसार केवळ स्वत:च्या उपयोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणा—या कोणत्याही व्यक्तींना सुट दिल्यास सर्व महानगरपालिकांचीही स्थानिक संस्था करापोटी वसुलीवर मोठया प्रमाणावर घट होईल.

**व्यापा—यांचा रोष** :
जकात , उपकर किंवा स्थानिक संस्था कर हे सर्व स्थानिक कर असून ते स्थनिक परिस्थितीला अनुकूल असणे आवश्यक आहे परंतु उल्हासनगर शहरातील व्यापा—यांनी स्थानिक संस्था कर नियमातील पुढील तरतूदींमूळे स्थानिक संस्था कर आकारणी संबंधी रोष व्यक्त केला आहे.

१) अधिनियमाचे कलम १५२ ग मधील तरतूदीनुसार १० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीचा माल विक्री करतांना देयक काढणे आवश्यक आहे . सध्या पान विक्रेत्यामार्फत विकल्या जाणा—या पानाची किंमत १० रुपयांपेक्षा जास्त असून पान विक्रेत्यालाही बील दयावे लागेल व ते प्रत्यक्षात अवघड आहे.

२) काढण्यात आलेले देयक ५ वर्षासाठी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे .

३) स्थानिक संस्था कर नियमातील नियम २२ ख अन्वये ५०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीची वस्तु विक्री करतांना विकत घेणा—याचे नाव, पत्ता व धंदयाचे स्वरुप नमूद करणे आवश्यक आहे .

४) प्रत्येक व्यापा—यास विहित कालावधीत विवरण पत्रे तसेच वर्षातून एकदा एकत्रित विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.



५) मुल्य निर्धारण प्रकरणांचे अभिलेख ३ ते १० वर्षापर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

६) अधिनियमातील कलम ४८ अन्वये विवक्षित प्रकरणे, शास्ती लादणे व व्याज आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे जर एखादया व्यापा—याने विहित मुदतीत स्थानिक संस्था कर भरला नाही तर पहिल्या १२ महिन्यासाठी २४ टक्के व दुस—या वर्षापासून ३६ टक्के व्याजाची आकारणी ही फार मोठी आहे. सदर नियमाप्रमाणे जर एखादया व्यापा—याने खरेदीदार व्यापा—यास बील , बीजक किंवा रोखणीचे टिप्पण देण्यास कसुर केल्यास , कोणत्याही व्यापा—याने आवश्यक असल्याप्रमाणे नोंदणीकरिता अर्ज करण्यात कसुल केल्यास, लेखा पुस्तके व कागदपत्रके सादर करणे किंवा तपासणी करणेसंबंधी नोटीसीचे पालन न केल्यास या सर्व बाबींसाठी शास्ती लावण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक दिरंगाईसाठी शास्तीची रक्कम निश्चित नसून कमीत कमी २ व जास्तीत जास्त १० पटीपर्यंत लावण्याचे अधिकार सबंधित अधिका—यास देण्यात आलेले आहेत . सदर मुखत्यारी (Descretion) मूळे अधिकारी स्वत:चा मनमानी कारभार चालवून जास्तीत जास्त शास्ती लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामूळे व्यापा—यात असंतोषाची भावना निर्माण होईल .

७) स्थानिक संस्था करासंबंधी कलम १५२ ल मध्ये विविध अपराधांसाठी दोन वर्षापर्यंत असु शकेल एवढया मुदतीच्या कारावासाची आणि दंडाची शिक्षा देणे बाबत तरतूद करण्यात आली आहे .

८) व्यापा—यांनी त्यांचे व्यापारासंबंधी महापालिकेत सादर केलेल्या कोणत्याही निवेदनातील, पुरविलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही लेख्यांतील सर्व माहिती गोपनीय समजण्याची तरतूद अधिनियमात कलम १५२ म अन्वये करण्यात आली आहे परंतु प्रत्यक्षात ते गोपनीय ठेवणे शक्य नाही व

त्यामूळे व्यापा–याच्या व्यापारासंबंधी माहिती सारखाच व्यापार करणा–या व्यापा–यास (Competitor) उघड होण्याची शक्यता आहे .

९) स्थानिक संस्था कर आकारणीचे दर निश्चित करण्याचे अधिकार फक्त आयुक्त व राज्य शासन यांना आहेत . निवडून आलेले जन प्रतिनिधी यांचे सदर प्रक्रियेत कोणतीही भुमिका नाही ही बाब योग्य वाटत नाही.

**इतर महानगरपालिकेतही स्थानिक संस्था कर आकारणीस विरोध :**

राज्य शासनाने दिनांक १/७/२०१२ पासून राज्यातील इतर महानगरपालिकेतही स्थानिक संस्था कर बसविण्याचे निर्देश दिले आहेत त्यापैकी कल्याण डोंबीवली महानगरपालिका व अमरावती महापालिकेत स्थानिक संस्था कर आकारणी विरुध्द ठराव करण्यात आलेला आहे.

**मुद्रांक शुल्क अधिभाराचे प्रमाण :–**

एखादया महानगरपालिकेने स्थानिक संस्था कर लावल्यास त्या शहरात मुंबई मुद्रांक अधिनियम १९९८ अन्वये स्थावर मालमत्तेची विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यावरील संलेखाव्दारे सुरक्षित रक्कमेवर १ टक्का अधिभार आकारुन वाढ करण्याची तरतूद करण्यात आली आहे व ती रक्कम अनुदानाच्या स्वरुपाने महापालिकेस प्राप्त होईल . या प्रयोजनाकरिता मागील ३ वर्षात वसुल झालेला रक्कमेचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २०१०–२०११ | ११.०२ कोटी |
| २ | २०११–२०१२ | १३.३५ कोटी |

उपरोक्त तक्ता पहाता, महापालिकेस प्राप्त होणारी १ टक्का अधिभार रक्कमेचे प्रमाण अत्यल्प अंदाजे ३ कोटी पर्यंत होईल असे वाटते .

**स्थानिक संस्था कर (ऐच्छिक कर) :**

**कर आकारणी संदर्भात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदी पुढील प्रमाणे आहे.**

**१२७ या अधिनियमान्वये बसवावयाचे कर :–**

१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी , महानगरपालिका पुढील कर बसविल :–

अ) मालमत्ता कर

२) पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करांच्या शिवाय आणखी, महानगरपालिकेस या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी व त्याच्या तरतूदीच्या अधिन राहून पुढीलपैकी कोणतेही कर बसविता येतील –

अ) जकात :

(अअ) शहरामध्ये, उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या शहराच्या हद्दीमध्ये होणा–या मालाच्या प्रवेशावर, राज्य शासनाच्या पुर्वमंजुरीने जकातीऐवजी बसवावयाचा उपकर .



परंतु राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे महानगरपालिकला , उपभोग, उपयोग, किंवा विक्री यासाठी शहरामध्ये होणा–या मालाच्या प्रवेशावर जकातीऐवजी उपकर बसविण्याकरिता निर्देश देता येतील .

(अअअ)उपभोग, उपयोग किंवा विक्री यााठी शहराच्या हद्दीमध्ये होणा–या मालाच्या प्रवेशावर, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे , राज्य शासनाने असा निर्देश दिल्यास , जकात किंवा उपकर यांचेऐवजी बसवावयाचा स्थानिक संस्था कर :

उपरोक्त कलम १२७ चे पोटकलम २ मध्ये विहित जकात किंवा अन्य कोणताही कर हे ऐच्छिक स्वरुपाचे कर असून यापैकी कोणताही कर बसविण्याचे अधिकार महापालिकेस असणे आवश्यक आहे . या कलमात जकात ऐवजी उपकर किंवा उपकराऐवजी स्थानिक संस्था कर बसविण्याचे शासनाचे अधिकार ही तरतूद कायदे करणा–या अधिका–याच्या ऐच्छिक कर या उद्देशाशी (Intention of Legislature) विसंगत आहे असे वाटते .

उल्हासनगर महानगरपालिकेस दिनांक १/४/२०१२ ते १९/४/२०१२ या कालावधीत जकाती ऐवजी ३१/३/२०१२ च्या शासन आदेशान्वये स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला होता. तथापी दिनांक १९/४/२०१२ च्या शुध्दीपत्रकान्वये दिनांक १/७/२०१२ पासुन स्थानिक संस्था कर लागू करण्यात येईल असे कळविण्यात आले. परिणामी दिनांक १ ते १९ एप्रिल, २०१२ या कालावधीत जकात किंवा स्थानिक संस्था कर या माध्यमातून महापालिकेस कोणतेही आर्थिक उत्पन्न प्राप्त झाले नाही. महापालिकेला जकातीपासून दररोज रुपये ४०,०४,७४१/— एवढे उत्पन्न प्राप्त होणार होते. तथापी दिनांक ३१/३/२०१२ च्या शुध्दीपत्रकान्वये या कालावधीत महापालिकेस जकात/स्थानिक संस्था कर या माध्यतातून कोणतेही उत्पन्न प्राप्त झाले नाही. महापालिकेच्या उत्पन्नाचे साधन जकात वगळता मालमत्ता कर/पाणीपट्टी कर एवढेच आहेत. या १९ दिवसामध्ये महापालिकेला जकातीच्या माध्यमातून रु. ७.६१ कोटी एवढे उत्पन्न मिळाले असते. परंतु १९ दिवसामध्ये सदर उत्पन्नास मुकावे लागले आहे.

महापालिकेची आर्थिक स्थिती पूर्णपणे ढासळली असून पगार व इतर भत्ते, ठेकेदारांचे देयके, पाणी पुरवठा देयके, विद्युत देयके इत्यादीची अदायगी करणे अशक्य झालेले आहे. त्यामुळे १९ दिवसांचा महापालिकेला झालेला वित्तीय तोटा रु. ७.६१ कोटी भरुन काढण्यासाठी शासनाकडुन अनुदान स्वरुपात प्राप्त होणेसाठी प्रस्तावित.

<u>सारांश :</u>
उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, स्थानिक संस्था कराची आकारणी ही उल्हासनगर शहरातील व्यापारी वर्ग व महापालिकेच्या हिताची ठरणार नाही त्यामूळे स्थानिक संस्था कराऐवजी जकात कर लागू करणेसाठी प्रस्तावीत करीत आहे .

**महासभा ठराव क्रमांक :२५** **दिनांक :** **१९/५/२०१२.**

सुचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वधारिया

ही महासभा उपरोक्त प्रस्तावनेत नमूद विविध बाबींचे अवलोकन करुन पुढील प्रमाणे प्रस्ताव मंजुर करीत आहे .

१) शासनाचे ३१/३/२०१२ च्या आदेशान्वये महापालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागु केल्यानंतर दिनांक १/४/२०१२ ते १७/४/२०१२ या कालावधीत जकात किंवा स्थानिक संस्था कर या माध्यमातुन महापालिकेस कोणतेही आर्थिक उत्पन्न प्राप्त न झाल्यामुळे १७ दिवसाच्या जकातीच्या माध्यमातुन महापालिकेला मिळणा—या ७.६१ कोटी रक्कमेचा वित्तीय तोटा भरुन काढण्यासाठी अनुदान मिळावे अशी शासनाकडे विनंती करीत आहे.
२) शासनाने स्थानिक संस्था कर नियमात पुढील प्रमाणे सुधारणा केल्यास ते स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिताचे राहील .
अ) कोणत्याही व्यक्तीने स्वत:च्या वापरासाठी माल आयात केल्यास , त्या मालावर स्थानिक संस्था कर लागू करणेसाठी नियमात तरतूद करुन वसुलीसाठी पध्दत निश्चित करावी.
ब) सुरुवातीच्या ५ वर्षात स्थानिक संस्था करापोटी वसुल करण्यात आलेली रक्कम वार्षिक जकात रक्कमेपेक्षा कमी झाल्यास, फरकाची रक्कम शासनाने अनुदानाच्या स्वरुपात भरपाई करावी . यासाठी शासनाने जकात वसुलीसाठी विहित केलेल्या प्रतिवर्षी १५ टक्के वाढ सुनिश्चित करावी



३) उपरोक्त सुधारणे अभावी स्थानिक संस्था कराची आकारणी ही उल्हासनगर शहरातील व्यापारी वर्ग व महापालिकेच्या हिताची ठरणार नाही त्यामूळे स्थानिक संस्था कराऐवजी जकात कर लागू करणेसाठीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे .

४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ चे पोटकलम २ मध्ये विहित जकात किंवा अन्य कोणताही कर हे ऐच्छिक स्वरुपाचे कर असून हे कर बसविण्याचे अधिकार महापालिकेचे आहे. सबब राज्य शासनाने उल्हासनगर महानगरपालिकेची नियमात सुधारणेसंबंधीची विनंती मान्य न केल्यास दिनांक १/७/२०१२ पासून जकात , उपकर किंवा स्थानिक संस्था कर या करापैकी कोणताही कर लागू न करण्याचा निर्णय घेत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक ९/७/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली अर्थसंकल्पावरील पहिली सभा सायंकाळी ७.१५ वाजेपर्यंत चालल्याने दिनांक ९/७/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेली दुसरी सभा स्थगित करुन दिनांक १३/७/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २६ अ** **दिनांक : ९/७/२०११**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ९/७/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या या सभेचे कामकाज शुक्रवार दिनांक १३/७/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

उप—महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक १९/५/२०१२ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव    :  श्री. रामचंद्र पारवानी

अनुमोदकाचे नाव : श्री. भगवान भालेराव

**महासभा ठराव क्र.** २६ ब                                                  **दिनांक : १३/७/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १९/५/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते  ७४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :—**विशेष समित्यांची रचना करणे.

**प्रस्तावना**

सन—२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. या सदस्यांमधुन मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येईल व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येईल.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल. महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | पाठींबा दिल्याने संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | पाठींब्यानंतर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २० | ० | — | २० |
| शिवसेना | १९ | ० | — | १९ |
| भाजपा | ११ | ० | — | ११ |
| कॉंग्रेस | ८ | ० | — | ८ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ७ | ३ | — | १० |
| आर.पी.आय(आठवले गट) | ४ | ० | — | ४ |
| बहुजन समाज पार्टी | २ | —२ | — | ०० |
| अपक्ष | ०१ | —१ | — | ०० |
| मनसे | ०१ | ०० | — | ०१ |
| अपक्ष | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ | ००<br>००<br>००<br>००<br>०० | —<br>—<br>—<br>—<br>— | ०१<br>०१<br>०१<br>०१<br>०१ |
| एकूण | ७८ | | | ७८ |

| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | १० | ८ | ४ | १ | ५ |

| 78 | = 8-66 |
|---|---|
| 09 | |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण– ८.६६ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | रा.का.पा. | २० / ७८ X ०९ | = २.३० | (७) | मनसे | १ / ७८ X ०९ | = ०.११ |
| (२) | शिवसेना | १९ / ७८ X ०९ | = २.१९ | (८) | अपक्ष | १ / ७८ X ०९ | = ०.११ |
| (३) | भाजपा | ११ / ७८ X ०९ | = १.२६ | (९) | अपक्ष | १ / ७८ X ०९ | = ०.११ |
| (४) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया | १० / ७८ X ०९ | = १.१५ | (१०) | अपक्ष | १ / ७८ X ०९ | = ०.११ |
| (५) | कॉंग्रेस | ०८ / ७८ X ०९ | = ०.९२ | (११) | अपक्ष | १ / ७८ X ०९ | = ०.११ |
| (६) | आरपीआय | ४ / ७८ X ०९ | = ०.४६ | (१२) | अपक्ष | १ / ७८ X ०९ | = ०.११ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | १ | ६ |

यानंतर रिक्त राहणा–या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) कॉंग्रेस ०.९२ (२) आरपीआय ०.४६ (३) रा.का.पा. ०.३०

(४) भा.ज.पा. ०.२६ (५) शिवसेना ०.१९ (६) सेक्युलर अलायन्स

ऑफ इंडीया ०.१५

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (७) म.न.से | ०.११ | (८) अपक्ष | ०.११ | (९) अपक्ष | ०.११ |
| (१०)अपक्ष | ०.११ | (११) अपक्ष | ०.११ | (१२) अपक्ष | ०.११ |

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर कॉग्रेस, आरपीआय, व राष्ट्रवादर कॉग्रेस या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक–एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| रा.का.पा. | शिवसेना | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

<u>महासभा ठराव क्र:</u> २७

<u>दिनांक:–१३/७/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजू जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रत्येक विषय समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील ९ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

१. <u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. दिलीप देविदास जग्यासी

२. श्रीमती दिप्ती नविन दुधानी

३. श्रीमती. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

४. श्रीमती. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी

५. श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा

६. कु. शकुंतला जीवनलाल जग्यासी

७. श्रीमती. पुष्पा मिलिंद बागुल

८. श्री. सुरेश मधुकर जाधव

९. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे

२. <u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के

२. श्रीमती कांचन अमर लुंड

३. श्री. सतरामदास फतनदास जेसवानी

४. श्री. नरेंन्द्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर

५. श्रीमती. भागीबाई हरीसिंग लबाना

६. श्रीमती. मीनाकौर अजितसिंग लबाना

७. श्री. भगवान शंकर भालेराव

८. श्रीमती. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर

९. श्रीमती. ज्योती दिलीप गायकवाड

**३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती**

१. श्री. दिपक (टोनी) लक्ष्मण सिरवानी

२. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

३. श्रीमती. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी

४. श्री. राजु किशीनचंद जग्यासी

५. श्री. गणपत गोविंद ऐडके

६. श्रीमती. जया प्रकाश माखिजा

७. श्रीमती. पंचशिला नाना पवार

८. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे

९. श्रीमती. जयश्री गजानन कांबळी

**४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती**

१. श्री. विजय रामभाऊ तायडे

२. श्रीमती जया मोहन साधवानी

३. श्रीमती. वनिता संजय बठिजा

४. श्रीमती. सोनिया राजु जग्यासी

५. श्री. गुरुनो भिकोमल वलेचा

६. डॉ. नीना प्रकाश नाथानी

७. श्री. भगवान शंकर भालेराव

८. श्रीमती. लिलाबाई लक्ष्मण आशान

९. श्रीमती. राजश्री राजेंद्र चौधरी

**५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती**

१. श्रीमती अनिता संतोष तरे

२. श्रीमती. पिंकी मुरलीधर उदासी

३. श्रीमती. कमला गोदुमल क्रिष्णानी

४. श्रीमती मिनू राजकुमार दासानी

५. श्री. राजेश रामसिंग कंडारे

६. श्रीमती. माया हरेश चावला

७. श्रीमती. पंचशिला नाना पवार

८. श्रीमती. समिधा आदिनाथ कोरडे

९. श्रीमती. अपेक्षा विकास पाटील

**६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती**

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील

२. श्रीमती. अंजली चंद्रकांत साळवे

३. श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता

४. श्रीमती. शशिकला शिवाजी आवारे

५. श्रीमती. शुभांगी मनोहर बेहनवाल

६. श्री. हरेश परमानंद जग्यासी

७. श्रीमती. आशा नाना बिऱ्हाडे

८. श्री. जयेंद्र चंद्रकामं मोरे

९. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर

**७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती**

१. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे

२. श्रीमती. मीना दिपक सोनेजी (सोंडे)

३. श्रीमती. वनिता संजय बठिजा

४. श्री. सतरामदास फतनदास जेसवानी

५. श्री. जाफर अली चौधरी

६. कु. जयश्री जीवनलाल जग्यासी

७. श्रीमती. पुष्पा मिलिंद (नाना) बागुल

८. श्री. प्रधान धर्मा पाटील

९. श्री. सुरेश मधुकर जाधव

**८. महिला व बालकल्याण समिती**

१. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी

२. श्रीमती. मीना दिपक सोनेजी (सोंडे)

३. श्रीमती सोनिया राजू जग्यासी

४. श्रीमती मिनू राजकूमार दासानी

५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग

६. श्रीमती. अर्चना गोकूळ करणकाळे

७. श्रीमती. आशा नाना बिऱ्हाडे

८. श्रीमती. वसुधा धनंजय बोडारे

९. श्रीमती नेहा नंदकुमार भोईर

**९. महसूल समिती**

१. श्री. सुजीत के. चक्रवती

२. श्री. राजेश नानिकराम वधारीया

३. श्री. गणपत गोविंद ऐडके

४. श्री. गुरुनो भिकोमल वलेचा

५. श्रीमती. इसरद सौऊद खान

६. श्रीमती. मीना कुमार आयलानी

७. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
८. श्रीमती. अनिता सचिन भानुशाली
९. श्रीमती मंदाकिनी सागर सोनकांबळे

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:—** वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार श्री. गोपी लालजी चौहान यांच्या जागी श्रीमती

मनिषा मिलिंद गोरे यांना वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण— २२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि. ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील खालील वैद्यकिय सेवा निवृत्त सफाई कामगार यांच्या जागी त्यांचे वारसांना नियुक्ती देण्याबाबत दिनांक १२/७/२०१० रोजीच्या महासभेत मंजुरी करिता प्रस्तावित करण्यात आले होते

तथापी श्रीम. मनिषा मिलींद यांचे नावास महासभा ठराव क्र. ११ दि. १२/७/२०१० रोजी मान्यता दिलेली नाही.

सदर प्रस्ताव वादग्रस्त असल्याने रोखुन ठेवण्यात आला होता तसेच सदरच्या सभे मधे काही सन्मानीय सदस्यांनी या बाबत कारवाई करण्याची मागणी केली होती. तथापी मा. महापौर यांचे दि. ३०/५/२०१० चे पत्र व मा. उपमहापौरयांचे दि. ४/१०/२०१० चे पत्राप्रमाणे सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी तथा चौकशी अधिकारी यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअधिकारी यांनी चौकशी दरम्यान अर्जदार, तक्रारदार, व मुळनोकरदार यांना प्रत्याक्ष सुनावणीसाठी बोलवीले आस्ता त्यांचे जवाबानुसार व चौकशी अहवालाच्या निष्कर्षा अंती श्री. गोपी लालजी चौव्हाण यांच्या रिक्त जागी त्यांची बहिण श्रीम. मनिषा मिलींद गोरे हयाच वारस पात्र ठरतात त्यानुसार सदर प्रस्तावास मा. आयुक्त सो यांनी पुन्हा महासभेची मान्यता देण्यस मंजुरी दिली आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचा—याचे नाव | वैद्यकीय सेवानिवृत्त | वारसाचे नाव | कर्मचा—याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गोपी लालजी चौहाण | ३०/५/२००९ | श्रीम. मनिषा मिलींद गोरे | मावस बहिण |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा "नियुक्ती प्राधिकारी" म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसदारास उल्हासनगर महानगरपालिकेतील वैद्यकीय सेवानिवृत्त, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता पुन्हा प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: २८**      **दिनांक:—१३/७/२०१२**

सुचकाचे नाव :— डॉ. महेश गावडे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पुष्पा बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार श्री. गोपी लालजी चौहान यांच्या जागी श्रीमती मनिषा मिलिंद गोरे यांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:–** स्वेच्छा सेवा निवृत्त सफाई कामगार श्रीमती सुमन लक्ष्मण लोट यांच्या जागी श्री. हरेंन्दर निरंजन सिंग यांना नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण– २२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि. ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्ती, मृत्यु, तसेच स्वेच्छा किंवा वैद्यकिय सेवा निवृत्तीनंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील स्वेच्छा सेवा निवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालील वारसदाराने विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र | सफाई कर्मचा–याचे नाव | वैद्यकीय सेवानिवृत्त | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. सुमन लक्ष्मण लोट | ३०/५/२०११ | श्री. हरेंन्दर निरंजन सिंग | दत्तक मुलगा |

सदर प्रस्तावास शासन मार्गदर्शनाच्या अधिन राहुल सादर करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त तथा सहाय्यक आयुक्त वेतन श्रेणीचे अधिकाऱ्यांना त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसास उल्हासनगर महानगरपालिकेतील स्वेच्छा सेवानिवृत्त, सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता पुन्हा प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २९ **दिनांक:–१३/७/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. दिलीपकुमार जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे स्वेच्छा सेवा निवृत्त सफाई कामगार श्रीमती सुमन लक्ष्मण लोट यांच्या जागी श्री. हरेंन्दर निरंजन सिंगे यांना वारसा हक्काने नियुक्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६:—** एक वर्षापेक्षा जास्त कालावधी अनाधिकृतपणे गैरहजेरीसाठी खातेनिहाय चौकशीत दोषी सिध्द झालेल्या आठ सफाई कामगारांची एक वेतनवाढ रोखणे व त्यांना कामावर रुजु करुन घेण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.परिपत्रक क्र.अरजा/२४८८/१०६१/सेवा/०९ दि. ७/१/१९८९ च्या परिपत्रकानुसार म.ना.से. (रजा) नियम १६ व ६३ (२) नुसार शिथिल करुन दिर्घकालिन असाधारण रजा मंजूर करण्यासंदर्भात परिपत्रकातील परिच्छेद ३ मध्ये विहित केलेली आहे. त्यानुसार म.ना.से. (रजा) १९८९ नियम ४० व ४९ अन्वये संबंधित कर्मचा—याना रजा वाढ देण्यापूर्वी वैदयकिय मंडळापुढे उभे करण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे अ.क्र. १ते ८ मधील कर्मचा—याचा गैरहजर कालावधी १ वर्षापेक्षा जास्त आहे. अ.क्र. १ ते ६ मधील कर्मचा—यांनी जे. जे. समूह रुग्णालयाचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर केले असून त्यांना वैदयकिय मंडळाने फक्त सदय स्थितीत काम करण्यास पात्र आहेत. असे म्हटले आहे. अ.क्र. ७ व ८ मधील कर्मचा—यानी अदयापपर्यंत कोणत्याही प्रकारचा खुलासा सादर केलेला नाही. सदर कर्मचारी यांनी रजा कालावधीत वैदयकिय उपचाराबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्र सादर केलेली नाही त्यामुळे त्यांचा गैरहजर कालावधीतील अनुपस्थिती हि हेतूपुरस्कर कामावर अनुपस्थिती असल्यामुळे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र आहेत. सबब खाली नमुद केलेले कर्मचारी एक वर्षापेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असल्याकारणाने खालील कर्मचा—यांच्या गैरहजरीबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा—याचे नाव | पदनाम | गैरहजर दि. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रमेश सुखदेव लहुंडे | शिपाई | २२/१०/०७ | २/८/११ रोजी जे.जे.रुग्णालयास वै. पडताळणीबाबतचे पात्र असलेबाबतचे पत्र सादर केले. |
| २ | श्री. दिपक बाबू तांबे | मजुर | २३/५/०८ | २१/१२/१०रोजी जे.जे.रुग्णालयास वै. पडताळणीबाबतचे पात्र असलेबाबतचे पत्र सादर केले. |
| ३ | श्री. विष्णू प्रल्हाद पवार | माळी | १/१०/१० | १७/१०/११रोजी जे.जे.रुग्णालयास वै. पडताळणीबाबतचे पात्र असलेबाबतचे पत्र सादर केले. |
| ४ | श्री.प्रताप नारायणसिंग | रोड मुकादम | ११/२/१० | १४/११/११रोजी जे.जे.रुग्णालयास वै. पडताळणीबाबतचे पात्र असलेबाबतचे पत्र सादर केले. |
| ५ | श्री.अशोक देवराम अहिरे | मजुर | ३१/१०/०८ | १७/१०/११रोजी जे.जे.रुग्णालयास वै. पडताळणीबाबतचे पात्र असलेबाबतचे पत्र सादर केले. |
| ६ | श्री. मदनमोहन बोराडे | सुरक्षारक्षक | १८/५/१० | १३/९/२०११ रोजी जे.जे.रुग्णालयाचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| ७ | श्री. वामन आर. जाधव | मजुर | १/८/०८ | दि. १७/११/११रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. |
| ८ | श्री. रवि केशव शिरसाठ | मजुर | १४/७/०९ | दि. १७/११/११रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) “नियुक्ती प्राधिकारी” मा. महासभा आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव हा महासभेच्या मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. अशा विनापरवानगी व हेतूपुरस्कर गैरहजर असणा—या कर्मचा—याच्या बाबतीत म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ५ च्या तरतुदीनुसार खालील नमुद केलेल्या शिक्षेपैकी कोणतीही शिक्षा आमलात आणली जाते.

**किरकोळ शिक्षा—** १) ठपका ठेवणे २) बढती थोपवून धरणे ३) आर्थिक नुकसान केल्यास सर्व रक्कम किंवा तीचा भाग वेतनातुन कपात करणे ४) वेतनवृध्दी थोपवून धरणे.

**मोठया स्वरुपाची शिक्षा—**१) श्रेणीतील खालील पातळीवर आणणे, खालील पातळीवर आणल्यामुळे शासकिय कर्मचा—यास ज्या काळासाठी खालील पातळीवर आणले त्या काळात वेतनवृध्दी मिळेल किंवा नाही व अशा काळानंतर खालील पातळीवर आणणे पुढील वेतनवृध्दीवर

परिणामकारक असेल वा कसे हे आदेशात स्पष्ट करणे आवश्यक आहे. २) साधारणता पदोन्नतीस प्रतिबंधात्मक असेल अशा रितीने खालील समयश्रेणीत पदावर वा सेवेत आणणे ३) सक्तीची सेवानिवृत्ती ४) सेवेतुन काढून टाकणे, परंतु भावी नोकरीसाठी अपात्रता होणार नाही. ५) सेवेतुन बडतर्फ करणे. अशी बडतर्फी साधारणता भावी नोकरीसाठी अपात्रता ठरेल.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८९ (रजा) व (शिस्त व अपिल) तसेच मुंबई प्रांतिक्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार संबधित कर्मचा—यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी मा.महासभेपुढे प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: २९ अ**

**दिनांक:—१३/७/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे एक वर्षापेक्षा जास्त कालावधी अनाधिकृतपणे गैरहजेरीसाठी खातेनिहाय चौकशीत दोषीसिध्द झालेल्या आठ सफाई कामगारांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यास व त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी असाधारण रजा (विना वेतन) मंजुरीस, तसेच त्यांनी केलेल्या कामाच्या कालावधीचे वेतन अदा करुन त्यांना कामावर रुजु करुन घेण्याचा प्रस्ताव वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ७:—** मयत झालेल्या कर्मचा—यांच्या वारसांना करारपध्दतीने नियुक्ती देणे.

**प्रस्तावना**

मा. महासभा ठराव क्र. १८, दिनांक २०/६/२०११ रोजी ठाणे महानगरपालिके प्रमाणे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात घेणेसाठी वर्ग—क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/— व वर्ग—ड च्या उमेदवारांना रू ५४६५/— या ठोक वेतनावर करारपध्दतीने नेमणुक करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५१/११, दिनांक २० ऑगस्ट, २०११, उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६०/११, दिनांक २५ ऑक्टोंबर, २०११ व उमपा/साप्रवि /आस्था/ मुली /४७४/११, दिनांक ०१ डिसेंबर, २०११ आदेशान्वये उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन वर्ग—३ व वर्ग—४ मध्ये नेमणुक करण्यात आलेल्या आहेत.

वरील ठोक वेतनाच्या नेमणुकीनंतर मयत झालेल्या वारसांचे खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त व कागदपत्र अपुरे असलेल्या कर्मचाऱ्यांचे कामगदपत्र प्रप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नाव | मयत झालेल्या कर्मचारी यांचे वारसाचे नाते | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | अर्जदाराचे शिक्षण | जन्म तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कै. राधेश्याम रामदेव यादव | मुलगा | श्री. राजकुमार राधेशाम यादव | ८ वी पास | १/४/८७ | दोन भावामध्ये वादर असल्याने ठोक वेतना वर नेमणुक करण्यात आली नव्हती. परंतु दोन्ही भावामध्ये समझोता झाला आहे. |
| २ | कै. सुरेश गुरसहानी | मुलगा | श्री. कपिल सुरेश गुरसहानी | ९ वी पास | २३/०१/८६ | |
| ३ | कै. पोपट बाबुराव चांदणे | मुलगा | श्री. सुनिल पोपट चांदणे | ९ वी पास | २१/११/८९ | |
| ४ | कै. तुलसीराम रिसवाल, सुरक्षारक्षक | मुलगा | श्री. दिनेश तुळसीदास रिसवाल | ७ वी पास | १०/२/८६ | |
| ५ | कै. करीप्पा कलप्पा पाटील | मुलगा | श्री. रमेश करिप्पा पाटील | ८ वी पास | २५/१०/८८ | |
| ६ | कै. संतोष विश्राम मोरे | पत्नी | श्रीम. लक्ष्मी संतोष मोरे | निरंक | —— | |
| ७ | कै. मंगल वामन सोनवणे | मुलगा | श्री. सचिन मंगल सोनवणे | ७ वी | १३/७/८६ | |
| ८ | कै.काशिनाथ पालवे | मुलगा | श्री. किशोर काशिनाथ पालवे | १२ वी पास | १९/११/८८ | |

ठोक वेतनावर अटी व शर्तीच्या अधिन राहुन नेमणुक करावयाची असल्याने विविध संवर्गातील पदांवर महापालिकेच्या प्रारूप सेवा प्रवेश नियम २००८ सेवा शर्तीच्या नुसार खालीलप्रमाणे उमेदवारांची विविध संवर्गातील पदांवर नेमणुक करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(लिपीक वर्ग – क)

महापालिकेच्या प्रारूप सेवा प्रवेश नियम २००८ सेवा शर्तीच्या नुसार लिपीक पदाची खालीलप्रमाणे अर्हता आहे.

अ) एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण.

ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी)/इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा ब) स्तर पैंकी काणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक.

शासन निर्णय क्र. अनुकंपा. १०९२/१५९७/प्र.क्र. ४४/८, दिनांक १६ ऑक्टोंबर, १९९३ नुसार अनुकंपा तत्वावरिल ''लिपीक–टंकलेखक'' पदावर नियुक्ती करण्याकरिता टंकलेखनाची अट शिथिल करण्यात आली आहे.

खालील उमेदवारांना लिपीक या पदासाठी तात्पुरत्या स्वरूपात करारपध्दतीने नेमणुक करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नाव | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | कै. काशिनाथ एम. पालवे | श्री. किशोर काशीनाथ पालवे | लिपीक | अग्निशमन विभाग |

(मजूर, वर्ग – ड)

महापालिकेच्या प्रारूप सेवा प्रवेश नियम २००८ सेवा शर्तीच्या नुसार मजूर पदाची खालीलप्रमाणे अर्हता आहे.

''इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण''

''शासन निर्णय क्र. अकंपा १०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, मंत्रालय, मुंबई, दिनांक २६ ऑक्टोंबर १९९४ मधील परिशिष्ट ''अ'' मधील परिशिष्ट ४(क) नुसार ''तथापि दिवंगत/आकाली निवृत कर्मचाऱ्याची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पुर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत गट ''ड'' मध्ये नेमणुकीसाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करता येईल.''

वरील शासन निर्णया व मा. महासभा ठराव क्र. ५६, दिनांक २१/११/२०११ नुसार श्रीम.लक्ष्मी संतोष मोरे यांना करारपध्दतीने नेमणुक करण्यासाठी शैक्षणिक अट शिथील करून ठोक वेतनावर महापालिका सेवेत नेमणुक करण्यासाठी प्रस्तावित.

खालील उमेदवारांना मजूर (वर्ग–ड) या पदासाठी तात्पुरत्या स्वरूपात करारपध्दतीने नेमणुक करणेस करण्यात येत आहे

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नाव | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | कै. करीप्पा कलप्पा पाटील | श्री. रमेश करिप्पा पाटील | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| २ | कै. पोपट बाबुराव चांदणे | श्री. सुनिल पोपट चांदणे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३ | कै. संतोष विश्राम मोरे | श्रीम. लक्ष्मी संतोष मोरे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | कै. मंगल वामन सोनवणे | श्री. सचिन मंगल सोनवणे | मजूर | सार्वजनिक बांधकाम विभाग |

(विद्युत मदतनीस, वर्ग – ड)

महापालिकेच्या प्रारूप सेवा प्रवेश नियम२००८ सेवा शर्तीच्या नुसार विद्युत मदतनीस पदाची खालीलप्रमाणे अर्हता आहे
अ) चौथी पास
ब) मजबुत शरीरयष्टी

खालील उमेदवारांना विद्युत मदतनीस (वर्ग – ड) या पदासाठी तात्पुरत्या स्वरूपात करारपध्दतीने नेमणुक करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत.

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नाव | मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसाचे नांव | प्रस्तावित पद | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | कै. राधेश्याम रामदेव यादव | श्री. राजकुमार राधेशाम यादव | विद्युत मदतनीस | सुरक्षा विभाग |
| २ | कै. सुरेश गुरसहानी | श्री. कपिल सुरेश गुरसहानी | विद्युत मदतनीस | विद्युत विभाग |
| ३ | कै. तुलसीराम रिसवाल, | श्री. दिनेश तुळसीदास रिसवाल | विद्युत मदतनीस | सुरक्षा विभाग |

वरील मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसाना विविध संवर्गात उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये करारपध्दतीने (ठोक वेतनावर) तात्पुरत्या स्वरूपात वर्ग–क च्या उमेदवारांना मासिक रू ५७८०/– व वर्ग–ड च्या उमेदवारांना रू ५४६५/– या वेतनावर नेमणुक करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ३०
दिनांक:–१३/७/२०१२

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे मयत झालेल्या कर्मचा–यांच्या वर उल्लेखलेल्या वारसांना वर्ग–३ व वर्ग–४ मध्ये अनुकंपा तत्वाने ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर करारपध्दतीने ६ महिन्यासाठी ठोक वेतनावर नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

**परंतु,**

यापूढे प्रत्येक ६ महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देवून मुदतवाढ देण्याप्रयोजनार्थ आयुक्त प्राधिकृत राहील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

सुचकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे
श्री. प्रधान पाटील

**विषय क्र. ८:–** प्रस्तावाची सूचना

प्लॅस्टीक पिशव्या वापरांवर बंदी करणेबाबत पालिका सदस्य श्री. रमेश चव्हाण व इतर यांचा प्रस्ताव

विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहर हे उदयोगधंदयाचे शहर म्हणून ओळखले जाते. शहरात प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर मोठया प्रमाणावर होत आहे. या पिशव्यांची विल्हेवाट योग्य प्रकारे केली जात नसल्याने नाले भरुन जातात त्यामुळे पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होत नसल्याने शहरात ठिकठिकाणी पाणी साचून राहते. या कारणाने शहरात रोगराई पसरते. यामुळे शहरातील नागरिक त्रस्त झालेले आहेत.

पावसाळयात ही समस्या मोठया प्रमाणावर भेडसावत असते. यावर कडक उपाययोजना करण्यासाठी प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी आणणे आवश्यक आहे. यासाठी कठोर नियम व उपाय योजना करणे गरजेचे आहे. यावर विचारविनिमय करुन नियमावली करणेसाठी ठराव होणे आवश्यक आहे.

सदरचा प्रस्ताव महासभेत मंजुर करणेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र: ३१**
**दिनांक:–१३/७/२०१२**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात प्लॅस्टीक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालत आहे आणि कसुरदारास विरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करण्यास किंवा खटला भरण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**
उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

दिनांक १४/७/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता सुरु केलेली सभा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय अवजड उद्योग मंत्री नामदार श्री. विलासरावजी देशमुख यांच्या निधनामुळे दिनांक २२/८/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र. ३१ क</u>** **<u>दिनांक : १४/८/२०११</u>**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १४/८/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या या सभेचे कामकाज बुधवार दिनांक २२/८/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :—** मागील दिनांक ९/७/२०१२ रोजीच्या विशेष महासभेचे तसेच दिनांक ९/७/२०१२ (त्यात दिनांक १३/७/२०१२) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव : श्री. रामचंद्र पारवानी

**महासभा ठराव क्र. ३१ ड** **दिनांक :२२/८/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक ९/७/२०१२ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ५७ पर्यंतचे तसेच दिनांक ९/७/२०१२ (त्यात दिनांक १३/७/२०१२) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६७ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :—** श्री. अर्जुन मारुति हिवराळे, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर, कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील, नियम ६५ व ६६ अन्वये, नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३०वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. त्यानुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अर्जुन मारूति हिवराळे | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०५/२०१२ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील, कलम ५३ (१) अन्वये, महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे, असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो, त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम, ६५ व ६६ अन्वये, सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी, वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः** ३२ **दिनांकः—२२/८/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

अनुमोदकाचे नाव :— डॉ. महेश गावडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. अर्जुन मारुति हिवराळे, सफाई कामगार यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासून महापालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:–** श्री. मनोहर ऐ. बलराज, शिपाई यांना ह्दय विकाराची शस्त्रक्रिया करण्याकामी वैद्यकीय खर्चापोटी रुपये १,७८,५४९/- प्रतिपुर्ती मान्य करणे.

**प्रस्तावना**

श्री. मनोहर ऐ. बलराज, शिपाई यांना हृदय विकाराची शस्त्रक्रिया करण्यासाठी बुध्राणी हार्ट केअर हॉस्पीटल, पुणे येथे दिनांक २८/६/२०११ ते दिनांक १५/७/२०११ पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये १,९८,३८८/– (एक लाख अठ्ठयानो हजार तिनशे अठ्ठयांशी फक्त) इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी दिनांक १६/९/२०११ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

महासभा ठराव क्र. ९०, दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा–यांना व त्याच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारावर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपुर्तीसाठी महाराष्ट्र हृदय सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया २) मुत्रपिंड रोपण ३) रक्ताचा कर्करोग ४) हृदयावरील शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा–या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र./आरोग्य ३ दिनांक १९ मार्च नुसार शासकिय कर्मचा–यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रुग्णालयातील आंतरुग्ण उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती रुपये १,९८,३८८/– (एक लाख अठ्ठयानौ हजार तिनशे अठ्ठयांशी फक्त) प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम सरसकट अनुदेय ठरते. त्यामुळे श्री. मनोहर ऐ. बलराज यांचा आजार ठाणा सिव्हील यांचेकडील दिनांक ७/६/२०१२ च्या पत्रानुसार अनु. क्र. मध्ये मोडत असून ०४ गंभीर आजारापैकी ह्दयविकाराचा आजार या गंभीर स्वरुपाच्या आजारात मोडत असल्याने यांना झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या रु. १,९८,३८८/– च्या ९० टक्के रु. १,७८,५४९/– इतकी रक्कम एक विशेष बाब म्हणुन शासन निर्णयानुसार अनुज्ञेय देण्यासाठी प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकरण म्हणुन मा. महासभेपुढे सदर प्रस्ताव सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र:** ३३ **दिनांक:–२२/८/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती अंजली साळवे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विशेष बाब म्हणुन श्री. मनोहर ऐ. बलराज, शिपाई यांना ह्दय विकाराची शस्त्रक्रिया करण्याकामी वैद्यकीय खर्चापोटी रुपये १,७८,५४९/- प्रतिपुर्ती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** गायकवाड पाडा, उल्हासनगर-५ येथिल आलेख क्र. ९३, नं.भु.क्र. ३०२४४ या भुखंडाची दोन एकर जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध व वापर करण्याप्रयोजनार्थ मंजुर व प्रारुप विकास आराखडयातील आरक्षणात फेरबदल करणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभाग पत्र क्र. टिपीएस—१२०३/अनि—१८८/प्र.क्र. २६५/नवि—१२ दि. ०९.०२.०४ अन्वये उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील सर्व्हे नं. ५८ पै रहिवास परिमंडळात समाविष्ट असलेली दोन एकर जमिन मुस्लिम समाजासाठी कब्रस्तान असा जमिन बदल करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीसाठी सादर करण्यास उल्हासनगर महानगरपालिकेस निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे म्हारळ येथील सर्व्हे नं. ५८ पैकी रहिवासी परिमंडळात समाविष्ट असलेली २ एकर जमीन (मुस्लिम समाजासाठी) कब्रस्थान असा जमिन वापर बदल एम. आर. टी. पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनाने दि. २५.०७.०६ रोजीच्या अधिसुचनेने सदर मुस्लिम समाजासाठी कब्रस्थान क्षेत्र २ एकर जागा (सर्व्हे नं. ५८पै) असा जमिन वापर करुन मंजूर केला आहे.

''मुस्लिम समाजासाठी कब्रस्थान'' जमीन वापर बदल शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत व दि. २५.०७.०६ रोजीच्या कलम ३७ (२) नुसार पारीत आदेशाप्रमाणे कब्रस्थानाकरीता आरक्षित केलेली शासकीय जमीन, महानगरपालिकेकडे हस्तातंरीत करणेची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, हस्तातंरीत करणेची कार्यवाही पूर्ण करणेपूर्वी महासभेची मंजूरी घेऊन तसा प्रस्ताव शासनास विनाविलंब सादर करणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे मंजूरीकरीता विषयसुचीमध्ये समाविष्ट करणेत आला होता.

त्याअनुषंगाने दि. २९.०३.०७ रोजी महासभेपुढे सदरचा प्रस्ताव मंजूरीकरीता ठेवण्यात आला होता. तथापि, सदर प्रकरणी श्री. नारायण बी. अडवानी व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेल्या याचिकेमध्ये अर्जदाराने उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र. ४७ सम्राट नगर कब्रस्तानसाठी आरक्षित केलेली जागा अतिक्रमीत केलेली दिसते. सदरच्या आरक्षणावरुन अतिक्रमणदारांना हटवुन, रिकामी करुन घेण्यात यावी व सदरची जागा कब्रस्तानसाठी देण्यात यावी. याव्यतिरिक्त सर्व्हे नं. ५८ ही संपादित केलेली जागाही रहिवासी क्षेत्रात असुन त्या जागेचा सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टिकोनातुन सदरचे आरक्षण तेथे ठेवु नये. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाकडून पारीत झालेले आदेशाबाबत महानगरपालिकेचे वकिलाकडून दि. २८.०३.०७ रोजीच्या पत्राने कळविले होते की, उक्त प्रकरणात महाराष्ट्र शासनाकडून न्यायालयात जवाब दाखल झालेला नसल्यामुळे स्थगिती देण्यात आलेली असुन सदरचा विषय महासभेतून वगळण्यात आला.

तथापि, या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. १४०/२००६ श्री. नारायण बी. अडवानी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १३.०९.०७ रोजी वरिष्ठ नगर रचना अधिकारी व पाटबंधारे खात्यातील अधिकारी यांचे सहाय्य घेऊन सहा आठवडयांच्या मुदतीत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने दि. २०.१०.०७ रोजी नगररचनाकार व सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे, उपअभियंता व शाखा अभियंता, पाटबंधारे विभाग, नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका व तहसिलदार, उल्हासनगर यांनी नव्याने दफनभूमीसाठी आरक्षित जागेची पहाणी केली. त्या संदर्भात पूर रेषेच्या अनुषंगाने Prohibitive Zone & Restrictive Zone निश्चित करण्यासाठी पाटबंधारे विभागातून जुलै' २००५ मध्ये अतिवृष्टि झाल्यानंतर उल्हासनदीच्या पूर रेषेबाबत महाराष्ट्र इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टिटयुट, मेरी यांनी सर्वेक्षण करुन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास अहवाल सादर

केला होता. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग यांनी मा. न्यायालयास सादर केलेल्या अहवालानुसार मौजे म्हारळ स.नं.५८ ही जागा Prohibitive Zone मध्ये येत आहे.

या संदर्भात दि. ९.०४.०८ रोजी मा. प्रधान सचिव यांच्या दालनात उपसंचालक, नगररचना कोकण विभाग, कोकण भवन, सहाय्यक संचालक, नगररचना ठाणे, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर कार्यकारी अभियंता, पाठबंधारे विभाग, कळवा ठाणे यांच्या समवेत बैठक झाली. त्या बैठकी दरम्यान असे ठरविण्यात आले की, शासनाने कलम ३७(२) अन्वये दफन भूमीसाठी आरक्षित केलेले क्षेत्र पाटबंधारे विभागाकडील अभिप्रायानुसार पुररेषेने बाधीत होत असल्याचे नियोजनाच्या दृष्टिने दफनभूमी या वापरासाठी योग्य नसल्याचे मा. प्रधान सचिव, नगरविकास यांनी सांगितले.

दफन भूमीसाठी महानगरपालिकेने सर्व संबंधितांच्या संमतीने पुररेषने बाधीत न होणारी व नियोजनाच्या दृष्टिने योग्य अशी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी अशा सुचनादेखील मा. प्रधान सचिव, नगरविकास यांनी सदर बैठकीदरम्यान उल्हासनगर महानगरपालिकेच्या उपस्थित प्रतिनिधींना निर्देश देण्यात आले व उपसंचालक, नगररचना कोकण विभाग, नवी मुंबई यांनी दि. १४.०८.०८ रोजी मा. उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हारळ येथील सर्व्हे नं. ५८, क्षेत्र पुररेषेने बाधीत होत असल्याने प्रधान सचिव यांनी उल्हासनगर महानगरपालिकेला दुसरी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणेबाबत दिलेले निर्देश व त्यानुसार शासनाने दयावयाची मान्यतेबाबत नमुद केले आहे. उल्हासनगर शहरामध्ये कब्रस्थानसाठी जागा मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधीने ठरवावे व जागा ताब्यात घेण्याची कारवाई उल्हासनगर महानगरपालिकेने करावे असे बैठकीत ठरले.

त्या अनुषंगाने पहले सुन्नत मुस्लीम जमात ट्रस्ट व मुस्लिम जमात कब्रस्तान ट्रस्ट या दोन्ही ट्रस्टने वेगवेगळया म्हणजेच (१) मंजूर विकास योजनेत दफनभूमीसाठी आरक्षण क्रमांक ४७, सम्राट अशोक नगर, उल्हासनगर—३ व (२) शिट नं ५१—ए, हिंदु स्मशानभुमीलगत, उल्हासनगर—३ येथील हरीत पट्टयात समाविष्ट जागेची मागणी केली होती.

तद्नंतर दिनांक २५/८/२०१० रोजी उपरोक्त विषयी मा. श्री वसंत डावखरे, उप—सभापती, विधानपरिषद व मा. श्री. भास्कर जाधव, राज्यमंत्री, नगरविकास यांचेसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत उल्हासनगर शहरातील मुस्लिम समाजाकरीता दफनभूमीसाठी पर्यायी जागेसंदर्भात १० दिवसांत प्रस्ताव सादर करणेबाबत बैठकीत निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने उल्हासनगर शहराच्या विकास योजना आराखडयामधील पर्यायी जागेची पहाणी केल्यानंतर जी जागा दफन भूमीसाठी योग्य वाटत होती त्या खालील जागेबदद्ल या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/जीआर/६७ दि. ३/९/१० रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर शहर वसाहत, उल्हासनगर—३ यांना कळविण्यात आले होते.

१) हिंदू स्मशान भुमी, उ.नगर—३ हरित पटट्यालगतची जागा, प्लॉट नं १७२ (भा)
२) गायकवाड पाडा, स्टोन क्योरी येथील हरित पटट्यातील जागा
३) प्लॉट नं २४४ (भा), शिट नं. ९२, उ.नगर—१

मालकी हक्काबाबत या कार्यालयाचे दिनांक ०३/०९/२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली असता त्यांचेकडील दिनांक ०४/०९/२०१० रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता शांतीनगर येथील हिंदू स्मशान भूमी लगत शिट नं. ५१—ए हरित पटटयातील जागा सदर जमातीस देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जागेचे स्थळ निरीक्षण केले असता असे निदर्शनास आले की, सदर जागेतील जाण्यायेण्याचा पोहोच रस्ता एका अतिक्रमणदाराच्या मोकळया जागेतून असून या प्रस्तावित जागेकरीता हिंदू स्मशान भूमीच्या रस्ताचा वापर व त्या जागेला बाधा न येता त्या करीता स्वतंत्र रस्ता तयार करता येणे शक्य आहे. असा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सजा/६९ दि. १७/०९/२०१० रोजीच्या पत्रान्वये मा. श्री. वसंत डावखरे उपसभापती, विधान परिषद व मा. श्री. भास्कर जाधव, राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांना पाठविण्यात आलेला आहे.

मा. श्री. एम. क्यु. जमा, विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचना क्रमांक ४३७ अन्वये निवेदन करण्यात आले होते.

वरील विषयी मा. महासभेत चर्चा व विचारविनिमयाकरीता दिनांक २४/०२/११ रोजी विषयपटलावर सादर करणेत आलेला आहे.

मा. राज्यमंत्री नगरविकास विभाग (नवि—१२) यांचे दालनात दि. १४/०६/११ रोजी आयोजीत बैठकीत मा. उपविभागीय अधिकारी यांनी मा. राज्यमंत्री समोर असे निवेदन केले की, शांतीनगर येथिल हिंन्दु स्मशान भुमीलगत शिट नं. ५१ ए हरीत पट्टयातील जागा सदर जमातीस दिल्यास कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवु शकतो.

उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांनी त्यांचे कडील दिनांक ९/१२/२०१० व दिनांक १०/६/२०११ च्या पत्रान्वये गायकवाड पाडा उल्हासनगर—५ येथिल २ एकर जागा मुस्लिम स्मशानभूमीसाठी उपलब्ध असल्याचे कळविले आहे. सदरील जागा ही महाराष्ट्र शासनाची असून त्याचा सि.स.नं. ३०२४४ हा आहे. सदर जमीन उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास आराखडयानुसार हरित पट्टयात समाविष्ट असून प्रारुप विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट आहे.

वरीलप्रमाणे उपविभागीय अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या जागेबाबत मुस्लिम समाजासाठी कब्रस्तान असा जमीन वापर बदल करण्यास्तव एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करणेस्तव महासभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

दरम्यान याचिका क्र. ९२२४/११ अन्वये मा. उच्च न्यायालय यांनी शासनास ३ महिन्याच्या कालावधीत प्रकरणी ३७(२) अन्वये निर्णय घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

वरीलप्रमाणे शासनास या कार्यालयाचे दिनांक ९/१/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापी, या कार्यालयास दिनांक २१/२/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या शासनाकडील दिनांक ३१/१/२०१२ रोजीच्या अ.शा. पत्रानुसार खालीलप्रमाणे कळविण्यांत आले आहे की,

'' शासन अधिसूचना नगर विकास विभाग दिनांक २५/७/२००६ अन्वये उल्हासनगर मंजुर विकास योजनेमधील स.न. ५८ पैकी रहिवास परिमंडळात समाविष्ट असलेली २ एकर जमिन 'मुस्लिम समाजासाठी कब्रस्तान' असा जमिन वापर बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे कब्रस्तानाकरीता आरक्षित केलेली शासकिय जमिन प्रचलित धोरणानुसार महापालिकेकडे हस्तांतरीत करणे आवश्यक असल्यामुळे तसा प्रस्ताव महापालिकेच्या मान्यतेने शासनास सादर करणेस कळविला आहे.

तथापि, मा. कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ३/३/२०१२ रोजी आदेशामधील खालीलप्रमाणे निदेश निर्गमित करण्यात आले आहे.

१. उल्हासनगर महापालिकेने गायकवाड पाडा, उल्हासनगर—५ येथिल सि.स.नं. ३०२४४ ही जमिन हरीत विभागातून वगळून मुस्लिम समाजासाठी दफनभुमी या करीता आरक्षित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करावी.
२. उल्हासनगर महानगरपालिकेने या निदेशाच्या दिनांकापासुन ९० दिवसांत जनतेकडुन सूचना/हरकती मागविण्यासाठी नोटिस प्रसिध्द करावी.
३. उल्हासनगर महानगरपालिकेने, उक्त अधिनियमांच्या कलम २७(१) नुसार सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन सदरचा फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मंजुरीकरीता सादर करावा.

सदर जागेचा गोषवारा महासभेत सादर करण्यात आलेला आहे. तथापि शासनाने दिनांक ३/३/२०१२ रोजी दिलेले निदेशानुसार ९० दिवसात जनतेकडुन सूचना/हरकती मागविण्यासाठी नोटिस प्रसिध्द करणेबाबत निदेश देतांना एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) नुसार सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करणेची सूचना दिलेली आहे.

**उप—सूचना—१)** सर्व्हे नं. ५८ येथिल जागा कब्रस्तानास देण्याबाबतीत महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/३/२००७ अन्वये निर्णय झाला असल्याने तो शासनातर्फे अंतिम करण्यात यावा.

**उपसूचना—२)** उल्हासनगर—५ येथिल नाका क्र. ९ जवळील प्लॉट नं. ७३५ ते ७४० व प्लॉट नं. ७४७ ते ७५२ वरील एकुण ४.७० एकर क्षेत्राची जागा ही मंजुर विकास आराखडत्यातील साईट क्रमांक ५०, शिट क्र. ७१ अन्वये प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी आरक्षित आहे. व त्या प्रयोजनार्थ तेथिल एक भाग हिंदु स्मशानभुमीसाठी दुसरा भाग ख्रिश्चन धर्मीयांचे स्मशानभुमीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वापरात आहे. उर्वरीत रिकामी जागा कब्रस्तानासाठी विना विलंब वापरता येईल त्यामुळे सदरची जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध करणे योग्य असल्याने शासनातर्फे अंतिम करण्यांत यावे.

महासभेच्या विषय पटलावर सदर विषय समाविष्ट करणेसाठी विनंती.

**महासभा ठराव क्र:** ३४ दिनांक:—२२/८/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे गायकवाड पाडा, उल्हासनगर-५ येथिल आलेख क्र. ९३, नं.भु.क्र. ३०२४४ या भुखंडाची दोन एकर जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध व वापर करण्याप्रयोजनार्थ मंजुर व प्रारुप विकास आराखडयातील आरक्षणात फेरबदल करण्यास मान्यता देत नाही.

कारण--

१. सदर जागेस लागुनच हिंदु धर्माचे श्री. स्वामी शांती प्रकाश मंदिर व धर्मशाळा असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो.
२. वरील कारणामुळे प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या साईट क्र. ५०, शिट क्र. ७१ व सर्व्हे नं. ५८ या दोन्ही जागांचा वापर कब्रस्तानासाठी होण्याप्रयोजनार्थ शासनाचा निर्णय अंतिम राहील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६:–** वाहतुक अभ्यास प्रकल्पासाठी उल्हासनगर शहराच्या प्रचलित विकास आराखडयामध्ये एकत्रित वाहतुकीसाठी सीटीएस कॉरिडोरचा समावेश करण्याप्रयोजनार्थ फेरबदल करणे.

**प्रस्तावना**

मा. प्रधान सचिव, नगर विकास, मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली उमटा Unified Mumbai Metropolitan Transport Authority (UMMTA) कमिटीची स्थापना केली असुन सदर कमिटी मार्फत Comprehensive Transportation Study (CTS) प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

वरिल संदर्भित बैठकीमध्ये मा. प्रदान सचिव यांना सर्व महानगरपालिकेचा त्यांच्या हद्दीत CTS Proposals D P मध्ये incorporate करण्यास कळविले आहे. सदर बाबत सादर करण्यात येते कि, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत CTS Corridors नसून M.M.R.D.A. ने मोनो रेल केलेली आहे व त्याचा मार्ग खालील प्रमाणे आहे, कल्याण मार्गे उमपा क्षेत्रात प्रवेश मार्ग सी–ब्लॉक (निरंकारी हॉला) समोरुन, उल्हासनगर महानगरपालिका, १७ सेक्शन, पवई चौक, श्रीराम चौक, पेन्सिल फॅक्टरी, श्रीराम नगर, कल्याण येथे बाहेर, कल्याण येथे जाणारामार्ग, या जागेत अनाधिकृत बांधकाम असल्याने त्यांचेही विचार करणे आवश्यक वाटते. व रस्त्याची डि.पी. प्रमाणे १००', ६०' व ८०' असल्याने रस्त्याची रुंदीकरण करावे किंवा कसे हयाबाबत महासभेत चर्चेत घेणे आवश्यक वाटते.

वरिल प्रमाणे मार्गस्थ होणारे मोनोरेल शहर विकास आराखडयात प्रस्तावित करणेपूर्वी तद्नंतर एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करणेस्तव शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. वरीलप्रमाणे प्रस्तावास महासभेच्या विषय पटलावर समाविष्ट करण्याबाबत सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ३५** **दिनांक:–२२/८/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वाहतुक अभ्यास प्रकल्पासाठी उल्हासनगर शहराच्या मंजुर व प्रचलित विकास आराखडयामध्ये एकत्रित वाहतुकीसाठी सीटीएस कॉरिडोरचा समावेश करण्याप्रयोजनार्थ शासन मंजुरीच्या अधिन राहून फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २** :—मागील दिनांक १४/८/२०१२ (त्यात दिनांक २२/८/२०१२) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

**महासभा ठराव क्र. ३५ ब** **दिनांक : २०/९/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १४/८/२०१२ (त्यात दिनांक २२/८/२०१२) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ७२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**

**विषय क्र. ३ :–** श्री. एल.एस. चावला, जकात निरिक्षक यांना दिलेल्या स्वेच्छा सेवा निवृत्तीची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

श्री. एल.एस. चावला, जकात निरिक्षक यांनी स्वेच्छानिवृत्ती मिळणेविषयक दिनांक २०/४/२०१२ रोजी अर्ज.दाखल केला आहे.

श्री. एल.एस. चावला, हे उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक १/४/८२ रोजी लिपीक या पदावर नियुक्त झाले आहेत. त्यांची सेवा २० वर्षापेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (कृटुंबनिवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये श्री. एल.एस. चावला यांना त्यांच्या अर्जानुसार दिनांक १९/७/२०१२ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेता येईल. तसेच त्यांचेविरूध्द विभागीय चौकशी /न्यायालयीन प्रकरण असे एकही प्रकरण प्रलंबित किंवा प्रस्तावित नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता श्री. एल.एस. चावला, सद्या कार्यरत जकात विभाग यांना महाराष्ट्र नागरी सेवा (कृटुंबनिवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) व मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये दिनांक १८/७/२०१२ रोजी स्वेच्छानिवृत्ती करण्यात आलेले आहे मा. महासभेच्या माहीतीस्तव सादर.

**महासभा ठराव क्र:** ३६ **दिनांक:–२०/९/२०१२**

सुचकाचे नाव :–श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. एल.एस. चावला, जकात निरिक्षक यांना दिलेल्या स्वेच्छा सेवा निवृत्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:–**''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान''अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात उपलब्ध होणारे पाणी पुरेसे असले तरी शहराची वितरणव्यवस्था जुनी झालेली आहे. व त्यावर मोठया प्रमाणात गळत्या होत असल्याने वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेसाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत शहरात नवीन वितरण व्यवस्था टाकणेचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत सन २०४१ ची प्रकलपित लोकसंख्या १२ लक्ष गृहीत धरून रूपये १२७.६५ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्र शासनामार्फत दिनांक २०/१२/२००८ रोजी मंजुर करण्यात आला असुन, या योजनेस महाराष्ट्र शासनाच्या सुकाणू समितीच्या दि. २७/१२/०८ रोजी झालेल्या बैठकित मंजुरी प्राप्त झालेली आहे. या योजनेनुसार भविष्यातील पाण्याची मागणी खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | २०११ | २०२१ | २०२६ | २०३१ | २०४१ |
|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | ६१०००० | ७७०००० | ८७०००० | ९६०००० | १२००००० |
| पाण्याची मागणी प्रति दिनी द.ल.लि मध्ये | ९७.३० | १२३.०० | १३९.२० | १५३.६२ | १९२.०० |

मंजुर योजनेत खालील कामांचा समावेश करण्यात आलेला होता.

अ) मऔवि महामंडळाच्या विविध जोडण्यापासुन शहरातील उंच जलकुभा पर्यंत लोखंडी जलवाहीन्या टाकणे. : १३.५० किमी.

ब) शहरात विविध ठिकाणी उंच व भुस्तर जलकुंभ बांधणे.(११+१): क्षमता— ३१द.ल.ली.

क) पंपगृह व पंप सामुग्री : २ नंबर.

ड) पंपगृहापासुन विविध उंच जलकुंभा पर्यंत BWSC पाईप उद्धरण वाहीनी टाकणे. :६.१०कि.मी.

इ) शहरात १०० मि.मि. ते ६०० मि.मि. व्यासाच्या डि आय के ७ वितरण व्यवस्था टाकणे. (एकुण १६ भाग) :२७० किमी.

ई) शहरात मिटरींग पध्दतीचा अवलंब करणे व नळ जोडण्या करणे.

या योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| विशेष | भाग | रक्कम कोटीत | मंजुर रक्कम | प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|---|
| केंद्र शासन | ३५ % | ४४.६८ | ४४.६८ | २९.०४ |
| राज्य शासन | १५ % | १९.१४ | १९.१४ | १२.४४ |
| उमपा भाग | ५० % | ६३.८३ | ६३.८३ | ७३.५२ |
| एकुण | १०० % | १२७.६५ | १२७.६५ | ११५.०० |

**निविदा प्रक्रीया :–**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत मंजुर १२७.६५ कोटी रकमेपैकी १२१.१९ रकमेच्या कामाच्या निविदा महानगरपालिकेमार्फत यापुर्वी मागविण्यात आलेल्या आहेत. परंतु निविदा जादा दराने प्राप्त झाल्याने सदर कामाच्या दोन वेळा फेर निविदा मागविण्यात आल्या परंतु या निविदे संदर्भात मा.उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आल्यामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झाला. सदर मा. उच्च न्यायालयामार्फत दि. २४/११/२००९ रोजी आदेश प्राप्त झाल्यावर या कामाच्या निविदा उघडण्यात आल्या व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दि. २१/१२/२००९ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले असुन मे. कोणार्क इंन्फ्राट्रक्चर (वॉटर सप्लाय उल्हासनगर महानगरपालिका, जे/व्ही) यांचे मार्फत काम सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीत योजनेचे ७०टक्के काम पूर्ण झालेले आहे.

## जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियांनांतर्गत चालू असलेल्या पाणी पुरवठा कामाची सदय: स्थिती.

एकुण निविदे प्रमाणे पुरवठा करण्याचे वितरण व्यवस्थेचे पाईप २७० किलो मिटर आज पर्यत पुरवठा करण्यात आलेले एकुण पाईप २४० किलो मिटर त्यापैकी एकुण १८० किलो मिटर जमिनी खाली टाकण्यात आल्या आहे. निविदे प्रमाणे मृदु लोखंडी उदृधरण वाहिनीसाठी लागणारे एकुण पाईप १३.७२ त्यापैकी पुरवठा करण्यात आलेले पाईप एकुण १२ किलो मिटर पैकी ९ किलो मिटर जमिनीखाली टाकण्यात आलेले आहे. एकुण ११ उंच टाक्यापैकी ९ टाक्याचा काम प्रगतीपथावर असून एक बैठी टाकी जवळ जवळ पूर्ण झालेली आहे.निविदा प्रमाणे एकुण जलमापके विविध व्यासाचे ४१३७५ पैकी ३९ हजार जलमापके पुरवठा करण्यात आलेले आहे.

## सुधारीत योजनेची गरज:—

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत पहिंल्यादा रू. १९७ कोटी व नंतर १७७ कोटी ची योजना मंजुरीसाठी पाठविण्यात आलेली होती. तथापी योजनेची तपासणी केली असता शासनाने सदर योजनेतील काही ऊपागे मुख्यत: रस्ते दुरूस्ती व वितरण व्यवस्थेची लांबी मंजुर विकास आराखडा नुसार कमी करण्यात आली त्यामुळे योजना १२७.६५ कोटीची योजना मंजुर केली त्याच बरोबर भुयारी गटारीचे मलवाहिण्याकरीता २७७ कोटी व रस्ते बाधण्यसाठी २५० कोटीची योजना मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या होत्या तथापी सदरच्या दोन्ही योजना मंजुर झालेल्या नाही परिणामी पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू केले असताना उल्हासनगर शहरातील क्रॉकीटचे रस्ते व अस्तित्वातील जुन्या जलवाहिण्या व मलवाहिण्या तोडून वितरण व्यवस्थेची कामे सुरू करावी लागली त्यामुळे मुळ योजनेत रस्ते दुरूस्ती व मलवाहिनीवरील चेंबर्स वारंवार तोडावी लागल्याने शहरात पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण करणे कठीण झालेले आहे. कारण उल्हासनगरचे अंरूद रस्ते व रस्त्यावरील वाहतुकीमुळे शहर वासियाकडून व लोकप्रतिनिधी कडून तक्रारी वाढल्या आहे. व तसेच शहराची एकुण लोकसंख्या ६ लाख पर्यत पोहचली असल्याने व वाढलेली घरे व झोपडपटटया मुळे नळधारकांची संख्याही झपाटयाने वाढली आहे.त्यासाठी नळ जोडण्याची संख्याही जवळपास ६०हजार पर्यत पोहचलेली आहे. वरील सर्व कारणामुळे योजना सुधारीत करणे गरजेचे झाले आहे.

### सुधारीत योजनेची उपांगे खालील प्रमाणे आहेत.

RECAPITULATION SHEET

| S. No. | Name of Sub work | Revised Amount Rs. in Lakhs | Sanctioned Amount Rs. in Lakhs | Difference Rs. in Lakhs (Excess/ Saving) |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing, Lowering, Laying & Jointing 508 mm dia. to 273.10 mm dia. (O. D.) M. S. Pipes Transmission Main from various Tapping points to Pumping Stations and Various ESRs in Ulhasnagar | 1460.54 | 1258.23 | 202.31 |
| 2 | Designing, providing, lowering, laying and jointing 600 mm dia. M. S. casing pipes for 300 mm dia. Carrier pipe by push through method near Ulhasnagar Railway crossing at Ulhasnagar (DELETED AS PER SITE CONDITION) | 0.00 | 82.82 | -82.82 |
| 3 | Providing, Lowering, Laying & Jointing 600 mm dia. to 350 mm dia. B. W. S. C. pipes Rising Main from various Pumping Stations to Various ESRs in Ulhasnagar (M. S. pipe instead of BWSC PIPE) | 384.73 | 347.11 | 37.62 |
| S. No. | Name of Sub work | Revised Amount Rs. in Lakhs | Sanctioned Amount Rs. in Lakhs | Difference Rs. in Lakhs (Excess/ Saving) |
| 4 | Designing & Constructing R. C. C. Pump House at various locations in UMC Area | 29.71 | 32.50 | -2.79 |
| 5 | Designing & constructing R. C. C. G. S. R. and Sump of various capacities at various locations in UMC Area, Ulhasnagar | 303.95 | 241.97 | 61.98 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Designing & constructing R. C. C. E. S. R. of various capacities at various locations in UMC Area (NORTH ZONE), Ulhasnagar | 945.04 | 663.50 | 281.54 |
| 7 | Designing & constructing R. C. C. E. S. R. of various capacities at various locations in UMC Area (SOUTH ZONE), Ulhasnagar | 922.98 | 626.10 | 296.88 |
| 8 | Providing , Lowering, Laying & Jointing D. I. K - 7 Distribution System in UMC Area in NORTH ZONE | 6268.58 | 3377.13 | 2891.45 |
| 9 | Providing , Lowering, Laying & Jointing D. I. K - 7 Distribution System in UMC Area in SOUTH ZONE | 4196.28 | 2733.21 | 1463.07 |
| 10 | Providing & Making House Connections in UMC Area | 1424.36 | 856.54 | 567.82 |
| 11 | Providing & erecting Domestic Water Meter and Bulk Flow Meter ( Electronic/ Ultrasonic Flow) in UMC Area | 2960.13 | 1586.82 | 1373.31 |
| 12 | Shifting Utility Services coming in the alignment of pipeline in Ulhasnagar Municipal Corporation Area | 51.35 | 183.10 | -131.75 |
| 13 (A) | Supplying, erecting, commissioning with test & trial of pumping machinery & all allied electrical, mechanical equipments at Durgapada for Ulhasnagar | 107.22 | 81.20 | 26.02 |
| 13 (B) | Supplying, erecting, commissioning with test & trial of pumping machinery & all allied electrical, mechanical equipments at Ramabai Tekdi for Ulhasnagar | 65.72 | 49.77 | 15.95 |
| | Sub Total as per Tender | 19120.59 | 12120.00 | 7000.59 |
| | Add 32.04 % Above as per Accepted Tender | 0.00 | 3891.97 | -3891.97 |
| | Nett Total | 19120.59 | 16011.97 | 3108.62 |
| 14 | Amount for Escalation (Price Variation) | 2531.89 | 0.00 | 2531.89 |
| S. No. | Name of Sub work | Revised Amount Rs. in Lakhs | Sanctioned Amount Rs. in Lakhs | Difference Rs. in Lakhs (Excess/ Saving) |
| 15 | Design, Construction RCC ESR @ Vitthalwadi, Repairs and Renovation of existing ESRs | 358.86 | 213.45 | 145.41 |
| 16 | Extra Item Rate List | | | |
| A | 660 mm dia. M. S. pipe instead of BWSC PIPE | 17.53 | 0.00 | 17.53 |
| B | Reinstating the excavated trenches for pipelines by Concrete/Bituminous/ Paver Blocks Road Surface | 2774.19 | 0.00 | 2774.19 |
| C | Reconnection of the service connection & pipe lines damaged during laying of pipe line of Distribution system | 240.46 | 0.00 | 240.46 |
| D | Providing & constructing B. B. Masonry Valve Chambers | 84.63 | 0.00 | 84.63 |
| E | Dismantling existing structures & disposal of the material for construction of E. S. Rs at various Locations in UMC Area | 13.47 | 0.00 | 13.47 |
| F | Road Permission & Electric Connection Deposits | 38.00 | 0.00 | 38.00 |
| | Total Rs. | 25179.62 | 16225.42 | 8954.20 |
| 17 | Providing PMC services @ 3% (Nett Bill + E. I. R. L.) | 545.66 | 363.60 | 183.06 |
| | | 25726.28 | 16589.02 | 9137.26 |
| 18 | Add 3 % Contingencies | 647.71 | 370.00 | 277.70 |
| 19 | Add 0.50 % Admin. Charges | 125.95 | 61.67 | 64.28 |
| | Total Rs. | 26499.94 | 17020.70 | 9479.24 |
| | SAY Rs. | 26500.00 | 17000.00 | 9500.00 |

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेसाठी सन २००७ मध्ये रु. १९७.०० कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनाच्या सुकाणू समितीमार्फत केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला होता. त्यांनी काही बाबी वगळून रु. १२७.६५ कोटीच्या रक्कमेस सन २००८ मध्ये मंजूरी प्रदान केली होती. त्यानुसार महापालिकेने सदरची योजना राबविण्यासाठी जाहीर निविदा प्रसिध्द् करुन किफायतशीर निविदा सादर केलेल्या निविदाकारास स्थायी समितीच्या मंजुरीने ३२.०४ टक्के वाढीव दराने मंजूरी दिली होती. त्यानुसार मे. कोणार्क इंन्फ्राट्रक्चर (वॉटर सप्लाय उल्हासनगर महानगरपालिका, जे/व्ही) यांच्याशी करारनामा करुन कार्यादेश देण्यात आला होता. करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे दर मूल्यवृध्दी वाढ (Price Variation Index) नुसार ठेकेदारास मूल्यवृध्दी देय आहे.

वरील बाबी विचारात घेता वाढीव दर व देय वृध्दी लक्षात घेता योजनेवरील अंतिम खर्च रु. १९०.०० कोटी एवढा होत आहे. मंजूर बाबींवर वाढीव खर्च साधारणत:

रु. २०.०० कोटी होणार आहे अशाप्रकारे एकूण खर्च रु. २१०.०० कोटी अपेक्षित आहे.

सदरची योजना डिसेंबर २०१२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तथापी

मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचेकडे दिनांक ०९/०८/२०१२ रोजी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत सदरची योजना मार्च – २०१३ अखेर पूर्ण करणेबाबत मा.प्रधान सचिवांनी निदर्शनास आणून दिले आहे. मुदतवाढीचा प्रस्ताव नियमानुसार स्थायी समितीकडे सादर करण्यात येत आहे. सदर मुळ योजनेवर आतापर्यंत रु. १२३.५० कोटी एवढा खर्च झालेला असून महापालिकेच्या हिश्यापोटी अंदाजे रु. ६४.०० कोटी ठेकेदारास अदा केलेले आहेत. पुढील खर्चासाठी चालु वर्षाच्या अंदाजपत्रकात रु. १०६.०० कोटींची तरतुद केलेली आहे.

मुळ योजनेची किंमत रू. १२७.६५ कोटी असून सुधारीत अंदाजपत्रकांची किंमत रू. २६५ कोटी इतकी आसुन स्विकृत निविदेची किंमत १६०.१५ कोटी इतकी आहे.

सदर योजनेवर आतापर्यत एकुण रू. १२३.५० कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २०१२– १३ च्या अर्थ संकल्पा मध्ये रू. १०६.०० कोटी इतकी तरतुद असून त्यापैकी आता पर्यत रू. ३४.०० कोटी खर्च झालेला असून शिल्लक तरतुद रू. ७२.०० कोटी इतकी आहे.

सुधारीत योजनेची सर्व कामे पूर्ण करण्याकरीता अंदाजे एकुण रक्कम रू. २६५.०० कोटी आवश्यक असून त्यापैकी योजनेवर आजतागायत झालेला खर्च (रू. १२३.५० कोटी) वजा जाता रू. १४१.५० कोटीची गरज असून त्यापैकी सन २०१२–१३ मध्ये

रू. ७२.०० कोटीची तरतूद उपलब्ध असून उर्वरीत रू. ६९.५० कोटीची तरतूद सन २०१३–१४ च्या अर्थ संकल्पामध्ये करणे प्रस्तावित आहे.

सुधारीत योजनेसाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल, आराखडे व नकाशे तयार करून घेण्याचे काम सध्या कार्यरत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. टंडन ॲड असोसिएट्स यांचे कडून करून घेण्यात येत आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारासाठी आवश्यक फी रक्कमेची सुधारीत योजनेत तरतुद करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. टंडन ॲड असोसिएट्स यांचेकडून याबाबत अहवाल घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होणार नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणुन दिले आहे. तसेच त्यांनी वाढीव रकमेची तरतुद महापालिका निधीतुन करण्याचेही सुचित केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत सुधारीत उल्हासनगर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था कामाचे सुधारीत अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास मा. महासभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी घेणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ३७ <u>दिनांक:–२०/९/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नर्निर्माण अभियान''अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था प्रकल्पाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता तो थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:–** उल्हासनगर शहरामधील खेमाणी नाला परिसरासाठी भुयारी गटार योजनेच्या रु. ४६.६० कोटीचे अंदाजपत्रक व आराखडयास व मे. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरींग कन्सलंन्टटस् प्रा.लि.पुणे यांची सल्लागार म्हणुन नियुक्तीस व सल्लागार फी रु. २५.८० लक्ष या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील खेमाणी परिसरातील सांडपाण्याचा प्रवाह नाल्याद्वारे उल्हास नदीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या शहाड पंपिंग स्टेशन जवळ मिळते. सदर नाल्यामुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्यामार्फत खेमानी नाल्याचा प्रवाह अडवून सदर मलप्रवाह स्क्रीन व ग्रीट चेंबर मधून ८०० मि.मि.व्यासाच्या लोखंडी पाईपद्वारे नदीच्या पात्रातून (पाण्याखालून) मोहने पिकअप विअरच्याखाली सोडणे प्रस्तावित केले होते. परंतू या प्रस्तावास प्रदुषण नियंत्रण मंडळाने आक्षेप घेतल्यामुळें प्रकल्प पुर्णत्वास गेला नाही. याचप्रमाणे लघुपाटबंधारे खात्याने सुध्दा नाला अडवून १२०० मि.मि.व्यासाच्या आर.सी.सी.गुरूत्व वाहिनीद्वारे मोहने पिकअप विअर पुढे सोडणेचा प्रस्ताव सादर केला होता. परंतू या प्रस्तावास सुध्दा प्रदुषण नियंत्रण मंडळाने ना हरकत दाखला दिला नाही. यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात आला. प्रकल्पाची किंमत रू ४.०० कोटी होती .

उल्हासनगर महानरगपालिकेची आर्थिक अडचण असल्याने संपूर्ण प्रकल्प खर्च महापालिका उचलू शकली नाही. दि. १८.०६.०२ रोजी मा. सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या दालनात झालेल्या बैठकीत सुध्दा ही योजना महापालिका संपूर्णत: स्वखर्चाने पालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता हाती घेऊ शकत नसल्याने उल्हास नदीतून शहाड येथून पाणी उचलणा–या इतर यंत्रणा व कारखाने यांनी रू ४.०० कोटी अंदाजित खर्चापैकी योग्य वाटा उचलावा असे सुचविणेत आले व याकामी प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुढाकार घेऊन सर्व संबंधीतांची बैठक घेऊन कार्यवाही करण्याचे सुचविणेत आले होते. परंतू प्रदुषण नियंत्रण मंडळाने या कामी असमर्थता दर्शविली तसेच संबंधीत यंत्रणांनी सुध्दा प्रतिसाद न दिल्यामुळे निधी उभारता आला नाही.

यामुळे या प्रस्तावास केंद्र शासनाकडून अनुदान मिळणेसाठी केंद्रशासनाच्या राष्ट्रीय नदी कृती आराखडयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सादर करण्याचे सुचीत करण्यात आले. परंतू केंद्र शासनाच्या वरील योजनेच्या निकषानुसार प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी वापरणे बंधनकारक असल्याने त्यास अर्थसहाय्य मिळू शकले नाही. महानगरपालिकेमार्फत, नदीतील प्रदुषण टाळण्याच्या दृष्टिने, नाल्यातील पाणी वळविण्याचे काम केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी विकास आराखडयात प्रस्तावीत करण्यात आले. या प्रस्तावात नाल्यातील पाणी नाल्याच्या पात्रात विअर बांधुन अडवीणे, संप व पंप हाऊस बांधणे, पंप सामुग्री व अंबीका नगर नाल्या पर्यत उध्दरण वाहिनी टाकणेच्या कामाचा समावेश करण्यात आला होता. याची अंदाजित किमंत रु. २.३० कोटी इतकी होती. महानगरपालिकेमार्फत या कामाचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दि. ०५/०७/२००७ रोजी सादर करण्यात आला. या कामाच्या निविदाही महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आल्या परंतु तीन वेळा फेर निविदा मागवुन सुध्दा या निविदाना एक ही निविदा धारकाकडुन प्रतिसाद मिळाला नाही.

या संदर्भात मा. मंत्री, महोदय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे दालनात दि. १६/०१/२००८ रोजीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली होती. त्याच प्रमाणे दि. ०५/०२/२००८ रोजी मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे सोबतच्या आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली, सदर बैठकीत खेमाणी नाला वळविणेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत विनंती करण्यात आली असता मा. सचिव यांनी काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्याबाबत सुचना दिल्या.

त्या अनुषगांने महाराष्ट्र जीवन प्रधिकरण मार्फत खेमाणी नाल्याचा दुषीत प्रवाह वळविणे बाबतचा रू ३,७८,५४,३००/– इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला

होता व सदरचे काम पूर्ण ठेव तत्वावर करण्याचे प्रस्तावित होते. उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने सदरचे काम हाती घेता आले नाही. या कामा करीता मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन रू ३,७८,५४,३००/— रक्कमेचा निधी कर्ज स्वरूपात प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी घेण्यात आली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळामार्फत खेमाणी नाल्याचा दुषित पाण्याचा प्रवाह वळविणेबाबतचा अंतिम प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प विभाग पत्र क्रमांक ५०३८ दि. १५/१०/२००८ रोजी महानगरपालिकेस सादर करण्यात आला.सदर कामासाठी लागणारी रक्कम रू. ३.७८ कोटी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन ऋण मिळणे यासाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेकडुन पत्र क्रं उमपा/पा.पु/२९९४ दिनांक २१/११/२००८ अन्वये सादर करण्यात आला.

सदरचा प्रकल्प अहवालात खेमाणी नाल्याच्या प्रवाह गोळा करणे व पंपीग करून अबिका नाल्यामध्ये व तेथून वालधुनी नदीमध्ये सोडणे प्रस्तावित केलेले होते. मा.सचिव नगर विकास विभाग यांनी दिनांक २३/०८/२०१० च्या बैठकी दरम्यान सदर प्रस्ताव विचार न घेता खेमाणी नाल्यात येणारा सर्व क्षेत्रातील मल जमा करून व त्यावर प्रक्रीया करून खाडीत सोडण्या करीता खेमाणी नाला परिसर भुयरी गटार योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याचे सुचविले होते.

त्या अंनुषगाने सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल करण्या करीता उल्हासनगर शहरासाठी जे.एन.एन.यु.आर.एम योजने अंतर्गत भुयारी गटार योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्यासाठी नेमलेल्या में.मोनार्च कन्सलन्टट पुणे यांना खेमाणी नाला व परिसरासाठी भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तोंडी सुचना देण्यात आल्या. त्या अंनुषंगाने उल्हासनगर भुयारी गटार योजनेचा भाग म्हणून खेमाणी नाल्याचे फक्कड मंडली चौक ते मुरबाड रोड पर्यत तसेच मुरबाड रस्त्यावरील कलव्हर्ट ते सेन्चुरी कॉलनी पर्यत येणा—या रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या क्षेत्रातील म्हणजेच कमला नेहरू नगर, महादेव उदयोग नगरी, साईनाथ उदयोग नगरी तसेच धोबीघाट रोड टेकडी या क्षेत्रातील खेमाणी नाल्यात मिसळणारे मल एकत्रित मलवाहिनीव्दारे साठवण टाकीत जमा करणे तेथून झोन क्रमाक २ च्या उंच भागापर्यात (३०० मीटर) पंपीग करणे तेथून गुरूत्ववाहिनी व्दारे शांतीनगर येथील पंपीग स्टेशन पर्यत आणणे व त्यानंतर खडेगोलवली (चिंचपाडा) येथील मलशुध्दीकरण केद्रांमध्ये प्रक्रिया करून खाडीत सोडणे प्रस्तावित आहे.

वरील प्रमाणे उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला व परिसरासाठी मलनि:सारण योजनेचा रू.४६.६० कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर प्रस्ताव ''महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान'' अंतर्गत मा. आयुक्त सो यांचे पत्र क्रमाक उमपा/पापु/काअ/४३३१ दिनांक ०१/१२/२०१० रोजी संचालक तथा आयुक्त नगरपालिका प्रशासन यांना सादर केलेले आहे. सदर प्रस्तावास महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय कल्याण यांनी पत्र क्रमाक मप्रनि/प्राकाक/११०१११ एफ टी ०१५० दिनांक ११/०१/२०११ रोजीच्या पत्रान्वये सहमती दर्शविली आहे.तसेच या कामाच्या संदर्भात मा.आयुक्त तथा संचालाक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना दिनांक २२/०३/२०११ व दिनांक १९/०५/२०११ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत खेमाणी नाला भुयारी मल निसारण योजनेस प्राधान्याने मंजुरी मिळावी म्हणून पुनश्च विनंती केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेचे तांत्रिक मुल्यांकन करणेबाबत मुख्य अभियंता (पुणे विभाग) यांना पाठविण्यात आले व त्यांचे तपासणी शुल्क रु. ११,६५,०००/— एवढी रक्कम दिनांक ०३/११/२०११ रोजी भरलेली आहे. मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्रधिकरण यांनी सदर अंदाजपत्रकांवर उपस्थित मुद्द्यांची पूर्तता करून फेरसादर करण्यास कळविले आहे त्यानुसार अंदाजपत्रक Sewer Gem या Software मध्ये डिजाईन करून नविन दरसुची प्रमाणे तयार करण्यास कळविले आहे. सदर तांत्रिक मुददयाची पुर्तता करून फेर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी में.मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरीग कन्सलंन्टटसृ प्रा. लि. पुणे यांना कळविण्यात आले आहे. तथापी सदर कंपनीचे संचालक श्री. अंतुल डवले यांनी दिनांक २५/०७/२०१२ रोजीच्या मा. महापौर महोदया सोबत झालेल्या बैठकीत, या कामासाठी कन्सलटन्सी फी अदा केली नसल्याने पुढील काम करण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

खेमाणी नाला परिसरासाठी भुयारी गटार योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तातडीने में. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरीग कन्सलंन्टटसृ प्रा. लि. पुणे. यांचेकडून तयार करून

घेण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावाची किंमत रू. ४६.६० कोटी इतकी आहे. यास मा. महासभेची प्रशासकीय व वित्तिय मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदरील अंदाजपत्रक व आराखंडे तातडीने तयार करणे गरजेचे असल्याने व जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियांना अतर्गत भुयारी गटार योजनेचे अंदाजपत्रक आराखडे बनविण्याचे काम में. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरीग कन्सलंन्टटसृ प्रा. लि. पुणे. यांना दिलेले असल्याने त्यांचेकडून खेमाणी नाल्याच्या भुयारी गटार योजनेचे अंदाजपत्रक व आराखडेही तयार करून घेण्यात आले आहेत. परंतु त्यानां या कामासाठीची कन्सल्टंन्सी फि अदयाप अदा करण्यात आलेली नाही.

में. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरीग कन्सलंन्टटसृ प्रा. लि. पुणे. यांनी त्यांचे पत्र कंमाक मोनार्च/२०१२/युएमसी/ल १० दिनांक २६/०७/२०१२ अन्वये १.५० टक्के दराने कन्सल्टंन्सी फि ची मागणी केलेली आहे. तथापी या बाबतीत खालील प्रमाणे तुलनात्मक विश्लेषण सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ठेकेदाराने मागणी केलेले यु आय डी एस एस एम टी यांच्या नियमाप्रमाणे १.५ टक्के रक्कम | रू. ६९.९० लक्ष |
| २. | म.जी.प्राच्या परिपत्रक कं.१२६ दिनांक ०३/०४/२००८ नुसार कन्सलटन्सी फीची अनुज्ञेय रक्कम | रू. २५.८० लक्ष |
| ३. | जे.एन.एन.यु.आर.एम योजने आतर्गत मलनिसा:रण प्रकल्पासाठी मंजुर प्रकल्प फीच्या रक्कमेच्या प्रमाणात येणारी रक्कम. | रू. २७.७२ लक्ष |

वरील तुलनात्मक विश्लेषणावरून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या परिपत्रकानुसार येणारी रक्कम रू. २५. ८० लक्ष (सेवा शुल्क व्यतिरिक्त) ही सर्वात कमी असल्याने सदर रक्कम तांत्रिक सल्लागार फी म्हणून मंजुर करणे उचित वाटते.याप्रमाणे सदर कन्सलटन्सी फी च्या रक्कमेस मा. महासभेची प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला परिसरासाठी भुयारी गटार योजनेच्या रू. ४६.६० कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे तसेच या कामासाठी में. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरीग कन्सलंन्टटसृ प्रा. लि. पुणे. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती व त्यांची सल्लागार फी रू. २५. ८० लक्ष (सेवा शुल्क व्यतिरिक्त) एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः** ३८ **दिनांकः—२०/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरामधील खेमाणी नाला परिसरासाठी भुयारी गटार योजनेच्या रु. ४६.६० कोटीचे अंदाजपत्रक व आराखडयास व मे. मोनार्च सर्व्हेअरर्स ॲन्ड इंजिनिअरींग कन्सलंन्टटस् प्रा.लि.पुणे यांची सल्लागार म्हणुन नियुक्तीस व सल्लागार फी रु. २५.८० लक्ष या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता तो थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियंत्रीत करण्यासाठी पोलिस दलासह स्वतंत्र पोलिस स्थानक व विशेष न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्ण क्र.कंडोमपा/प्र.क्र. १९२/०६/नवि–२८ दि. २/३/०९ अन्वये महापालिका क्षेत्रात होणारी अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे नियंत्रण व निर्मुलनासाठी करावयाची जबाबदारी व कार्यपध्दती निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी स्वतंत्र पोलिस दल व पोलिस स्थानक उभारणेसाठी ठराव करून प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत शासन निर्णयात नमुद केले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनांशी निगडीत असलेल्या विविध बाबींसंदर्भात कामकाज शासनाकडून पारित करण्यात आलेले विविध कायदे, शासन निर्णय, आदेश, परिपत्रके यांच्या आधारे करण्यात येते. सदर कामकाज करीत असतांना अनेकदा सामाजिक तत्वांकडून नियमबाहय वर्तणूक करण्यात येऊन कामकाजास अडथळा निर्माण केला जातो. अशा वेळी खाली नमुद केलेल्या विविध कायद्यान्वये पोलिस स्थानकात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ अन्वये विना परवानगी बांधकाम करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५७(१) अन्वये नियमबाहय बांधकाम करीत असलेल्या व्यक्तिस सदरचे बांधकाम थांबविणेचे आदेश दिले जातात व कलम २५७(२) अन्वये समक्ष अधिकाऱ्यामार्फत सदरचे बांधकाम होणार नाही याबाबत सर्वतोपरी उपाययोजना करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत पोलिस अधिकाऱ्यास पाठविण्यात येऊन सदरचे कामकाज होणार नाही याबाबतची कार्यवाही संबंधीत पोलिस स्थानकाच्या मदतीने करणे अभिप्रेत असते. त्याकरीता खालील नमुद कायद्यांतर्गत कारवाई केली जाऊ शकते.

अ) क्रिमीनल प्रोसिजर कोड १९७३ चे कलम १०७, १०९, ११० अन्वये कारवाई प्रस्तावित करणे.

ब) महाराष्ट्र झोपडपटटी दादा, हातभटटीवाले, औषधी द्रव्य विषयी गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांचे विघातक कृत्यांना आळा घालणेबाबत अधिनियम १९८१ अन्वये विना परवाना झोपडया बांधणे, त्या विकणे असे कृत्य करणाऱ्या व्यक्तिंविरूध्द जिल्हाधिकारी / पोलिस आयुक्त यांचेपढे सादर करण्यात येणाऱ्या प्रकरणांबाबत निर्णय घेतला जातो. याबाबत स्थानिक पोलिस स्थानकात विविध गुन्हयातील प्रस्ताव जिल्हाधिकारी / पोलीस आयुक्त यांचेकडे सादर केल्यानंतर त्यावर योग्य ते निर्णय घेऊन संबंधितांस न्यायालयीन कोठडीत टाकणेचे कारवाई सदर अधिनियमान्वये करण्यात येते.

क) हॅबिच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट, १९६८.
ड) इंडियन पिनल कोड
इ) बॉम्बे पोलिस ॲक्ट

(३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६(अ) अन्वये एखाद्या जागेचा वापर अथवा कोणतेही कृत्य सार्वजनिक आरोग्यास बाधा उत्पन्न करीत असल्याचे दिसून आल्यास सदर प्रकाराबाबत गुन्हा आरोग्य विभाग, परवाना विभाग इ. विभागाकडून दैनंदिन कामकाज पार पाडीत असतांना दाखल करण्यात येतो.

(४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३५ अन्वये विना परवाना शहरात गुरेढोरे यांची आयात करणाऱ्याविरूध्द उल्हासनगर महानगरपालिकेकडून वेळोवेळी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९८ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आयात करण्यात आलेल्या मालावरील जकात चुकविणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(६) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) अधिनियम २००३ अन्वये विना परवानगी लावण्यात येणाऱ्या आकाश चिन्हे, जाहिराती व फलक लावणाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(७) महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादन व वापर नियम २००६ अन्वये विहीत घनतेच्या व्यतिरिक्त प्लास्टीक पिशव्यांचा वापर करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(८) महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध करणेकरीता अधिनियम १९९५ अन्वये मालमत्तेचे विरूपण करणाऱ्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(९) सार्वजनिक संपत्तीची हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये सार्वजनिक संपत्तीस हानी पोहचविणाऱ्यांविरूध्द संबंधीत पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात येतो.

उपरोक्त कायद्यान्वये उल्हासनगर महानगरपालिककडून सदरच्या कायद्यांचा भंग करणाऱ्याविरूध्द विविध पोलिस स्थानकांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल केले जातात. तथापि, संबंधीत पोलिस स्थानकांना त्यांचेकडे असलेल्या कार्यबाहुल्यामुळे सदरचे गुन्हे दाखल करून घेतल्यानंतर त्यांचा तपास करून संबंधिताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करून त्यांचा पाठपुरावा करणे अत्यंत जिकीरीचे होते व न्यायालयीन प्रकरणामध्येही शिक्षेचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी विशेष दक्षता घेण्यात येऊन झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेकरिता विशेष मोहिम होती घेण्यात आलेली आहे. सदर मोहिमेअंतर्गत माहे **एप्रिल, ०८ ते मार्च, ०९** अखेर एकूण **५१७** अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येऊन **२८९** व्यक्तिंविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांमध्येही शिक्षेचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसुन येते. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५७(२) अन्वये सदर अधिकृत बांधकाम सुरू राहणार नाही याबाबत सर्वतोपरी उपाययोजना करणेचे अधिकारी प्रभाग अधिकाऱ्यांस प्रदान करण्यात आलेले आहेत. याचा वापर करून संबंधीत पोलिस स्थानकांकडून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या व्यक्तिना सदर परिसरात वावरण्यास मनाई करून त्यांच्या विरूध्द इतर कायद्यांद्वारे कारवाई प्रस्तावित करणे. इ. प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाऊ शकते. तथापि, पोलिस स्थानकांकडे असलेल्या कार्यबाहुल्यामुळे सदरचे कामकाज त्यांचेकडून करून घेणे महानगरपालिकेस अत्यंत जिकिरीचे होत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे वर उल्लेख केलेल्या विविध कायद्यान्वये संबंधीतांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येत असतात. सदर सर्व गुन्हयांचा, गुन्हे दाखल करणे, त्यांचा तपास करणे, प्रकरणी न्यायालयात दोषारोप दाखल करणे इत्यादी बाबींकरीता स्वतंत्र पोलिस स्थानक निर्माण केल्यास वर नमुद केलेले गुन्हे सिध्द करणेस मदत होईल. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या संभावणाऱ्या गुन्हयांनाही आळा घालणे सोयीचे होईल.

शासन निर्णयानुसार स्वतंत्र पोलिस ठाणे निर्माण करणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी मा. महासभेचा ठराव प्राप्त करून घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेचा आहे. पोलीस कर्मचारी वर्ग कायमस्वरूपी महापालिकेकडे उपलब्ध करून घेणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी विविध उपाय योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेली सुचना नागरी पोलीस विशेष पोलीस ठाणे (विवरण अ, ब) मध्ये दर्शविलेला संभाव्य आकृतीबंध विचारात घेण्याबाबत या बाबत चा संभाव्य आकृतीबंध (विवरण अ, ब) सोबत जोडण्यात येत आहे.

## नागरी पोलीस यंत्रणा

संदर्भिय शासन निर्णयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे इत्यादी गुन्हयांसाठी महापालिकेच्या स्तरावर **''नागरी पोलीस यंत्रणा''** उभारण्याकरिता नागरी पोलीसांची आवश्यक पदे महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करुन अशा नागरी पोलीसांचा पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी महासभेत ठराव पारीत करुन तेवढे पोलीस कर्मचाऱ्यांची पदे शासनास कळविल्यानंतर शासनाकडील गृह विभागांतर्गत

निर्माण करण्यात येतील व त्यावर पोलीसांच्या नियुक्त्या करुन नियमित पोलीसांना प्रतिनियुक्तीवर **''नागरी पोलीस''** म्हणून नियुक्त करण्यात येईल.

सदर नागरी पोलीसांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २१च्या तरतुदीनुसार सुध्दा प्राधिकृत करण्यात येईल. जेणेकरुन ते महानगरपालिका कायद्याखाली किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ खालील गुन्हयांची दखल घेऊन त्या संदर्भात कार्यवाही करताना नियमित पोलीसांसारखे कर्तव्यही बजावू शकतील.

**परिशिष्ट अ**

**अतिक्रमण निर्मुलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इ. साठी महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलीस यंत्रणेसाठी आकृतीबंध**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | महानगरपालिका ड |
|---|---|---|---|
| १ | सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधिक्षक | १५६६०—३९१०० | १ |
| २ | पोलीस निरिक्षक | ९३००—३४८०० | १ |
| ३ | पोलीस उपनिरिक्षक | ९३००—३४८०० | ४ |
| ४ | पोलीस हवालदार | ५२००—२०२०० | ४ |
| ५ | सशस्त्र पोलीस शिपाई | ५२००—२०२०० | २४ |
| ६ | महिला पोलीस शिपाई | ५२००—२०२०० | १६ |
| ७ | पोलीस नाईक/ वाहन चालक | ५२००—२०२०० | ३ |
| | एकूण पदे | | **५३** |

परिशिष्ट ब

**पोलीस स्टेशन — नमुना—२ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | महानगरपालिका ड |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस निरिक्षक | ९३००—३४८०० | १ |
| २ | पोलीस उप निरिक्षक | ९३००—३४८०० | १ |
| ३ | सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक | ५२००—२०२०० | १ |
| ४ | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ५२००—२०२०० | ४ |
| ५ | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ५२००—२०२०० | ८ |
| ६ | कनिष्ठ लिपीक | ५२००—२०२०० | १ |
| ७ | वाहन चालक | ५२००—२०२०० | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **एकूण** | **१७** |

**नागरी गुन्हयांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा**

नागरी गुन्हयांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणी न्यायदानाची कार्यवाही त्वरित व्हावी यासाठी महापालिकेच्या क्षेत्रात विशेष न्यायालय स्थापन करण्याविषयी संबधित महानगरपालिका यांचेकडून यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यानंतर विधी व न्याय विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाच्या मंजूरीने महानगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ खालील गुन्हयांकरिता संबधित महानगरपालिकेच्या क्षेत्रात स्वतंत्र विशेष न्यायालय निर्माण करण्यात येईल. अशा विशेष न्यायालयासाठी येणाऱ्या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखा शिर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहील. यासाठी महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. महापालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगरविकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल व मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही विधी विभागाकडून करण्यात येईल. विशेष न्यायालय स्थापन करण्यासाठी प्रस्ताव करताना विवरण **''क''** मध्ये खालील प्रमाणे दर्शविलेल्यानुसार संभाव्य आकृतीबंध विचारात घ्यावयाचे आहेत.

**परिशिष्ट क**

**न्यायालये — नमुना—२ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १ | १५६००—३९१०० |
| २ | सहाय्यक अधिक्षक | १ | ९३००—३४८०० |
| ३ | लघुलेखक (नि. श्रे) | १ | ९३००—३४८०० |
| ४ | वरिष्ठ लिपीक | १ | ५२००—२०२०० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | २ | ५२००—२०२०० |
| ६ | बेलिफ | १ | ५२००—२०२०० |
| ७ | शिपाई | २ | ४४४०—७४४० |
| | एकूण | ९ | |

वरीलप्रमाणे विशेष पोलीस स्टेशन, नागरी पोलीस व विशेष न्यायालये अशी सर्व यंत्रणा निर्माण करणेकामी मान्यता मिळणेसाठी महासभा पटलावर प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: ३९** **दिनांक:—२०/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. रामचंद्र पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियंत्रीत करण्यासाठी पोलिस दलासह स्वतंत्र पोलिस स्थानक व विशेष न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देत नाही.

**कारण**

दिनांक १/१/२००५ पूर्वी असलेली अनाधिकृत बांधकामे नियमाधीन कायदयाखाली नियमित करण्याची संधी रहिवाश्यांना उपलब्ध आहे त्यामुळे न्यायिक प्रकरणांची संख्या मोठया प्रमाणावर दिसून येत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ७:–** मुंबई महानगर क्षेत्रात घनकच-याच्या विल्हेवाटीसाठी तळोजा येथे ''सामाईक भरावभुमी'' विकसित करण्याच्या प्रकल्पाबाबत दिनांक २४/८/२०११ रोजी मा. महासभेने पारीत केलेल्या ठराव क्र. ४५ बाबत पुनश्च विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

**प्रस्तावना**

**उल्हासनगर कार्यक्षेत्रात दैनंदिन अंदाजे ३१० मे. टन घनकचरा निर्माण होत आहे. सदचा कचरा म्हारळ गांव, राणा ट्रेडींग कंपनी जवळ, उल्हासनगर–१ येथिल डंपिंग ग्राउंडवर टाकण्यात येत आहे.**

क्र.म.आ./घ.क.व्य./२५१ दिनांक २/६/०९ रोजीच्या पत्रान्वये मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सामाईक भरावभूमी विकसीत करण्याच्या प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी सहमती कळविणे बाबत विनंती केलेली होती. प्रशासनाने कचरा विल्हेवाटीसाठी शास्त्रोक्त सामाईक भरावभूमी विकसीत करण्याचा प्रकल्पाचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मा. महासभेपुढे निर्णयास्तव ठेवला होता. मा. महासभेने सदर प्रस्तावाबाबत ठराव क्र. ८ दिनांक १९/६/०९ रोजी अन्वये महापालिकेचा सहमती व सहभाग मान्य केलेला होतो. त्याअनुषंगाने इकडील कार्यालयाचे पत्र क्र. २०४ दिनांक ५/९/२००९ रोजी अन्वये महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारण, मुंबई यांना कळविण्यात आलेले होते.

दरम्यानच्या कालावधीत दिनांक २४/८/२०११ रोजीच्या महासभेत विषय क्र. १५ अन्वये प्रस्तावाची सुचना आणून महापालीकेचे आर्थिक दायित्व, महसुली उत्पन्न व हित पहाता आणि महापालिकेकडे जी जमीन उपलब्ध असेल त्या जमिनीवर महापालिका स्तरावर शास्त्रोक्त पध्दतीने कच–याची विल्हेवाट लावण्यासाठी कच–यावर प्रक्रीया करण्याचा प्रकल्प ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर उभारण्या प्रयोजनार्थ एम.एम.आर.डी.ए. तर्फे सामाईक भरावभूमी विकसित करणे कामी पूर्वीचा दिनांक १९/६/२००९ रोजीचा महासभा ठराव क्र. ८ रद्द करीत असल्याचा ठराव महासभा क्र. ठराव ४५ दिनांक २४/८/२०११ अन्वये सर्वानुमते पारीत करण्यात आलेला आहे.

मात्र सदर प्रस्तावाच्या सुचनेअन्वये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार खाजगी कंत्राटदाराशी करारनामा झाल्यावर महानगरपालीकेने योजनेसाठी जागा उपलब्ध करुन देणे. तथापि जागे संबंधी सर्व आवश्यक कागदपत्रे मिळवीणे व जागेसंबंधीचे वाद मिटवणे खाजगी संस्थेस बंधन कारकर राहातील तथापी प्रकल्पासाठी माहपालिका जागेची व्यवस्था करु शकली नाही तर निविदाधारकांस जागेची व्यवस्था करावी लागेल, असे नमूद केलेले आहे. तद्नंतर सदर ठरावाच्या अनुशंगाने जा. क्र. उमपा/आ.का/२९२/२०११ दिनांक १६/९/२०११ आदेश अन्वये तात्कालीन मा. आयुक्त सो. यांनी सदर कामाच्या संदर्भात करावायाच्या निविदा प्रक्रीये करीता शहर अभियंता यांना प्राधिकृत करण्यात आले होते. मात्र त्या अनुशंगाने कोणतीही कार्यवाही झालेली नाही. सदर प्रकरणी प्रशासनाचे स्पष्ट मत आहे की, उल्हासनगर महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध नाही व यापुर्वीच महापालीकेमार्फत विविध खाजगी संस्थांना लॅडफीस साईट उपलब्ध करुन घनकच–यावर करावयाच्या प्रक्रीया प्रकल्प योजनेबाबात कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यशाळे दरम्यान झालेल्या चर्चेत खाजगी संस्थांनी घनकच–यावर प्रक्रीया करुन विविध प्रकल्प राबविण्यास तयारी दर्शविली मात्र त्यासाठी लागणारी जागा महापालीकेने उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. यावरुन खाजगी संस्था देखील जागा उपलब्ध करुन देण्यास असमर्थ असल्याचे जाणवते. त्यामुळे महासभेने दिनांक २४/८/२०११ रोजी सर्वानुमते पारीत केलेला अशासकीय ठराव क्र. ४५ नुसार अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची तळोजा येथिल सामाईक भरावभूमी विकसीत करण्याच्या प्रकल्पाची तयारी युध्द पातळी सुरु असून निविदा प्रक्रीया अंती मेसर्स रामके इनव्हायरो इंजिनीयरींग लिमीटेड यांचे न्युनतम दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार फिक्स्ड कॉम्पोनेन्टसाठी रुपये ५०४/– व व्हेरीएबल कॉम्पोनेन्टसाठी रुपये ३४२/– प्रति टन

टिपींग फी चे दर सदर निविदाकाराकडून प्राप्त झालेले आहेत. पुढील प्रक्रीया युध्द पातळीवर सुरु आहे.

सद्यस्थित असलेल्या डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जागा कमी पडत आहे व सदर परीसरातील नागरीक सदच्या डंपिंग ग्राउंडवर कचरा टाकणे बंद करण्यासाठी वारंवार निदर्शने, उपोषण करीत असतात. महापालीकेकडे सद्यस्थितीत असलेले डंपिंग ग्राउंडची कचरा साठवून घेण्याची क्षमता संपत असल्याने व महापालीकेकडे महापालीका कार्यक्षेत्रात घनकचरा विल्हेवाटीसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने महापालीकेस घनकच—यासाठी लॅंडफील साईटची अत्यंत आवश्यकता आहे. करीता मा. महासभेने दिनांक २४/८/२०१२ रोजी पारीत केलेला ठराव क्र. ४५ वर पुनश्च विचारविनीमय करुन ''सामाईक भरावभुमी'' मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हाती घेतलेल्या योजनेस उल्हासनगर महानगरपालिकेचा सहभाग घेण्यास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेसमोर सविनय सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४० <u>दिनांकः—२०/९/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वधारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत मुंबई महानगर क्षेत्रात घनकच—याच्या विल्हेवाटीसाठी ''सामाईक भरावभुमी'' विकसीत करण्याच्या प्रकल्पामध्ये सहभागी होण्यास समती न देता खालील कारण व फेरफारासह पुर्वीच्या दिनांक २४/८/२०११रोजीचे महासभा ठराव अंतिम करीत आहे.

१. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातून अंदाजे ३००—३५० टन कचरा दररोज उचलण्यात येतो. कच—याच्या परिमाणासाठी फिक्स कॉम्पोनेन्ट, व्हेरीएबल काम्पोनेन्ट व इतर खर्चा पोटी अतिरिक्त भार महापालिकेस सोसावा लागेल त्यासाठी महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत नाही.

२. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात योग्य खाजगी संस्था यांना भराव भूमीसाठी—लॅन्डफिल साईट— जागा किंवा जमीन उपलब्ध करण्यास आयुक्तास प्राधिकृत अधिकृत करीत आहे.

३. आवश्यकता भासल्यास प्रचलित विकास योजनेत आरक्षण किंवा बदल करण्या प्रयोर्जनाथ फेरफार करण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

४. महापालिका हद्दी जागा किवा जमीन उपलब्ध नसल्यास शहर सीमाच्या २० किलोमीटर अंतरावर एम.आय.डी.सी. किवा शासकीय मालकीची जमीन उपलब्धीसाठी संबधित संस्थेशी किंवा शासनाशी पाठपुरावा करण्या प्रयोर्जनाथ आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

५. प्रशासनिक आवश्यकते प्रमाणे निविदेच्या अटी व शर्तीत फेरफार करणे किवा भर घालणे प्रयोर्जनाथ आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

या ठरावा व्दारे घेतलेले निर्णय अंतिम असुन इत्तिवृत्त पुढच्या सभेत कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ८:—** शहरातील लहान मुले व इतरांचे मनोरंजन प्रयोजनार्थ धडकगाडी व ट्रेन चालविणेकामी महापालिकेच्या नेताजी उदयानातील मोकळी जागा खाजगी अभिकर्त्यास भाडे तत्वावर देण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मा. महापौर सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, उल्हासनगर महानगरपालिका यांनी महानगरपालिका मालकीच्या नेताजी उदयानातील मोकळीजागा लहानमुले व इतरांकरीता धडकगाडी व ट्रेन चालवण्यासाठी खाजगी अभिकर्त्यास भाडे तत्वावर देणेबाबत शिफारस पत्र दिले आहे, अशा प्रकारची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत नागरीक त्यांचेकडे तशी मागणी करीत आहेत तसेच में. मिनी फनलॅंडचे मालक श्री. अमित छुगानी यांना ५ वर्षाकरीता भाडे तत्वावर नेताजी उदयानातील मोकळीजागा देणेबाबत त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय दि. २०/०७/११ रोजी प्राप्त झाले असुन त्यानुसार सदरची जागेची लांबी ८७ फुट व रूंदी ४७ फुट एवढी आहे, व सदर जागा नियमानुसार भाडे तत्वावर देणेसाठी हरकत नाही, असे नमुद केले आहे.

मुंबई प्रांतीक महानगरपालिका कलम ७९ मधील मालमत्ता विनियोग करण्यासंबंधी तरतुदी पोटकलम (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर बाबतीत मा. महासभा मंजुरीची आवश्यकता आहे.

सदरची मोकळीजागा नेताजी उदयानाच्या आतमध्ये असुन याचा वापर सध्या जेष्ठ नागरीक, लहानमुले खेळण्यासाठी व विरंगुळा म्हणुन करीत आहेत. सदर जागा उपरोक्त कारणासाठी लहान मुलांच्या मनोरंजनासाठी भाडेतत्वावर दयावी किंवा कसे तसेच भाडेतत्वावर दयावयाची झाल्यास वर्तमानपत्रात जाहीरात देवुन जाहीर निविदा मागविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ४१ **दिनांक:—२०/९/२०१२**

सुचकाचे नाव :— श्रीमती जया साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय तायडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शहरातील लहान मुले व इतरांचे मनोरंजन प्रयोजनार्थ धडकगाडी व ट्रेन चालविणेकामी महापालिकेच्या नेताजी उदयानातील मोकळी जागा खाजगी अभिकर्त्यास भाडे तत्वावर देण्यास मान्यता देत नाही.

**कारण**

उदयानाच्या वापरात व सुशोभिकरणात परिणाम पडेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :**—मागील महासभेचे दिनांक २०/९/२०१२ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. राजु जग्यासी

**महासभा ठराव क्र. ४१ अ** **दिनांक : २०/१०/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/९/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :–** बॅ.नं. १३९७ जवळ, उल्हासनगर–४ येथील मंजुर विकास आराखडयातील ४०' रस्ता विकास व रस्त्यात बाधित होणारे १००हून अधिक घरांचे पुर्नवसन करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

बॅरेक नं. १३९७ रुम नं. ८ च्या लगत सरकारी जमिनीवरील व लगत असलेल्या ४०' डी.पी. रोडमध्ये बाधीत होणारे बांधकामे हटविण्याबाबत श्री. राजु गुरप यांनी मा. लोक–आयुक्त यांचेकडे तक्रार केली होती.

त्याअनुषंगाने उल्हासनगर विकास आराखडयानुसार विषयांतील जागेलगत ४०' रस्ता असुन त्याची लांबी अंदाजे ४००' आहे. या रस्त्यावर श्री. राजु गुरप यांनी मागणी केलेल्या जागेत ५ बांधकामे असुन ४०' रस्त्याचे जागेवर एकुण १०० हुन अधिक बांधकामे आहेत. तपासणी अंती सदरचे बांधकामे सन १९८५ पुर्वीचे असुन शासनाचे उपसचिव यांचेकडील पत्र क्र. ळम्छ/१०२०/२०२/नवि दि. १७.०५.२००२ च्या पत्रातील निर्देशांनुसार १९९५ नंतरच्या बांधकामांना विकासीत करणेबाबत निर्देश दिले असल्याने सदरच्या बांधकामावर कारवाई करण्यात आलेली नाही.

तथापि, महाराष्ट्र शासनाचे अनधिकृत बांधकामे नियमीत करण्याचे आद्यादेश १/२००६ दि. १५. ०१.२००६ रोजी पारीत झाला असुन त्याअनुषंगाने सदर ठिकाणच्या मिळकत धारकांनी बांधकाम नियमाधिनाचे प्रस्ताव तज्ञ समितीकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका मंजुर विकास आराखडयामध्ये सदर जागेमधुन ४०' विकास रस्ता जात आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेची सुधारीत प्रारुप विकास आराखडा सन २००१ मध्ये प्रसिध्द झाला असुन विषयांकित जागेमधुन सदरचा ४०' रस्ता वगळण्यात आला आहे.

तरी विषयांकित जागेमधुन ४०' रस्ता शासनाचे दि. २६.१०.०४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे कठोरतम तरतुदीनुसार सदर रस्ता वाहतुकीसाठी विकसित करणे आवश्यक आहे. रस्ता विकसित करण्यापुर्वी रस्त्यात बाधीत होणारे १०० हुन अधिक घरांचे पुर्णवसन करणे आवश्यक आहे. महासभेच्या विषय पटलावर सदर विषय समाविष्ट करणेबाबत विनंती.

**महासभा ठराव क्र:** ४२ **दिनांकः–२०/१०/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुभाष मनसुलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे बॅ.नं. १३९७ जवळ, उल्हासनगर–४ येथील मंजुर विकास आराखडयातील ४०' रस्ता विकास व रस्त्यात बाधित होणारे १०० हून अधिक घरांचे पुर्नवसन करण्यास मान्यता देत नाही.

**कारण**

(१) १०० हुन अधिक घरांचे पुर्नवसन करण्यासाठी जमीन उपलब्ध नाही.

(२) सदर ठिकाणच्या मिळकतधारकांची बांधकामे, बांधकामे नियमाधीन कायदयाखाली नियमाधीन करण्याच्या प्रयोजनार्थ विचाराधीन आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:–** वैधानिक कार्यवाही पुर्ण झाल्याने (बीएसयुपी) योजने पुरतेच मंजुर विकास आराखडया

नुसार आरक्षण क्र. ७४ प्लॉट क्र.६१९ (भा) प्राथमिक शाळेसाठी आरक्षित क्षेत्र, २.० हेक्टर सुधारित विकास आरखडया नुसार आरक्षण क्र.४२, वैदयकीय सुविधेसाठी आरक्षित व आरक्षण क्र.४३– शैक्षणिक सुविधेसाठी आरक्षित या आरक्षणातुन वगळून

रहिवासी बदल व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत २.५ चटई क्षेत्र निर्देशकाची सवलत अंतभुर्त करण्या प्रयोर्जनाथ अंतिम मंजूरी देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची मूळ विकास योजना ही शासन निर्णय क्रमांक टिपीएस–१२७२/ ६०–१८५ आरपीसी दि. २०/५/१९७४ अन्वये मंजूर केलेली असून ती दिनांक १/७/१९७४ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानी तयार केलेली उल्हासनगर शहराची सुधारित प्रारुप विकास योजना ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सन–२००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी शासनाचे निर्णय क्रमांक टिपीएस–१२०२ /८०६/सीआर–८३/ २००२ युडी–१२ दि. २६/१०/२००४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव–बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र यामधून वगळलेले असून, उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिभार नियोजन घोषित करुन सुधारित विकास योजना तयार करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सदरची सुधारीत विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत उल्हासनगर शहराची मूळ मंजूर विकास योजना व प्रारुप सुधारित विकास योजना यामधील कठोरात्मक तरतूदी लागू राहतील असे देखील त्यात नमूद करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने मंजूर व प्रारुप विकास आराखडयात एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) व संक्रमण शहरी गरिबांसाठी गृहनिर्माण योजना अंतर्गत मालकी तत्वांवर अथवा भाडेपटट्यावर देण्याबाबत राहुलनगर, प्लॉट नं. ६१९ (भा), उ.नगर–२ येथील वसाहतीचा बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत पुर्नविकास करणेकरीता बांधकाम परवानगी दिलेली आहे. परंतू दि. २५.०८.०९ रोजी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचे आदेश पारीत करण्यात आले होते. सदरच्या बांधकामांना हया कार्यालयाने दि. २८.११.०८ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. परंतू अद्यापपर्यंत बांधकामाला सुरुवात झालेली नाही. मंजूर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ७४, प्लॉट नं. ६१९ (भा) प्राथमिक शाळेसाठी आरक्षित, क्षेत्र २.० हेक्टर असुन सुधारीत विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ४२, वैद्यकिय सुविधेसाठी आरक्षित व आरक्षण क्र. ४३–शैक्षणिक सुविधेसाठी आरक्षित या आरक्षणातुन वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करावयाचे प्रस्ताव आहे. सदरचे आरक्षणात प्रस्तावित केलेले (BSUP) योजनेपुरतेच आरक्षण वगळण्यात येईल. उर्वरित क्षेत्र आरक्षणात समाविष्ट असेल.

सदर बांधकामाला दि. २८.११.०८ रोजी एफएसआय १.७६ मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतू शासनाचे आदेश क्र. टिपीएस–११०७/अनौ–३६/प्र.क्र.१३५/०८/नवि–९ दि. २४.१२.०८ चे आदेश नंतर प्राप्त झालेले असुन सदर आदेशामध्ये दि. १९.०९.०२ रोजीच्या निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती. परंतू एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकासासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या क्र. एचएसजी–२००२/प्र.क्र. ४/गृनियो–१ दि. १९.०९.०२ रोजीच्या निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती. परंतू एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या शासन निर्णयात अशी तरतुद नसल्याने तशी सवलत प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत करणे आवश्यक असल्याने शासनाने नगर विकास विभागाचे आदेश क्र. टिपीएस–११०७/अनौ ३६/प्र.क्र. १३५/०८ नवि–९ दि. २८.०४.०८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन सर्व महानगरपालिकांना व नगर परिषदांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व

झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टिने प्रभावी व सुरळीत करता यावी म्हणून काही अटींवर सदर योजनेसाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याची कार्यवाही महासभा ठराव क्र. ५२ दि. २०.१०.२०११ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर निर्देश मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र. ३१.२ अन्वये अंतर्भुत करण्याचे प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने सदरची नोटीस महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्र दै. पुण्यनगरी व दै. धनुषधारीमध्ये प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आंत नागरिकांकडून सुचना व हरकती मागविण्यात आल्या. परंतू हया बाबत एकही हरकत किंवा सूचना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर फेरबदलाबाबत आतापर्यंत सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार सदर फेरबदलाबाबत अंतिम ठरावासाठी महासभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.

महासभेच्या विषय पटलावर सदर विषय समाविष्ठ करणेबाबत विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४३ <u>दिनांक:—२०/१०/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वैधानिक कार्यवाहीपुर्ण झाल्याने (बीएसयुपी) योजने पुरतेच मंजुर विकास आराखडया नुसार आरक्षण क्र. ७४ प्लॉट क्र.६१९ (भा) प्राथमिक शाळेसाठी आरक्षित क्षेत्र, २.० हेक्टर सुधारित विकास आरखडया नुसार आरक्षण क्र.४२, वैदयकीय सुविधेसाठी आरक्षित व आरक्षण क्र.४३— शैक्षणिक सुविधेसाठी आरक्षित या आरक्षणातुन वगळून रहिवासी बदल व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत २.५ चटई क्षेत्र निर्देशकाची सवलत अंतभुर्त करण्या प्रयोर्जनाथ अंतिम मंजूरी देत आहे.

**परंतु,**

यापुढे उल्हासनगर शहरामध्ये शासन निर्देशित गरिबांच्या घरांच्या योजने करिता (उदा. बी.ए.यु.पी., राजीव आवास योजना इत्यादी साठी) २.५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक लागु करणेस्तव ही महसभा मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** वैधानिक कार्यवाही पुर्ण झाल्याने बीएसयुपी योजने पुरतेच वाल्मिकीनगर, शिट नं. ५७,५८ प्लॉट नं. ८२८ ते ८४० उल्हासनगर—५ येथे २.५ चटई क्षेत्र निर्देशकाची सवलत मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भुत करण्या प्रयोर्जनाथ अंतिम मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची मूळ विकास योजना ही शासन निर्णय क्रमांक टिपीएस—१२७२/६०—१८५ आरपीसी दि. २०/५/१९७४ अन्वये मंजूर केलेली असून ती दिनांक १/७/१९७४ पासुन आमलात आलेली आहे. तसेच नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानी तयार केलेली उल्हासनगर शहराची सुधारित प्रारुप विकास योजना ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये सन—२००१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापी शासनाचे निर्णय क्रमाक टिपीएस—१२०२/८०६/सीआर—८३/ २००२ युडी—१२ दि. २६/१०/२००४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव—बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र यामधून वगळलेले असून, उल्हासनगर महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरण घोषित करुन सुधारित विकास योजना तयार करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सदरची सुधारीत विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द होईपर्यंत उल्हासनगर शहराची मूळ मंजूर विकास योजना व प्रारुप सुधारित विकास योजना यामधील कठोरतम तरतूदी लागू राहतील असे देखील नमूद करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने मंजूर व प्रारुप विकास आराखडयात एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) व संक्रमण शहरी गरिबांसाठी गृहनिर्माण योजना अंतर्गत मालकी तत्वांवर अथवा भाडेपट्ट्यावर देण्याबाबत वाल्मिकीनगर, शिट नं. ५७,५८, प्लॉट नं. ८२८ ते ८४०, उ.नगर—५ येथील वसाहतीचा बी. एस.यु.पी. योजनेअंतर्गत दि. २५.८.०९ रोजी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाचे आदेश पारीत करण्यात आले होते. शासनाने सदर कामास दि. २५.०८.०९ रोजी स्थगिती आदेश दिले होते. तसेच दि. २०.०५.१० रोजी स्थगिती आदेश उठविण्यात आला. सदरच्या बांधकामांना हया कार्यालयाने दि. २८.११.०८ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आलेली होती. दि. २७.११.०९ पर्यंत बांधकाम सुरु करावयाचे होते. अद्यापपर्यंत बांधकामाला सुरुवात झालेली नाही.

प्रस्तावातील जागा मंजूर विकास योजना व प्रारुप विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट आहे.

सदर जागेची मालकी उपविभागीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. उपवि/भुखंड/छा—५/ कावि/२१ दि. २१.०१.०८ अन्वये छावणी क्र. ५, शिट नं. ५७ व ५८ मधील भुखंड क्र. ८२८ ते ८४० या सरकारी जमिनीवर बांधलेले आहे. सदर जमिनीची सनद/ताबा कोणासही देण्यात आलेला नाही. सदरील जागेची मालकी ही महाराष्ट्र शासनाची असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी कळविले आहे.

सदर बांधकामाला दि. २८.११.०८ रोजी एफएसआय २.५० मंजूरी देण्यात आलेली आहे. बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत एस.आर.ए प्रमाणे सवलत देणेबाबत शासनाचे आदेश क्र. टिपीएस — ११०७/अनौ—३६/प्र.क्र. १३५/०८/नवि—९ दि.२४.१२.०८ चे आदेश नंतर प्राप्त झालेले असुन सदर आदेशामध्ये दि. १९.०९.०२ रोजीच्या निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती. परंतू एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकासासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या क्र. एचएसजी— २००२/प्र.क्र.४/गृनियो—१ दि. १९.०९.०२ रोजीच्या निर्णयानुसार २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती. परंतू एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या शासन निर्णयात अशी तरतुद नसल्याने तशी सवलत प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत करणे आवश्यक असल्याने शासनाने नगर विकास विभागाचे आदेश क्र. टिपीएस—११०७/अनौ ३६/प्र.क्र.१३५/०८ नवि—९ दि. २४.१२.०८

अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन सर्व महानगरपालिकांना व नगर परिषदांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टिने प्रभावी व सुरळीत करता यावी म्हणून काही अटींवर सदर योजनेसाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याची कार्यवाहीसाठी महासभा ठराव क्र. ५१ दि. २०.१०.२०११ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर निर्देश मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र. ३१.२ अन्वये अंतर्भुत करण्याचे प्रस्तावित आहे.

त्या अनुषंगाने सदरची नोटीस महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्र दै. पुण्यनगरी व दै. धनुषधारीमध्ये प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आंत नागरिकांकडून सुचना व हरकती मागविण्यात आल्या. परंतू हया बाबत एकही हरकत किंवा सूचना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर फेरबदलाबाबत आतापर्यंत सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार सदर फेरबदलाबाबत अंतिम ठरावासाठी महासभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.

महासभेच्या विषय पटलावर सदर विषय समाविष्ठ करणेबाबत विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ४४ <u>दिनांक:–२०/१०/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वैधानिक कार्यवाही पुर्ण झाल्याने बीएसयुपी योजने पुरतेच वाल्मिकीनगर, शिट नं. ५७,५८ प्लॉट नं. ८२८ ते ८४० उल्हासनगर–५ येथे २.५ चटई क्षेत्र निर्देशकाची सवलत मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत अंतर्भुत करण्या प्रयोर्जनाथ अंतिम मंजुरी देत आहे.

**परंतु,**

यापुढे उल्हासनगर शहरामध्ये शासन निर्देशित गरिबांच्या घरांच्या योजने करिता (उदा. बी.ए.यु.पी., राजीव आवास योजना इत्यादी साठी) २.५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक लागु करणेस्तव ही महसभा मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. ६:–** अग्निशमन केंद्र बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मा. सचिव नगर विकास विभाग यांनी शासन निर्णय क्र. अशस/१४०७३६०/प्र.क्र. २११, दिनांक ३१/८/२००९ अन्वये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेबाबत निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र राज्यातील सर्व अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ दिनांक ६/१२/२००८ पासून राज्यातील नागरी भागात व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केलेला आहे. यासंबंधी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ दिनांक २३/६/२००९ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहे.

सबब या अधिनियमातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन त्यामध्ये असणारी तुट भरुन काढून अग्निशमन सेवेचे बळकटीकरण/सक्षमीकरण करणेबाबत निर्देश दिले आहे. यासाठी आवश्यक असलेले डीपीआर शासनाकडे सादर केलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर–३ येथिल तरणतलाव शेजारील अग्निशमन केंद्र बांधणेच्या स्थापत्य कामाचे मे. अनिरुध्द नाचखवा, स्थापत्य सल्लागार यांचेकडून सविस्तर प्राकलन व ले आऊट प्लान तयार करुन घेण्यात आले असून त्याची प्राकलनिय किंमत रु. १.२५ कोटी इतकी आहे. अग्निशमन इमारत बांधणेच्या प्रस्तावित इमारतीच्या जागेमध्ये अस्तित्वात अग्निशमन केंद्रासह विदयुत विभागाचे गोडावून निष्कासित करुन नविन प्रस्तावित अग्निशमन केंद्राची इमारत बांधणे आहे. तसेच लगतचा ट्रान्सफार्मर अन्य योग्य जागेत स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. गरज पडल्यास मागील बाजूस असलेले विदयुत विभागाचे कार्यालय व पहिल्या मजल्यावरील ट्रेनिंग सेंटर असलेले इमारत निष्कासित करणे गरजेचे आहे. या जागेत अग्निशमन केंद्राची इमारत बांधून मागील बाजूस विदयुत विभागाकरीता गोडावून व कार्यालयासाठी जागा उपलब्ध होते. त्या जागेमध्ये लागून अन्य इमारत बांधणे प्रस्तावित आहे. अग्निशमन केंद्राची इमारत प्रस्तावित आहे. अग्निशमन केंद्राची इमारत बांधतेवेळी सध्या कार्यरत असलेले अग्निशमन केंद्र राजीव गांधी उदयान (सपना उदयान) विदयुत विभागाचे स्टिम्युलेशन सेंटर जवळ असलेल्या इमारतीत व मोकळया जागेवर स्थलांतरीत करण्याकरीता प्रस्तावित आहे.

महानगरपालिकेच्या वर्ष २०११–१२ च्या अर्थसंकल्पात विपरीत परिस्थिती व्यवस्थापन व अग्निशमन इमारत अंतर्गत बी–२ (१) अग्निशमन इमारत बांधणे या लेखाशिर्षात सदर कामासाठी १.२५ कोटी इतकी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. सदर अग्निशमन केंद्र इमारत बांधणी व अग्निशमन वाहन खरेदी कामी प्रशासनाकडुन ८५.७५ लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. त्यापैकी अग्निशमन केंद्र इमारत बांधणेसाठी रु. ४२.८७ लक्ष इतकी तरतूद ठेवलेली आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाहीच्या प्रस्तावास व अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत उल्हासनगर–३ उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाचे मागील तरणतलाव शेजारील अग्निशमन केंद्र बांधणेच्या रु. १.२५ कोटी प्राकलनीय खर्चाचे प्रस्तावास मा. महासभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ४५ <u>दिनांक:–२०/१०/२०१२</u>

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राम पारवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अग्निशमन केंद्र बांधणे कामी रु.१.२५ कोटी चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. ७:—** महापालिका मुख्यालय इमारत सुशोभिकरण देखभाल व दुरुस्ती कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर शहरात मुलभूत सेवा सुविधा पुरविणे तसेच जनतेची सोय व्हावी म्हणून महानगरपालिका मुख्यालय इमारतीतील विविध विभाग आहेत. शिवाय जनप्रतिनिधी यांचे कार्यालय महापालिका इमारतीत आहे. शहरातील जनतेस जन प्रतिनिधी यांची भेट घेणे किंवा विविध विभागातून काम करुन घेणेसाठी त्यांना महापालिका मुख्यालयात यावे लागते. महापालिका मुख्यालयात दोन उद्याने आहेत. महापालिका मुख्यालय इमारतीत पॅसेज, जिना व व्हरांडा यांचे क्षेत्रफळ ४५९८.६६ चौ. मी. असून त्यामध्ये अधिकारी व कर्मचा—यांसाठी एकूण १२ व जनप्रतिनिधी दालनात एकूण ६ शौचालय आहेत. नव्याने बांधण्यात आलेल्या महापालिका इमारतीच्या दुस—या मजल्यावर प्रशिक्षण केंद्र व इतर विभागांसाठी दालनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महापालिका परिसरात मुख्य प्रवेशद्वारासमोर व डाव्या बाजूस एकूण दोन उद्याने असून त्याचे क्षेत्रफळ ८२६.३० चौ.मी एवढे आहे.

महापालिका मुख्यालय व परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणेसाठी परिसराचे सुशोभिकरण करणे व त्याची सतत देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका इमारतीचे यांत्रिकी पध्दतीने दैनंदिन साफसफाई करणे व फुल झाडे लावून त्याचे सुशोभिकरण करणेचे प्रस्तावित आहे.

या कामासाठी प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची एकूण किंमत रु. ६१.१० लक्ष इतकी आहे. यामध्ये देखभाल व दुरुस्ती करीता अंदाजे रु.३२.३७ लाख वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तसेच मुख्य प्रवेशद्वारामागे जेठानंद अपार्टमेंट समोरील परिसराचे सुशोभिकरणासाठी अंदाजे २८.७२ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च महापालिका इमारत मुख्यालय दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल व वर्ष २०१२—२०१३ चे अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षाखाली एकूण ७५.०० लाखाची तरतूद उपलब्ध आहे. सबब महापालिका मुख्यालय व परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी परिसराचे सुशोभिकरण करणे या कामाच्या प्राकलनास मा.महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी आवश्यक आहे.

**प्रस्तावित काम खालील दोन भागात विभागलेले आहे.**

भाग—१ हा खर्च अ अंदाजपत्रक भाग—१ क—५ (१) मुख्यालय इमारत दुरुस्ती मधील एकूण ठेवलेली तरतूद रु.७५.०० लक्ष आहे. मुख्यालय इमारतीचे दैनंदिन देखभाल साफसफाई अंतर्गत शोभेची झाडे लावणे, त्यांची निगा राखणे इत्यादीसाठी वार्षिक ३२.३७ लक्ष खर्च अपेक्षित आहे. परंतू एप्रिल ते सप्टेंबर हा सहा महिन्याचा अवधी व निविदा प्रक्रियेचा ऑक्टोंबर व नोव्हेंबर हा दोन महिन्याचा असा आठ महिन्याचा कालावधी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चातून कमी झाला आहे. तरी अंदाजपत्रक २०१२—१३ नुसार शिल्लक चार महिन्याच्या कालावधीसाठी रु.७५.०० लक्ष पैकी फक्त रु.१०.७९ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

भाग—२ उल्हासनगर महानगरपालिकेच्या आवारातील उद्यानाचे नुतनीकरण, दैनंदिन देखभाल या कामासाठी सहा महिन्याचा कालावधी लागणार असून एकूण २८.७२ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे हा खर्च अंदाजपत्रक भाग—२ क—३ उद्यान विकसित कामांमध्ये असलेली एकूण तरतूद १००.०० लक्ष मधून भागविण्यात येईल. परंतू एप्रिल ते सप्टेंबर हा सहा महिन्याचा अवधी तसेच निविदा प्रक्रिया आणि सक्षम अधिका—यांची मंजूरी यासाठी ऑक्टोंबर व नोव्हेंबर हा दोन महिन्याचा असा आठ महिन्याचा कालावधी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चातून कमी झाला आहे. तरी अंदाजपत्रक २०१२—१३ नुसार शिल्लक चार महिन्याच्या कालावधीसाठी रु.१०० लक्ष पैकी फक्त रु.९.५७ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तपणे वर्ष २०१२—१३ करीता अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध आहे. वरीलप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय इमारत सुशोभिकरण, देखभाल व दुरुस्ती करणे या कामाच्या रु.

६१.१० लक्ष किंमतीच्या प्राकलनास मा.महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र:** ४५ अ **दिनांक:—२०/१०/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका मुख्यालय इमारत सुशोभिकरण देखभाल व दुरुस्ती कामी रू.६१.१० लक्ष किंमतीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने परत घेतल्यामुळे वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ८:–** शहरातील विविध कारंजे (फवारे) यांचे खाजगी ठेकेदारा मार्फत देखभाल व दुरुस्ती कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहरातील मुख्य चौक, बगिचे इत्यादी ठिकाणी एकूण ५० कारंजे बनविण्यात आलेले आहेत. सदर कारंजे शहराच्या सौंदर्यात भर पडत आहे. या सौंदर्याचा फायदा शहरातील अनेक नागरीक, वरिष्ठ नागरीक व मुले घेत आहेत. तसेच उल्हासनगर शहर हे औद्योगिक शहर असल्यामुळे देशाच्या कानाकोप–यातून अनेक व्यापारी शहरामध्ये येत असतात.

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर बागबगीचे देखभाल करण्यासाठी माळी, प्लंबर, मजूर इत्यादी कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करावे लागत असून त्यांचा वेतनावर मोठया प्रमाणावर खर्च होत आहे. दिवसेंदिवस महापालिकेचे आर्थिक उत्पन्न कमी होत आहे. तसेच जुने कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे जागेवर नव्याने कर्मचारी नियुक्त करणे लगेच शक्य होत नाही. त्यामुळे अपूरा कर्मचारी संख्या असल्यामुळे त्याचा परिणाम शहराच्या सौंदर्यात भर टाकणा–या कारंज्यांना सुस्थितीत ठेवण्यावर होत आहे. तसेच कारंजे सुस्थितीत ठेवण्यासाठी पाणी पुरवठा, साफसफाई, विद्युत इत्यादी विभागातील कर्मचा–यांची आवश्यकता भासत असते.

शहरात एकूण असणारे ५० कारंजे नियमित सुस्थितीत ठेवणेकरीता महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग अपूरा पडत असल्याने त्यांचेकडून सदर कारंज्यांची कामे करुन घेणेत अडचणी निर्माण होत आहेत. कारंजे सुस्थितीत नसल्यामुळे अनेक जनप्रतिनिधी, नागरीक तक्रारी करत असतात. सदर तक्रारी निवारणासाठी महापालिकेकडून विलंब होतो. त्यामुळे सदर कामे खाजगी ठेकेदारामार्फत केल्यास शहरातील कारंजे सुस्थितीत राहण्यास मदत होवून शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे.

या कामासाठी प्राकलन तयार करण्यात आले असून याची एकूण किंमत रु.२२५.०९ लक्ष इतकी आहे. यामध्ये देखभाल दुरुस्तीकरीता अंदाजे रु. ८१.४७ लक्ष वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तसेच सद्यस्थितीत कारंज्यांची स्थिती सुधारण्यासाठी एकदा पूर्ण दुरुस्ती करावी लागणार आहे. त्यासाठी अंदाजे रु. १.४३ कोटी खर्च अपेक्षित आहे. व दैनंदीन दुरुस्तीच्या कामाकरीता लागणारा खर्च व साहित्याचा दर ठेक्याच्या कालावधीसाठी लागू राहील. हा खर्च नवीन उद्याने बनविणे, उद्यानांची दुरुस्ती, कारंजे दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षातून करणेस प्रस्तावित करण्यात आले होते. सदर कामाच्या प्राकलनास मा.महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे. **प्रस्तावित काम खालील दोन भाग विभागलेले आहे.**

भाग–१ या कामामध्ये शहरातील विविध कारंजे (फवारे) यांचे देखभाल, दुरुस्ती करणेकरीता प्राकलननिहाय वार्षीक खर्च रु. ८१.४७ लक्ष अपेक्षित आहे. सदर खर्चासाठी 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क–३ (५) (अ) कारंजे दुरुस्ती मधील एकूण ठेवलेली तरतूद रु.२०.०० लक्ष आहे. परंतू एप्रिल ते सप्टेंबर हा सहा महिन्याचा अवधी व निविदा प्रक्रियेचा ऑक्टोंबर व नोव्हेंबर हा दोन महिन्याचा असा आठ महिन्याचा कालावधी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चातून कमी झाला आहे. तरी अंदाजपत्रक २०१२–१३ नुसार शिल्लक चार महिन्याच्या अवधीसाठी रु.२७.१५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. उर्वरीत रु.७.१५ लक्ष उद्यानांची दुरुस्ती या निधीतून घेण्यात येईल.

भाग–२ या कामामध्ये कारंज्यांची स्थिती सुधारण्यासाठी एकदा पूर्ण दुरुस्ती करावी लागणार आहे या कामासाठी बारा महिन्याचा अवधी लागणार असून त्यासाठी अंदाजे रु.१.४३ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च 'अ' अंदाजपत्रक भाग क–३ (१) उद्यानांची दुरुस्ती मधील एकूण ठेवलेली तरतूद रु.७५ लक्ष मधून भागविण्यात येईल. परंतू एप्रिल ते सप्टेंबर हा सहा महिन्याचा अवधी तसेच निविदा प्रक्रिया आणि सक्षम अधिका–यांची मंजूरी यासाठी ऑक्टोंबर ते नोव्हेंबर हा दोन महिन्याचा असा आठ महिन्याचा कालावधी सदर कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चातून कमी झाला आहे. तरी

अंदाजपत्रक २०१२–१३ नुसार शिल्लक चार महिन्याच्या कालावधीसाठी रु.७५ लक्ष पैकी फक्त रु. ४७.६६ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तपणे वर्ष २०१२–१३ करीता अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध असल्याने शहरातील विविध कारंजे (फवारे) यांचे देखभाल, दुरुस्ती करणे या कामाच्या रु.२२५.०९ लक्ष किंमतीच्या प्राकलनास मा.महासभेपुढे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र:** ४५ ब　　　　**दिनांकः–२०/१०/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शहरातील विविध कारंजे (फवारे) यांचे खाजगी ठेकेदारा मार्फत देखभाल व दुरुस्ती कामी रु.२२५.०९ लक्ष किंमतीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने परत घेतल्यामुळे वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ९:–** श्री. एन.एन.जयसिंघानी, शाखा अभियंता यांना स्वेच्छा निवृत्ती देणे

**प्रस्तावना**

श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता (स्थापत्य) यांनी घरगुती कारणास्तव व प्रकृती साथ देत नसल्याने शासकीय नियमानुसार असलेल्या शर्तीनुसार स्वेच्छा निवृती मिळणे बाबत दि.१५/१२/२०११ रोजी विनंती अर्ज सादर केला आहे. सदर कर्मचारी दि. २४/१०/१९८३ पासुन कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत कार्यरत होते.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालयीन आदेश क्र. मजीप्रा/प्रतिनि/२००४/१०८/आ–६दि. ०१/१२/२००६ चे आदेशाव्दारे श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता यांना म.जी.प्रा व शासन निर्णयाच्या अधिन राहुन लोकहितास्तव उल्हासनगर महानयगरपालिकेत कायम स्वरुपी समावेशन करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

मा. आयुक्त सो, उमपा यांचे कार्यालयीन आदेश क्र.उमपा/ काअ/ पापु/ आ.का/ १०५/ २००९ दिनांक ०५/०९/२००९ चे आदेशानुसार श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता यांना उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर वेतन संरक्षित करुन अटी व शर्तीस अधिन राहुन कायम स्वरुपी समावेशन करण्यात आले आहे.

१) उल्हासनगर महानगरपालिका सेवा,शर्ती व नियमावली तसेच महानगरपालिकेचे कार्यरत कर्मचा–यांना लागु असलेले नियम/उपविधी, व वेळोवेळी निर्गमित होणारे स्थायी आदेश बंधनकारक असतील

२) त्यांची सेवाजेष्ठता त्यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेतील समावेशनाच्या दि. १/१२/२००६ पासुन ग्राहय धरण्यात यईल.

श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता (स्थापत्य) यांची एकुण सेवा २८ वर्ष पुर्ण झालेली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६५/६६ पोटनियम (१) अन्वये कर्मचा–यास ०३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. त्याचे दि. १५/१२/२०११ रोजीच्या अर्जान्वये ०३ महिन्याची नोटीसीनुसार दि. १३/३/२०१२ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेता येईल.

सदर कर्मचारी यांची स्वेच्छानिवृत्ती मंजुर केली असता माहापालिकेच्या अर्थिक खर्चात रु. १४,७४,१७६ एवढा आर्थिक भार पडणार असल्याबाबतचे लेखा विभागाकडून परिगणना करण्यात आलेली आहे. श्री. एन. एन. जयसिंघानी, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ५ वर्षे, ३ महिने १२ दिवस सेवा होत असल्याने त्यांना रू. १४,७४,१७६/– एवढी रक्कम देय असल्यामुळे सदरचा आर्थिक भार महानगरपालिकेस घेणे शक्य नाही.

श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ५ वर्षे, ३ महिने १२ दिवस सेवा झाली असल्यामुळे त्यांना स्वेच्छा निवृत्ती देता देणे शक्य होणार नाही.

शासन अधिसूचना, वित विभाग, क्रमांक–वित विभाग, क्रमांक–अंनिया–२००५ /१२६/ सेवा–४, दिनांकआक ३१ ऑक्टोंबर २००५ अन्वये आता दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवा प्रवेश करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या तरतूदी ऐवजी अंशदायी निवृत्ती वेतन आणि अंशदायी भविष्य निर्वाह निधीच्या नवीन योजना लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन व भविष्य निर्वाह निधीचा लाभ या कार्यालयाकडून अनुज्ञेय राहणार नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता (स्थापत्य) यांचा स्वेच्छा निवृत्ती देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयासाठी प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र: ४६** **दिनांक:–२०/१०/२०१२**

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. एन.एन. जयसिंघानी, शाखा अभियंता यांना आयुक्त विर्निदिष्ट करतील अशा तारखेपासून महापालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

**परंतु,**

कायदेशीर अनुज्ञेय असलेल्या रकमेशिवाय इतर लाभ देता कामा नयेत.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय :–**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा व स्मारक उभारण्याबाबत स्थगन प्रस्ताव.

सूचकाचे नांव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नांव :– श्री. राजु जग्यासी

**महासभा ठराव क्र. :–** ४६ क | **दिनांक :** २०/११/२०१२

ही महासभा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे व इतर ७ सदस्यांकडुन प्राप्त झालेला स्थगन प्रस्ताव सभेच्या कामकाजात दाखल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

मराठी मनाचा ध्यास, महाराष्ट्राचा श्वास आणि हिंदुत्वाचा पंचप्राण बनलेले शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे मातोश्री निवासस्थानी शनिवार दिनांक १७/११/२०१२ रोजी दुपारी ३.३३ वाजता निधन झाले आहे. अशा या महानपुरुषाला श्रध्दांजली वाहुन या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४६ ड** **दिनांक : २०/११/२०१२**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/११/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**स्थगन प्रस्ताव**

प्रस्तावकांची नावे :– १) श्री. धनंजय बोडारे
२) श्री.जीवन इदनानी
३) श्री. विजय सुपाळे
४) श्री. भगवान भालेराव

अनुमोदकांची नावे :– १) श्री. राजु जग्यासी
२) श्री. रामचंद्र पारवानी
३) श्रीमती अंजली साळवे
४) श्री. सुनिल सुर्वे

**विषयः–** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा व स्मारक उभारण्याबाबत.

मराठी मनाचा ध्यास, महाराष्ट्राचा श्वास आणि हिंदुत्वाचा पंचप्राण बनलेले शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे मातोश्री निवासस्थानी शनिवार दिनांक १७/११/२०१२ रोजी दुपारी ३.३३ वाजता निधन झाले आहे. अशा या महानपुरुषाला श्रध्दांजली वाहुन या सभेचे कामकाज स्थगित करण्यास तसेच त्यांच्या विचारातुन सदैव प्रेरणा राहण्यासाठी उल्हासनगर–४ येथिल व्हि.टी.सी. क्रिडा संकुलाचे नाव हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे असे देण्यात येवून त्याठिकाणी मा. बाळासाहेबांनी काढलेली प्रेरणादायी व्यंगचित्रे, त्यांचा जिवनप्रवास, भाषणे इत्यादी बाबी जतन करुन ठेवण्याविषयी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधण्याचा प्रस्ताव देत आहोत. तसेच शिवसेनाप्रमुखांच्या जाज्वल्य विचारांची प्रेरणा सतत तेवत राहावी म्हणून श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी तसेच श्री. विजय खंडू सुपाळे, श्री. अंकुश म्हस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार शांतीनगर येथे सिंहासनाधिष्ठीत प्रतिमा स्थापन करण्याकरीता तसेच श्रीमती चरणजीतकौर राजेंद्रसिंह भुल्लर, श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड यांनी केलेल्या प्रस्तावानुसार कल्याण–मुरबाड रस्त्यावरील शहाड येथिल उ.म.पा. जकात नाका क्र. १० शेजारी मा. बाळासाहेब ठाकरे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याकामी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४७** **दिनांक : २०/१२/२०१२**

ही महासभा व्ही.टी.सी. क्रिडासंकुल उल्हासनगर–४ विकसित करुन त्यास हिंदुहृदय सम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे संकुल असे नामकरण करण्यास तसेच बाळासाहेबांनी काढलेली व्यंगचित्र, त्यांची भाषणे, प्रवासवर्णने, त्यांच्या जीवनशैलीवरील फोटोग्राफी इत्यादी सर्व जतन करण्यासाठी उल्हासगनर–४ येथे त्यांचे स्मारक उभारण्यास, त्याचबरोबर याच विषयीचे महापालिका स्विमिंगपुल येथे पहिल्या माळयावर प्रदर्शन उभारण्यास तसेच शांतीनगर येथिल छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराशेजारी सिंहासनाधिष्ठित, त्याचबरोबर शहाड येथिल महापालिका जकात नाका क्र. १० येथुन गुलशननगरकडे जाणा–या रस्त्याच्याबाजुला पुर्णाकृती पुतळा व कैलास कॉलनी येथे पुतळा उभारण्यास मान्यता देत आहे.

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. २ :–** मागील दिनांक २०/१०/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव : श्री. राजू जग्यासी

**महासभा ठराव क्र. ४७ अ** **दिनांक : २०/१२/२०१२**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/१०/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ३ :–** बीएसयुपी योजनेअंतर्गत राहुलनगर येथिल लाभार्थ्यांची तसेच वाल्मिकीनगर येथे राहत
असलेल्या महापालिकेतील सफाई कामगारांना पात्र ठरवुन बीएसयुपी योजनेतील गृह
संकुल विकास कामातील २५ चौ.मि. सदनिका नियमानुसार मंजुरीस व लाभार्थ्यांची यादी अंतिम करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरासाठी राहुलनगर व वाल्मिकी वसाहत या दोन वस्त्यांचे एकुण ६०० घरकुलांकरिता रु.३५.३२ कोटी खर्चाचे सविस्तर प्रकल्प आराखडे दि.२९/१२/२००८ रोजी राज्यस्तरीय सुकाणु समितीकडुन मंजूरी प्राप्त झाल्यावर केंद्र शासनाकडे मंजुरीकरिता सादर करण्यात आले होते. केंद्र शासनाकडून दिनांक ३१/१/२००९ रोजी रु.३५.३२ कोटी रकमेच्या प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर त्यांची निविदा कार्यवाही पूर्ण करुन मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर यांना दि. २५/०८/२००९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

याकामी महापालिकेने नियुक्त केलेले वास्तुविशारद मे.सुभाष पाटील यांचेतर्फे सोशो बायोमॅट्रीक सर्वे, प्लेन टेबल सर्व्हेक्षण करुन २५० झोपडपट्टीधारकांची यादी दिनांक ५/०६/२०१० रोजी या कार्यालयात सादर केली होती. (सोबत यादी जोडली आहे.) सदरची यादी दिनांक १०/११/२००९ रोजी प्रसिध्द् करण्यात येवून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. तद्नंतर प्राप्त झालेल्या ९६ हरकतीची त्यावेळी सुनावणी व जागेवर तपासणी करुन ८७ हरकती निकाली काढण्यात आल्या होत्या. व ९ हरकतींबाबत करविभागाकडून तपासणी करुन याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

सदरची योजना राहुलनगर, उल्हासनगर–१ सिटीसर्वे क्र. ८६६६,८६७१, क्षेत्रफळ – ६०७५.०० चौ.मी. व वाल्मिकी नगर सिटीसर्वे क्र. २६९३६ ते २६९४८, क्षेत्रफळ – ५७८०.६० चौ. मी. याठिकाणी राबवायची आहे. उक्तप्रमाणे राहुलनगर ही जागा शासनाच्या मालकीची असल्याने शासनाकडे जागेचा रीतसर ताबा मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला असून शासन मान्यता अंतिम टप्प्यात आहे व ती शासन निर्णयानुसार योजना अंमलबजावणीसाठी ताब्यात मिळणार आहे. सदरची जागा शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार रहिवासक्षेत्रात आरक्षणात फेरबदल करणेसाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे.

वाल्मिकीनगर उल्हासनगर–५ ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याकारणाने या जागेचे मोजणी करणेची आवश्यकता नसल्याचे मा.तहसिलदार यांनी त्यांचेशी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी सांगितले.

सदरची योजना विहित मुदतीत म्हणजे डिसेंबर २०१३ पर्यंत पूर्ण करणेसाठी मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी निर्देश दिले असून यासाठी केंद्र व राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला असल्याने शासनाकडून याबाबत वारंवार पाठपुरावा होत आहे.

सदर योजनेच्या कामाचा आढावा घेणेसाठी मा.महापौर यांनी ४/१०/१२ रोजी त्यांचे कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. त्यानंतर पुनश्चः आयुक्तांच्या स्तरावर ५/१०/१२ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत ठरल्यानुसार शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, उप–अभियंता, कनिष्ठ
अभियंता व पाणी पुरवठा विभागातील अभियंता यांचे ६ गट तयार करुन राहुलनगर झोपडपट्टीत प्रत्येक घरास भेट देऊन माहिती घेण्यात आली. या सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या रहिवाश्यांच्या यादीची मुळ यादीशी तुलना करुन घेण्यात आली. यानंतर मुळ यादी व भरलेले अर्जांचे प्रपत्र व त्यासोबतचे कागदपत्रे यांची पडताळणी करण्यात आली. त्यानुसार झोपडपट्टीधारकांच्या मुळ यादीची व उपरोक्त

सर्वेक्षणात आढळलेल्या २३९ रहिवाश्यांच्या नावासह तयार केलेले विवरणपत्र सोबत जोडले आहे. या सर्वेक्षणामध्ये प्रामुख्याने खालील बाब निदर्शनास आल्या आहेत.

१) सर्वेक्षणाच्या वेळी अर्जदार अथवा त्यांचे कुटूंबातील व्यक्ति यांचे काणत्याही व्यक्तिचे नावे वास्तव्याच्या पुराव्याचे कागरपत्रे आढळले. — ११४

२) मुळ यादीतील नाव आढळलेले आहे/नाही/प्रपत्र भरलेले नाही/ मुळ जागेवरील पुरावे सादर केले नाही — १३६ ( सदर १३६ अर्जांची वर्गवारी व त्यांची संख्या खालीलप्रमाणे)

अ) मुळ यादीत नाव नाही, सर्वेक्षणाच्या वेळी नाव आढळले (त्यांचे कागदपत्र तपासणे आवश्यक आहे) — १४

ब) मुळ यादीत नाव नाही, पूर्वीचे व दिनांक ४/१०/१२ चे सर्वेक्षणाच्या वेळी आढळलेले नाही अशी बंद घरे) — २६

क) मुळ यादीत नाव आहे, परंतू दिनांक ४/१०/१२ चे सर्वेक्षणाचे वेळी अर्जदाराचे कुटूंबातील अथवा अन्य कोणतेही नाव आढळले नाही. घरे बंद होती. —२४

ड) मुळ यादीत नाव आहे, त्याठिकाणी घर आहे, परंतू जागेवरील पुरावा नाही / प्रपत्र भरलेले नाही — ७२

३) एकाच व्यक्तिने एकापेक्षा जास्त झोपडयांवर प्रपत्र भरलेले आढळले — १०

राहुलनगर ही झोपडपट्टी वर्ष २००० दरम्यान वसलेली आहे. याठिकाणी वास्तव्य करणारे बहुतांश रहिवासी रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेले म्हणजे प्रकल्पग्रस्त बाधीत असून अनधिकृतरित्या वास्तव्य करीत आहेत. शासनाच्या निकषानुसार दिनांक १/१/१९९५ पूर्वीच्या रहिवास करणा—या झोपडपट्टीधारकांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. तसेच सदरची योजना ही त्याच ठिकाणी राहणाऱ्या लोकांसाठी राबविणे अपेक्षित आहे. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात अर्जदाराने मुळ जागेवरील पुरावे सादर केलेले नाहीत अथवा त्यांच्या वास्तव्याचे पुरावे सादर केलेले नाहीत. जोपर्यंत पुरावे देणार नाहीत तोपर्यंत त्यांना लाभार्थी म्हणून ठरविता येणार नाही व योजनेचा लाभ घेणेसाठी समाविष्ट करता येणार नाही.

वरील सर्व बाबी विचारात घेता राहुलनगर मधील बहुसंख्य रहिवासी प्रकल्पग्रस्त असल्याने काही
ठिकाणी एकापेक्षा जास्त लाभार्थी एकाच कुटूंबातील आढळतात व काही ठिकाणी एकाच व्यक्तिस एकापेक्षा जास्त झोपडीधारक दिसतात. तसेच वरीलप्रमाणे त्रुटीही आढळून येतात.

सदर योजना झोपडपट्टीतील शहरी गरीबांकरिता (ज्यांना घरकुले नाहीत) राबविण्यासाठी असल्याने लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे त्याचप्रमाणे वाल्मिकीनगर येथे रहात असलेले महापालिकेतील सफाई कर्मचारी यांना याबाबत पात्र ठरवून त्यांना महापालिकेच्या/बीएसयुपी योजनेतील गृहसंकुल विकास कार्यक्रमातील २५ चौ.मी. सदनिका नियमानुसार मंजुरीस मा.महासभेसमोर सादर करण्यास प्रस्तावित.

<u>**महासभा ठराव क्र:**</u> ४८ <u>दिनांक:—२०/१२/२०१२</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता बीएसयुपी योजनेअंतर्गत राहुलनगर येथिल लाभार्थ्यांची तसेच वाल्मिकीनगर येथे राहत असलेल्या महापालिकेतील सफाई कामगारांना पात्र ठरवुन बीएसयुपी योजनेतील गृह संकुल विकास कामातील २५ चौ.मि. सदनिका नियमानुसार व योग्य धोरणा अधिन लाभार्थ्यांची यादी अंतिम करणेस प्रशासनास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ४:—** मे. अॅन्टोनी वेस्ट सेल प्रा. लि. कचरा वाहतुक ठेकेदाराचे MUTUAL CLOSURE OF CONTRACT बाबत पत्राचे विचार करणे व नविन निविदा मसुदेस व निविदा मागविणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरात दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा वाहतुकीचे काम मे. अॅन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. ली. कंपनी, नवी मुंबई सन २००३ पासुन १० वर्षासाठी देण्यात आले आहे. सदरचा ठेका सप्टेंबर २०१३ मध्ये संपुष्टात येत आहे. तत्पुर्वी मे. अॅन्टोनी घनकचरा वाहतुक ठेकेदार यांचे काम समाधानकारक नसल्याने त्यांच्याशी दिनांक ८/८/२००३ रोजी केलेला करारनामा रद्द करणेसाठीचा प्रस्ताव दिनांक १०/९/२०१२ रोजी गोषवारा मा. महासभेस निर्णायास्तव ठेवण्यात आलेला आहे. तसेच संदर्भिय पत्रान्वये मे. अॅन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. ली. कचरा वाहतूक ठेकेदार यांनी क्र. १५९/११—१२ दिनांक ११/९/१२ रोजीचे पत्रान्वये Mutual closure of Contract बाबत नमूद केले आहे.

मे. अॅन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. ली, कंपनी दैनंदिन निर्माण होणारा कचरा उचलून शहरात शुन्य गार्बेज योजना राबविण्यास अपयशी ठरत आहे. सदर ठेकेदाराची कामाची मुदत सप्टेंबर २०१३ मध्ये संपत असल्याने त्यापुर्वी नविन अभिकर्ता नेमणे अत्यावश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० नुसार शहरातील घनकच—याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी अभिकर्त्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. शहरातील दैनंदिन अंदाजे ३३० टन कचरा वाहतुकीसाठी आवश्यक मनुष्य बळ, यंत्रसामुग्री, वाहने इत्यादीची आवश्यकता लक्षात घेवून शहरातील कचरा उचलण्याबाबतचा निविदेचा प्रारुप मसुदा बनविण्यात आला आहे. सोबत निविदा सुचना व निविदेत अंतर्भुत केलेल्या अटी व शर्तीची प्रत जोडून सादर.

घनकचरा वाहतुकीची संपुर्ण निविदा प्रक्रीया पुर्ण करुन अभिकर्त्याची नेमणूक करण्यासाठी व प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी साधारण सहा ते आठ महीन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. करीता निविदा मसुदा, निविदा मागविण्यास व त्यासाठी येणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेस सविनय सादर.

**महासभा ठराव क्र:** ४९ — **दिनांक:—२०/१२/२०१२**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मे. अॅन्टोनी वेस्ट सेल प्रा. लि. कचरा वाहतुक ठेकेदाराचे MUTUAL CLOSURE OF CONTRACT बाबतच्या पत्राचा विचार न करता व प्रत्येक पालिका सदस्यास प्रशासनातर्फे प्रस्तृत केलेल्या पुस्तीकेतील नविन निविदा मसुदेस व सभागृहात सुचविलेल्या सूचना व इतर कोणतीही सूचना असल्यास त्यात आवश्यकतेनुसार फेरफार किंवा भर घालण्यास व त्या प्रयोजनार्थ निविदा काढण्यास मान्यता देत आहे.

**तसेच—**

१. आयुक्तांनी अंतिम केलेली निविदा या ठरावाचा भाग आहे असे मानले जाईल.
२. मे. अॅन्थानी वेस्ट हॅण्डलींग प्रा.लि. यांचा करार ताबडतोब रद्द करण्यात येईल व त्या प्रयोजनार्थ सोबत जोडलेले प्रशासनाचे दिनांक १०/९/२०१२ चे गोषवा—यात नोंदविलेले प्रस्ताव व कारण या ठरावाचा भाग आहे असे मानले जाईल.
३. मे. अॅन्थोनी वेस्ट हॅण्डलींग सेल प्रा.लि. हे घनकचरा व्यवस्थापनात असक्षम असल्याने त्यांना प्रशासनातर्फे रितसर काळया यादीत टाकण्याकामी नोंद करण्यात येईल.
४. तात्पुर्ती कचरा वाहतुकीची व्यवस्था करणे व रितसर नविन ठेकेदाराशी संविदेस आयुक्तास प्राधिकृत करणे व त्या प्रयोजनार्थ अंतर्भुत खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.
५. इतिवृत्त कायम होण्याची पुढच्या सभेपर्यंत वाट न पाहता या ठरावाद्वारे घेतलेले निर्णय अंतिम राहतील व प्रशासनातर्फे थेट अंमलात आणण्यात येतील.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. ५:—** उल्हासनगर महापालिका अधिकारी/ कर्मचा-यांना वर्ष २०११-२०१२ साठी रु. ९५००/- सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान व बोनस् मिळणेबाबत महापालिकेतील विविध कर्मचारी संघटना प्रतिनिधि यांचे समवेत मा. महापौर यांचे अध्यक्षते खाली मा. आयुक्त, व पदाधिकारी अधिकारी यांची दिनांक. २५/१०/२०१२ रोजी दुपारी ४.३० वाजता बैठक घेण्यात आली. अधिकारी /कर्मचारी यांची संख्या खालीलप्रमाणे.

**वर्ग-१ चे ७, वर्ग-२ चे ३, वर्ग-३ चे ४११, वर्ग-४ चे १९३१ व शिक्षण मंडळाची एकुण-२२६ अशी आहे व ठोक पागरावरील कर्मचारी ७८ आहेत, अशी सुमारे एकुण २७००/- इतके कर्मचारी आहेत.**

सदर बैठकीमध्ये सर्वानुमते सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना रूपये ८८८८/- अदा करण्याबाबत तत्वतः सहमती दर्शविण्यात आली होती. सर्व कामगाराना सना निमित्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत सर्व पदाधिकारी व अधिका-यांशी चर्चा विनिमय करून सानुग्रह अनुदान रूपये. ९५००/- दिपावली सणापुर्वी देण्यात यावे. व तशी मंजुरी तद्नंतर महासभेत घेणेबाबत एकमताने निर्णय घेण्यात येईल असे मा. महापौर यांनी निर्देश दिले.

उपरोक्त बैठकीत निर्णयाप्रमाणे सादर करण्यात येते की, वित्तीय वर्ष २०११-२०१२ साठी सर्व महापालिका कामगारांना व अधिका-यांना खालील अटींच्या शर्थीच्या अधिन राहुन सानुग्रह अनुदान खालीलप्रमाणे अदा करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच सुधारीत क्षय रोग नियंत्रन कार्यक्रम, प्रजनन व बाळ आरोग्य कार्यक्रम व सुवर्ण जंयती शहरी रोजगार योजना, तसेच अनुकंपा तत्वावर नियुक्त केलेल्या ठोक वेतनावरील/मानधन तत्वावरील सर्व अधिकारी/कर्मचारी सानुग्रह अनुदान अदा करण्यात यावे.

१) सदरचे सानुग्रह अनुदान अ, ब, क व ड मधील सर्व महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी कर्मचा-यांना व प्रतिनियुक्ती वरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.
२) जे कर्मचारी ३१ मार्च २०१२ रोजी सेवेत होते आणि वर्ष २०११-१२ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळणेस पात्र राहील.
३) दिनांक १/४/२०११ ते दि.३१/३/२०१२ या कालावधीत सपुंर्ण वर्ष निलंबित असलेले कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान मिळणेस अपात्र राहतील.
४) सदर अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

$$\frac{\text{रूपये ९५००}}{\text{३६५ दिवस}} \times \text{हजर दिवस}$$

५) कर्मचा-यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजुर रजा गृहीत धरण्यात याव्यात. परंतु विनावेतन रजेचा विचार करण्यात येऊ नये.
६) सानुग्रह अनुदान सदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

सदर खर्चाची तरंतुद वित्तिय वर्ष २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात सानुग्रह अनुदान या शिर्षाखाली ३ कोटी इतकी तरतुंद करण्यात आलेली आहे. साधारपणे रू. ९५००/— प्रति कर्मंचारी अनुदान दिल्यास रू. ३ कोटी जवळपास खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त वर्ष २०११-२०१२ साठी सानुग्रह अनुदान म्हणुन **रूपये ९५००/-** प्रति अधिकारी/कर्मचारी प्रमाणे सर्व कर्मंचा-यांस अदा करण्यासाठी मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५०  दिनांक:—२०/१२/२०१२

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तींवर महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील शिक्षक, अधिकारी, कर्मचा-यांना व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच सुधारीत क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, प्रजनन व बाळ आरोग्य कार्यक्रम व सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गतच्या सर्व अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना वर्ष २०११-२०१२ चे दिपावली सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन रुपये ९,५००/- अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका